


म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : का.वा
दा. क्र. : २८३६
BVBK-0402836

# सिंहासन बत्तिशी

—लेखिका—

सौ. मंदा बोडस

सर्व हक्क प्रकाशकाधिन

पुनर्मुद्रण - ऑगस्ट १९९२

किंमत ८ रुपये

सेन्ट्रल प्रकाशन, पाववाला स्ट्रीट, मुंबई नं. ४

# सिंहासन बत्तिशी

## 'सिंहासन सापडलें'

फार फार पूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी माळव्यांत राजा भोज राज्य करीत होता. त्याची राजधानी 'धारा' येथें होती. राजा रसिक, विद्वान व शूर असल्यानें त्याचे पदरी अनेक विद्वान लोक होते. कलावंत होते. प्रजेच्या हितासाठी राजा खूप पैसा खर्च करीत असे. न्यायदानाच्या बाबतीत तर त्याचें कौशल्य वाखाणण्यासारखे होते. कुणावर थोडाही अन्याय होऊं नये यासाठी तो जागरूक राही.

एक दिवस काय झाले ? दरबारांत एक फिर्याद दाखल झाली. धारा नगरीत एक श्रीमंत सावकार मरण पावला होता. त्याला दोन मुलगे होते. मृत्युपत्रांत सावकारानें एक विचित्र अट घातली होती, त्याच्या मुलांचे दोन सुंदर घोडे होते, त्या घोड्यांवर दोघांचेहि प्राणापलीकडे प्रेम होते. घोडेही मालकाच्या आज्ञेत वागत असत.

मृत्यपत्रांत अशी अट होती कीं, 'या दोन घोड्यांची शर्यत लावावी. जो घोडा मागे राहील त्याच्या मालकाला संपत्तीतला सर्वांत मोठा अमूल्य असणारा नीलकंठ हिरा मिळावा. उरलेल्या संपत्तीचे सारखे तीन भाग करावेत. दोन दोन्ही भावांनी घ्यावेत व तिसरा धर्मकार्यासाठी खर्च व्हावा.'

भोजराजानें दोन्ही घोड्यांची शर्यत लावण्याचा हुकूम दिला, पण काय आश्चर्य ! घोडे जागचे हालेचनात. बरं एखादं पाऊल टाकलं तरी तें अगदी बरोबर ! आतां काय करावं ? नीलकंठ हिरा सरकारी खजिन्यात जमा करावा असाहि सल्ला कांहींनी दिला. पण राजाला तो पटला नाहीं. संपत्तीची वाटणी करणें सोपे होते. हिरा राजाच्याच ताब्यांत होता.

एक दिवस राजा शिकारीला बाहेर पडला. मनांतले विचार नाहींसे व्हावेत म्हणून तो एकटाच खूप दूर निघून आला. अवंती नगरीजवळच्या रानांत आल्यानंतर त्यानें आपला घोडा चरायला सोडून दिला व आपण एका विशाल वटवृक्षाखाली आरामांत बसला.

थोडा वेळ गेला. शेजारीच त्याला गडबड ऐकूं आली म्हणून त्यानें सहज मागे वळून पाहिले. कांबळी पांघरलेली, हातांत काठ्या घेतलेल्या गुराख्यांची पोरे एका झाडाखाली खेळ खेळत होती, त्यांचा न्यायदानाचा खेळ चालला होता. शेजारच्या वृक्षाच्या घनदाट छायेखाली एक छोटासा मुलगा बसला होता.

आतां राजा उत्सुकतेनें त्यांचा खेळ बघूं लागला. कांहीं सटरफटर तक्रारी विचारल्या गेल्या. न्यायदान करणारा मुलगा मात्र गंभीरपणें व अस्खलीत भाषेंत बोलत होता. शेवटी एका मुलानें विचारले, 'राजा भोज यांच्या दरबारी खटला चालू आहे. त्याचा निकाल कसा काय लावावा हे

अजून कुणाला समजले नाही तरी तो नीलकंठ हिरा कुणाला द्यावा ते आपण सांगावे—'

आपल्या राजधानीत चाललेला खटला या पोरासोरापर्यंत आलेला पाहून राजाला फार आश्चर्य वाटले. पण तो मुलगा काय सांगतो याची उत्सुकता असल्याने तो स्तब्ध बसून पुढें ऐकूं लागला. तो मुलगा असे म्हणाला कीं, 'एवढी सोपी गोष्ट राजाच्या लक्षांत येऊं नये याचं आश्चर्य वाटतं! अरे, धाकट्या भावाचा घोडा मोठ्या भावाला द्यावा व मोठ्या भावाचा घोडा धाकट्याला! आणि मग शर्यत लावावी. अर्थात् जो पुढे जाईल तो जिंकेल.'

'अहो, पण–मृत्युपत्रांत—' तो मुलगा मध्येंच म्हणाला.

'मला ते ठाऊक आहे.' मृत्युपत्रांप्रमाणें वाटणी होणार हें निश्चित! जो पुढें आला असेल–त्याच्या घोड्यावर बसलेला भाऊ (म्हणजे त्याचा घोडा) मागें रहाणार नाहीं का?'

हा निर्णय ऐकून राजा एकदम खुष झाला. त्यानें पुढें होऊन त्या मुलाला आणखी कांही गहन प्रश्न विचारले. त्याचीही त्यानें अगदीं योग्य, स्पष्ट उत्तरें दिलीं. हा मुलगा कुणी तरी मागेपुढे विद्वान होणार आहे अशी त्याची खात्री झाली.

पण काय झाली मजा! त्या झाडाखालून दूर होतांच तो

मुलगा आपल्या इतर मित्रांसारखाच बोलूं लागला. हंसू लागला. साध्या प्रश्नानाही त्याला उत्तरें देतां येईनात. मग राजानें दुसऱ्या मुलाला त्या छायेखालीं बसवलें. आतां तो मुलगा उत्तम उत्तरे देऊं लागला.

ते बालगोपाळ म्हणाले, आम्ही रोज हाच खेळ खेळतो. राजाच्या लक्षांत आले कीं, या जागेचाच कांहींतरी गुण दिसतो. आपण तेथें बसून पाहू या! असा विचार करून तो त्या जागेवर जाण्यासाठीं चालूं लागला, पण त्या जागेजवळ येतांच त्याच्या पायाला चटके बसूं लागले. तो घाबरून मागे सरकला. पण आतां त्याचें मन स्वस्थ बसेना. ती जागा कुणाच्या मालकीची आहे याचा त्यानें तपास काढला व त्या जागेची जी किंमत त्यानें सांगितली—त्याच्या पाचपट पैसे देऊन त्यानें ती जागा खरेदी केली.

नंतर त्या छायेखाली मजुरांना बोलावून खणायचा हुकूम सोडला. खोल खणल्यावर आंतून रत्नजडित चंद्रकांत मण्यांचें सुंदर सिंहासन निघाले. सिंहासन अतिशय सुंदर होतें. सिंहासनाभोवती बत्तीस पऱ्या आपले सोन्याचे पंख पसरवून आनंदानें हसत होत्या. रत्नें चमचम करीत होती.

राजानें सिंहासन उचलले व धारानगरीला एका खास महालांत ठेवले. त्या सिंहासनाकडे बघत राहण्याचा राजाला छंदच लागला.

एक दिवस त्याला वाटले, त्या सोन्याच्या परींचे डोळे आपल्यापाशीं कांहीं तरी बोलत आहेत.

एका शुभमुहूर्तावर त्यानें त्या सिंहासनावर बसायचे असे ठरवले. झाले! मुहूर्त ठरला. देशांतून पवित्र नद्यांचे पाणी आणण्यांत आले. सुवर्णाच्या पात्रांतून पूजेची सिद्धता करण्यांत आली. नगर शृंगारले. अन्नछत्रे चालू झाली. रात्री भोजराजा सहज सिंहासन पहायला म्हणून महालांत शिरला. तेवढ्यांत त्याला स्वर्गीय आवाज ऐकूं आला. पैंजणाचा झंकार करीत नाजुक आवाजात कुणीतरी म्हणत होते—

'हे भोजराजा, ज्याचे औदार्य अलौकिक आहे, त्यानेंच या सिंहासनावर बसण्याचें धाडस करावें.'

भोजराजा म्हणाला, 'माझे औदार्य तिन्ही लोकांत गाजतें आहे. मी रोज पाण्यासारखा पैसा दानधर्मात खर्च करतो. हजारोंना अन्नदान करतो, भूमिदान करतो. कुणाचेहि श्रम फुकट घेत नाहीं, माझ्या दारांतून कोणताही याचक विन्मुख परत जात नाहीं.'

'ह्यः ह्यः ह्यः' बासरीतून मंजुळ स्वर निघावेत तसा हंसण्याचा आवाज ऐकूं आला.

'ऑं? कोण हंसतंय?'

'मी म्हणजे कोण? तूं पुतळी' सिंहासनावरील एका पुतळीला राजानें स्पर्श करून विचारलें.

'होय! मीच. माझें नांव जया! मीच बोलते आहे. राजा, अरे आपल्याच तोंडानें तूं दान दिल्याचा उल्लेख केलास! दान उजव्या हातानें करावें पण तें डाव्या हातालाही कळूं नये अशा गुप्ततेनें करावें असा नियम आहे आणि तूं तर आत्मस्तुति केलीस; त्यामुळें तुझें दान, सर्व पुण्य फुकट गेले. तुला माहीत नाहीं का?'

'क्षमा करावी देवी! मी अज्ञानी आहे.'

'अरे, एखाद्या माणसाच्या सामान्य गुणाची जर दुसऱ्यांनी प्रशंसा केली तर तो थोर समजला जातो आणि प्रत्यक्ष इंद्र–स्वर्गाचा राजा इंद्र–जर आत्मस्तुति करूं लागला तर तो सामान्य समजला जातो—'

परैः प्रोक्ता गुणा यस्य निर्गुणोऽपि गुणी भवेत्।
इंद्रोऽपि लघुतां याति स्वयं प्रख्यापितैर्गुणैः ॥

'देवी, मी चुकत होतो. मला आपण सन्मार्ग दाखवलांत! आता आपले आभार मानायच्या अगोदर एक शंका विचारायची परवानगी द्यावी'—

'विचार! राजा, खुशाल विचार.' ती जया पुतळी म्हणाली.

हें सुंदर सिंहासन कोणाचें आहे? यावर बसणारा राजा असामान्य असणार हे नक्कीच. त्याच्या औदार्याची गोष्ट मला आपण सांगावी अशी इच्छा आहे—'

# कथा पहिली

'राजा, मी तुझ्यावर खूष आहे. मी तुला सांगते ते ऐक' जया पुतळी बोलूं लागली—

फार फार पूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी उज्जयिनीला राजा भर्तृहरी राज्य करीत होता. त्याच्या राज्यांत एक ब्राह्मण फार तेजस्वी होता. तपस्वी होता. पार्वतीची आराधना करण्यांत त्याला देहाचीही शुद्ध रहात नसे. असे बरेच दिवस गेले. अखेर देवी पार्वती त्याला प्रसन्न झाली व एक सुंदर फळ त्याच्याकडे फेकून म्हणाली, 'वत्सा, मी प्रसन्न आहे. तूं हें फळ खा, म्हणजे अमर होशिल ! माझा श्रेष्ठ भक्त ठरशील ! '

फळ देऊन देवी गुप्त झाली. ब्राह्मण भानावर आला. तें फळ समोर पडलेले होते. ब्राह्मणानें स्वतःशींच विचार केला— 'देवीनें मला हें फळ दिलें पण हें फळ खाऊन मी अमर झालों तर कुणाचे कल्याण होणार आहे ? त्यापेक्षां आपले महाराज भर्तृहरी यांना हें फळ नेऊन द्यावे ते जर अमर झाले तर माझ्यासारख्या अनेकांचें ते रक्षण करतील—पालन करतील. '

विचार मनांत येतांच त्या ब्राह्मणानें दरबारांत जाऊन तें फळ राजाला अर्पण केलें. राजाने त्याची हकीकत ऐकून घेतली. त्याचा निःस्वार्थीपणा पाहून तो अतिशय खूष झाला व त्यानें ब्राह्मणाला खूप संपत्ति दिली. ब्राह्मण आनंदानें घरीं निघून गेला.

तें फळ घेऊन राजा अंतःपुरात गेला. नुकताच राजानें

एका सौंदर्यवती षोडशेबरोबर विवाह केला होता. सर्व राण्यांत ती सुंदर व तरुण असल्यानें राजाची तिच्यावर जास्त प्रीति होती. आपल्या लावण्यसंपन्न राणीला राजानें तें फळ भेट म्हणून दिलें. ती राणी खूष झाली.

राजा निघून गेला. या राणीचा एक पहिला प्रियकर होता. तो अधूनमधून गुप्त वेषानें राणीला भेटत असे. राणीने तें फळ आपल्या प्रियकराला देऊन टाकले. तो प्रियकरही रंगेल माणूस होता. त्याचे एका वेश्येवर प्रेम जडले होते; पण ती वेश्या राजा भर्तृहरीकडे जात येत असे. तिला राजा जास्त आवडत असे. या वेश्येने आपल्यावर प्रेम करावे म्हणून त्यानें ते फळ तिला दिले. पण वेश्या मोठी धूर्त होती. भर्तृहरीला एकांतात गाठून ती म्हणाली, 'महाराज, अमर होण्यासाठीं हें औषध आहे. हें फळ मला मिळालें आहे, पण माझ्यासारखीनें अमर होऊन उपयोग काय? आपण अमर झालात तर पृथ्वीचें कल्याण होईल. आपण हें फळ घ्यावें म्हणजे मी धन्य होईन. आपली कृपा मात्र अशीच असूं दे.

राजानें टक लावून त्या फळाकडे पाहिलें. काल आपल्याला त्या ब्राह्मणानें जे फळ दिले होते 'तें हेंच' हे त्याच्या लक्षांत आले. त्याला फार संताप आला. त्यानें तेथेंच चौकशी सुरू केली. अखेर सर्वांचें बिंग उघडकीस आलें. भर्तृहरीनें सर्वांना कडक शिक्षा दिल्या. तरीही त्याच्या मनाला शांती मिळेना. तो विचार करूं लागला—अरेरे! मी जिच्यावर फार प्रेम

केलें, जिचें नित्य चिंतन केले ती दुसऱ्यावर प्रेम करते. तो तिचा जार तिच्यापेक्षा दुसऱ्याच कुणा स्त्रीवर आषक्त झालेला दिसतो. आणि ती स्त्री माझ्यावर प्रेम करते. अरेरे! काय हें अधःपतन!! माझा, माझ्या राणीचा, वेश्येचा, राणीच्या प्रियकराचा धिःकार असो. आमच्या मनांत हें प्रेम उत्पन्न करणाऱ्या मदनाचाही धिःकार असो.—

> यांचिंतयामि सततं मयि सा विरक्ता ।
> सा चान्यमिच्छति जनं स जनोऽन्यसक्तः ॥
> अस्मत्कृतें तु परितुष्यति काचिदन्या ।
> धिक् तां च तं मदनं च इमां च मां च ॥

पण या गोष्टी ऐकल्यानंतर राजाला संसाराचा वीट आला. एक दिवस हें सर्व राज्य सोडून तो वनवासांत निघून गेला.

राजा निघून गेल्यावर नगरींत हाहाकार उडाला. प्रधानाला काय करावे हे कळेना. राजाचा धाकटा भाऊ विक्रम बेपत्ता होता. राजाला वारस नव्हता. प्रधानानें एका हुशार तरुणाला गादीवर बसवले. पण त्याच रात्रीं त्याचा खून झाला. त्यानंतर आणखी दोनचार तरुणांना राज्याभिषेक करून पाहिला. अगदीं कडेकोट बंदोबस्त ठेवला. पण तरीही त्या सर्वांना कुणीतरी मारून टाकले. अखेर एका प्रख्यात ज्योतिषानें सांगितलें. 'हें काम वेताळाचे आहे. तो गादीवर बसलेल्या माणसाला ठार मारतो.' हे कळतांच कुणीही राज्यपद स्वीकारायला तयार होईना. दैवयोगाने परदेशी गेलेला भर्तृहरीचा

धाकटा बंधू विक्रम त्याच सुमारास उज्जयिनीला आला. गादीवर राजा नसल्याचें कारण त्याला राजधानीत शिरतांच समजलें. आपल्या वाडवडिलांची गादी अशी रिकामी राहूं द्यायची नाहीं, मग काय होईल ते होवो; असा विचार करून तो सामान्य वेषांतच दरबारांत गेला व म्हणाला,

'मी गादीवर बसायला तयार आहे.' त्याचें तारुण्य, राजबिंडे शरीर न्याहाळून पहात प्रधान म्हणाला, 'पण वेताळ राजाचा बळी घेतो हे आपल्याला माहीत आहे ना ?'

'हो आहे !'

'तरीही आपण गादीवर बसणार ?'

'होय !'

'मग माझी हरकत नाहीं' प्रधान म्हणाला. लगेच विक्रमाचा राज्याभिषेक करण्यांत आला.

रात्र झाली. विक्रम राजाच्या हुकुमाप्रमाणें त्याच्या शयन-गृहांत पहारा ठेवला नव्हता. मात्र उत्तमोत्तम खाद्याचे पदार्थ तयार करून पलंगाजवळ ठेवले होते. विक्रम राजा सावधपणें चाहूल घेत बसला. डोळे मिटतात असे वाटल्याबरोबर त्यानें आपल्या करंगळीला लहानशी जखम करून घेतली व जखमेवर मीठ दाबलें.

मध्यरात्र झाली. वेताळ हलक्या पावलांनी पलंगाजवळ आला. विक्रम राजानें त्याला नमस्कार करून म्हटलें, 'वेताळ महाराज,

आपल्यासाठीं हें अन्न शिजवून ठेवलें आहे तें खा व मग मला खा ! मला खाऊन आपलें पोट भरणार नाहीं.'

वेताळाच्या तोंडाला तें सुग्रास अन्न बघून पाणी सुटले होते. त्यानें ते सारे अन्न मग बकाबक खाल्ले. त्याचा आत्मा तृप्त झाला आणि त्यानें विक्रमाला जिवंत सोडून दिले. मात्र त्याने आज्ञा केली कीं, 'रोज असेच अन्न मला मिळाले पाहिजे व तुझ्या शयनगृहांत दुसरे कुणीही येता कामा नये.'

कांहीं दिवस असेच गेले. विक्रमानें एके रात्रीं वेताळाला विचारले, 'वेताळ महाराज, आपले ज्ञान व शक्ति किती आहे, याचा मला अजून अंदाज आला नाहीं—'

'हे बघ ! मला भूतकाळांतील सर्व दिसते. वर्तमानकाळा-बद्दल जरी फारसे सांगता आले नाहीं तरी भविष्य मात्र उत्तम समजते.'

'मग माझे आयुष्य वाढविण्याचे किंवा कमी करण्याचेहि सामर्थ्य तुझ्यात असेल.'

'छे ! छे ! मला माझ्या स्वतःच्या इच्छेप्रमाणें त्यांत कांहींच बदल करतां येत नाहीं.'

'अच्छा ! आतां जा—तुमची वेळ झाली.' विक्रम म्हणाला. वेताळ निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं रात्रीं वेताळ तेथें आला तर खोलींत अन्न नव्हतें. तो संतापला व विक्रमाचे अंगावर धांवला. विक्रमानें सरकन् आपली तलवार म्यानाबाहेर काढली व म्हटलें,

'आजपर्यंतच्या दुबळ्या पुरुषांचा तूं वध करीत आलास!



यापुढें तुला ते जमणार नाहीं. माझें आयुष्य जर शिल्लक असेल तर तूं ते कमीजास्ती करूं शकत नाहींस मग युद्धाला तयार हो—'

त्याचे शौर्य पाहून वेताळ खूष झाला. तो म्हणाला, 'विक्रमा, मी तुझ्या धैर्यावर, शौर्यावर एकदम खूष आहे. आतां काय वाटेल तो वर माग—'

'आतां रोज येथें येऊं नये. मात्र मी ज्यावेळेस आपले स्मरण करीन त्यावेळेस हजर राहून माझें काम करावे.'

'तथास्तु' असें म्हणून वेताळ निघून गेला. आतां राज्याला कसलीच भीति राहिली नाहीं.

सर्वजण विक्रम राजावर खूष होते. त्याची कीर्ति, सामर्थ्य व औदार्य दिवसेंदिवस वाढतच होते. राजा रसिक होता. विद्वान लोकांचा त्याच्या दरबारांत नेहमी सत्कार होत असे.

एक दिवस काय झालें! सिद्धसेन नांवाचा एक श्रेष्ठ कवी उज्जयिनीला आला. राजाने त्याचा योग्य तो आदरसत्कार केला व त्याला नम्रपणें म्हटले—'आपण आपली कांही काव्यरचना आम्हांला ऐकवावी.'

कवी हुशार होता. त्यानें एक श्लोक म्हटला—

अपूर्वेयं धनुर्विद्या भवता शिक्षिता कुतः ॥
मार्गणौघस्तु त्वा ऽ भ्येति गुणो याति दिगंतरम् ॥

राजा, अरे अशाप्रकारची अपूर्व, अमोल धनुर्विद्या तूं शिकलास तरी कुठें? तुझ्या या धनुर्विद्येत बाणरूपी याचक तुझ्याकडे धांवत येतात आणि खूप द्रव्य घेऊन जणु कांही त्या धनुष्याच्या दोरीसह बाहेर जातात.

आपल्या औदार्याचा हा उल्लेख विक्रमराजाला एवढा आवडला कीं, त्यानें खूष होऊन कवीला एक गांव बक्षीस दिले.

राजाला नमस्कार करून कवीनें खालील अर्थाचा दुसरा श्लोक म्हटला—

'हे राजा! तूं सर्वांना सर्व देतोस अशी तुझी लोक स्तुति करतात, पण ती खोटी आहे—

'काय ?' राजा एकदम ओरडला.

'राजा, तूं शत्रूस पाठ व परस्त्रीस हृदय कधी दिलें आहेस का ?'

सर्वदो सर्वदोऽसीति मिथ्या त्वं कथ्यसे बुधैः ॥
नारयो लेभिरे पृष्ठं न वक्षः परयोषितः ॥

श्लोकाचा दुसरा चरण ऐकतांच विक्रम राजा एवढा खूष झाला कीं, त्यानें आणखी एका गांवाचें दानपत्र कवीला करून दिले. राजाला वंदन करून कवीनें आणखी दोन श्लोक म्हटले,

अरयस्ते भयत्रस्तः स्फुटितां घटवत्हृदि ।
गलित नेत्रपाताश्च राजन् चित्रमिदं महत् ॥
सरस्वती स्थिता कंठे लक्ष्मीः करसरोरुहे ।
राजेन्द्र कुपिता कीर्तिस्तेन दशांतर गता ॥

श्लोकाचा अर्थ असा होता—हे विक्रम, तुझ्या भीतीनें शत्रूचे हृदयघट फुटले आणि त्यांतील पाणी नेत्रांतून गळूं लागलें. हा खरोखरच चमत्कार आहे. विक्रम राजा तुझ्या कंठांत प्रत्यक्ष सरस्वती वास करते आहे. तुझ्या हातांत लक्ष्मी नांदते आहे आणि म्हणूनच कीर्तीला राग आला व ती देशांतराला निघून गेली.

'वा! वा! कविराज कमाल केलीत! आज मी इतका खूष आहे कीं सारे राज्य तुम्हांला देऊन टाकतो आहे.'

'महाराज! मी राज्य घेऊन काय करूं? माझ्यासारख्याला त्याचा उपयोग काय? तुझें तुलाच ते लखलाभ असो. मात्र तुझ्या औदार्यावर, रसिकतेवर मी फार फार खूष झालो आहे,'

विक्रमराजाला आशीर्वाद देऊन, संतुष्ट होऊन तो कवि आपल्या घरीं निघून गेला.

अशा या उदार, पराक्रमी राजावर खूष होऊन प्रत्यक्ष इंद्रानें हें सिंहासन स्वर्गातून पृथ्वीवर पाठवून दिले. यावर बसून त्यानें अनेक वर्षें उत्तम प्रकारें राज्य केलें व शेवटीं तो स्वर्गास गेला.

विक्रम राजा स्वर्गास गेला त्यावेळी आकाशवाणी झाली, 'या सिंहासनावर बसायला सध्या कुणी लायक माणूस नाहीं तेव्हां ते भूमीत पुरून ठेवा.

आकाशवाणीप्रमाणें प्रधानानें हें सिंहासन जमिनीत पुरून ठेवलें. दैवयोगानें आज हें तुला सांपडलें, पण विक्रम राजाची योग्यता तुझ्यात नाही. तेव्हां तूं यावर बसायचा प्रयत्न करूं नकोस!'

एवढें बोलून ती पुतळी स्तब्ध झाली. भोजराजा खिन्न होऊन आपल्या महालांत गेला.

पण विक्रमराजाच्या गोष्टी ऐकण्याची त्याची उत्सुकता

वाढीसच लागली. त्याने ठरवलें-रोज एका पुतळीला हात लावायचा आणि गोष्ट ऐकायची—

त्यानें दुसऱ्या दिवशीचा समारंभ रद्द केला. 'मी एक महिनाभर उपासना करणार आहे' असेहि जाहीर केले.

राज्यकारभाराचा आपल्याला त्रास होऊं नये व विक्रम-राजाच्या गोष्टी आपल्याला निवांतपणें ऐकता याव्यात हाच त्यांचा हेतू होता. राज्यकारभार प्रधानावर सोपवून राजा भोज दुसऱ्या दिवसाची वाट पाहूं लागला—

★

## कथा दुसरी

रात्र झाली. राजा सिंहासन ठेवलेल्या खोलींत शिरला. त्यानें हलकेंच दुसऱ्या परीचा सुवर्णपंख पकडला. त्याबरोबर ती 'विजया' नांवाची सुवर्णपुतळी म्हणाली,

'राजा, मला हात लावूं नकोस! राजा विक्रमासारखे मोठं मन असेल तरच या सिंहासनावर बस! राजा विक्रमाच्या धवल कीर्तीतले एक सुंदर आख्यान मी तुला सांगते ऐक—

एक दिवस विक्रम राजाचे दरबारांत एक दरिद्री ब्राह्मण आला. राजाने त्याचा आदरसत्कार केला व त्याला एक लाख सुवर्णमुद्रा दान म्हणून दिल्या.

तो दरिद्री ब्राह्मण खूष होऊन म्हणाला—

संग्रहेण कुलीनानां राज्यं कुर्वंति पार्थिवाः ।।
आदिमध्यावसानेषु न त्यजति च ते नृपन् ।।

हे राजा, या पृथ्वीतलावर राज्य करणारे राजे कुलीन, विद्वान नररत्नें आपल्या आश्रयास ठेवूनच राज्य करतात आणि ते श्रेष्ठ पुरुषही आपल्या राजास कधीच सोडत नाहींत. अशाच एका राजाचा व त्याच्या पदरी असलेल्या एका श्रेष्ठ पुरुषाची कथा मी तुला सांगतो—ब्राह्मण सांगू लागला.

फार वर्षापूर्वी विशाल नगरींत राजा नंद राज्य करीत होता. त्याच्या पदरीं अनेक विद्वान लोक होते. नंद राजाच्या पट्ट-राणीचें नांव होते भानुमती. ही भानुमती अप्सरेसारखी सुंदर होती. फार गुणी होती त्यामुळे राजाला तिच्याशिवाय दुसरें कांहीं सुचतच नसे. राज्यकारभाराकडे दुर्लक्ष होऊं लागलें. नंद राजाच्या शत्रुंनी ही परिस्थिती पाहिली व ते विशाल-नगरीवर चालून येण्याचे बेत करूं लागले. राजाचा प्रधान चतुर होता.

एक दिवस तो राजाकडे गेला व त्यानें नम्रपणें राजाला सर्व परिस्थिती सांगितली. आपण राज्यकारभाराकडे लक्ष दिले नाहीं तर अनर्थ ओढवेल असेंही सुचविलें.

राजा म्हणाला; 'प्रधानजी, आपण म्हणता ते खरे आहे, पण मी राणीला सोडून क्षणभरही दूर राहूं शकत नाहीं. यावर जर कांही उपाय शोधून काढाल तर—'

'महाराज, यावर उपाय आहे. एका उत्तम चित्रकाराकडून आपण राणीसाहेबांची तसबीर काढून घेऊं या. ती सारखी

आपल्याबरोबर असली म्हणजे आपल्याला राणीसरकाराचा विरह जाणवणार नाहीं.'

'करून बघूं या! जा, चित्रकाराला आज्ञा द्या.' नंदराजा म्हणाला.

आणि कांही दिवसांनीं भानुमतीची तसबीर तयार झाली. तसबीर नंदराजाजवळ आणली त्यावेळी त्याचे गुरु शारदानंद तेथेंच बसले होते. राजानें ती तसबीर गुरूंचे हातांत दिली. शारदानंदानी ती निरखून पाहिली व म्हटलें, 'तसबीर भानुमतीची आहे असें वाटतें. पण तिच्या मांडीवर एक लहानसा काळा डाग आहे तो कांही या चित्रांत आलेला नाहीं.'

गुरूचें हें भाषण ऐकून नंदराजाचा क्रोध अनावर झाला. आपला शृंगार गुरूनें चोरून पाहिला आहे अशी त्याची समजूत झाली. त्याला गुरूचा राग आला व त्यानें सेवकाना बोलावून गुरूला कैद केले. प्रधानास हुकूम दिला—' याला अरण्यांत नेऊन ठार मारून टाक.'

प्रधानाला शारदानंदांची माहिती होती. हा श्रेष्ठ पुरुष अंतर्ज्ञानी आहे याबद्दल त्याची खात्री होती. त्या ज्ञानाचे जोरावरच त्यानें मांडीवरचा काळा डाग ओळखला होता; पण राजाला या क्षणाला हें पटणार नाहीं. तेव्हां याला आपण लपवून ठेवावें असें त्यानें ठरवले. गुरुहत्येचे पातक फार मोठे आहे ते राजाला लागू नये असा विचार करून प्रधानाने

शारदानंदांना लपवून ठेवले व राजाला सांगितले, 'मी शारदानंदाला ठार केले.'

कांहीं दिवस गेले. एके दिवशीं युवराज विजयपाल अरण्यांत शिकारीसाठी गेला होता. एका हरणाचें मागें लागून तो एकटाच खूप लांब गेला. शेवटीं ते हरीण डोंगरांत दिसेनासें झालें. दमलेला राजपुत्र पाणी पिण्यासाठीं खाली उतरला. तेवढ्यांत एक वाघ समोरून येतो आहे हें पहातांच तो गडबडला. हातांत शस्त्रही नव्हते. शेवटचा उपाय म्हणून तो जवळच्याच झाडावर चढला.

त्याच झाडावर वाघाची चाहूल लागल्यामुळें एक अस्वल येऊन बसलेले होते. हे दुसरे संकट पुढें आलेले पाहून राजपुत्राचे हातपाय गळाले. पण ते अस्वल मनुष्यवाणीनें म्हणाले, 'तू घाबरूं नकोस! मी तुला वचन देते, मी तुझा घात करणार नाहीं.' आतां विजयपालला थोडा धीर आला. तो व अस्वल जवळजवळ बसून राहिले. भक्ष्याचा वास आल्यामुळें वाघही तेथून हलायला तयार नव्हता. तोही त्या झाडाखालीच उभा राहिला.

दमलेल्या विजयपालला झोप येऊं लागली. अस्वल मोठ्या प्रेमाने त्याला म्हणाले, 'तूं झोप, मी पहारा करते. तुला मी खालीं पडूं देणार नाही. माझ्यावर विश्वास ठेव.'

अस्वलावर पूर्ण विश्वास बसलेला विजयपाल झाडाच्या खोडाला टेकून स्वस्थ झोपला.

त्याला झोंप लागल्यावर वाघ म्हणाला, ‘ अस्वला, तूं व मी अरण्यांत रहाणारे, म्हणून भाऊ भाऊ आहोंत. हा मनुष्य आपला शत्रू आहे. तूं याला हलकेच खालीं ढकलून दे म्हणजे माझी भूक शांत होईल व मी निघून जाईन.’

पण अस्वलानें उत्तर दिलें—‘ वाघा, तूं सांगतोस हें खरे असलें तरी मी या माणसाला माझा शब्द दिला आहे. मी विश्वासघात करणार नाहीं.’

वाघाचा नाइलाज झाला. मध्यरात्र झाली. विजयपालची झोप पुरी झाली. आता थकलेलें अस्वल झोपी गेले. वाघ खाली उभा होताच. तो राजपुत्राला म्हणाला—

नदीनां च नखीनां च श्रृंगीनां शस्त्रपाणिनाम् ।
विश्वासो नैव कर्तव्यः स्त्रीषु राजकुशलेष्वपि ॥

नदी, तीक्ष्ण नखं असलेली जनांवरें. शिंगाचे पशु, हत्यारबंद माणूस, स्त्रिया व राजे यांचा कधीहि विश्वास धरूं नये असे नीतिशास्त्र सांगते म्हणून तूं या अस्वलास खाली ढकलून दे. मी त्याला खाऊन निघून जाईन.

राजपुत्राला वाघानें बोलणें पटलें व त्यानें बेसावध अस्वलास खालीं लोटून दिलें. पण अस्वल सावध होते. त्यानें खालीं पडतां पडतां झाडाची फांदी पकडली. आतां विश्वासघात केलेला राजपुत्र थरथर कापू लागला. अस्वल आपल्याला ठार मारणार अशी त्याची पूर्ण खात्री झाली.

पण अस्वल म्हणाले, 'हे स्वार्थी प्राण्या, मी तुझ्या शरिराला कांहींहि अपाय करणार नाहीं, माझी तशी इच्छाच नाहीं. पण तुला कांहींतरी शिक्षा ही हवीच तुला 'ससेमिरा' याच शब्दाचे माझ्या शापामुळे वेड लागेल; आणि ही चार अक्षरे चार श्लोकांच्या प्रारंभी असलेले माझ्या मनांत असलेले चार श्लोक जर तुला कुणी ऐकवले तरच तुझे वेड जाईल. तेव्हां आतां घरीं निघून जा.'

आतां पहाट झालीच असल्यानें वाघ व अस्वल आपापल्या घरीं निघून गेले. अस्वलानें दिलेल्या शापामुळे राजपुत्र विजयपाल 'ससेमिरा—ससेमिरा' असें ओरडत रानांत हिंडू लागला.

इकडे त्याचा घोडा नगरांत जाऊन पोहोंचला होता. घोडा एकटाच आलेला पहातांच व्याकुळ झालेला राजा त्याच घोड्यावर बसून विजयपालाच्या शोधासाठीं निघाला. रानांत त्याला एक वेडा दिसला. पण निरखून पहातांच, तो आपलाच पुत्र आहे हें राजानें ओळखलें. विजयपालाला घेऊन राजा घरीं आला. अनेक वैद्य, हकीम आले. खूप औषधोपचार केले, पण राजपुत्राला गुण येईना. उलट 'ससेमिरा' ह्या नांवाचे वेड वाढतच चालले. खिन्न झालेला राजा प्रधानाला म्हणाला, 'आज माझे गुरु शारदानंद असते तर त्यांनी याला बरें केले असते.' प्रधान म्हणाला, 'आपण गांवात दवंडी देऊन बघू या—शारदानंदांसारखा एकादा विद्वान कदाचित् युवराजांना बरें करूं शकेल.'

बुडत्याला काडीचा आधार वाटतो त्याप्रमाणें राजाला या सूचनेनें थोडा आधार वाटला. त्यानें तावडतोब दवंडी देण्याचा हुकूम सोडला. इकडे प्रधान घरी आला व शारदानंदांना नमस्कार करून त्यानें सर्व हकीकत सांगितली.

शारदानंदांनीं समाधी लावली. अंतर्ज्ञानानें त्यांना राजपुत्राची सारी हकीकत समजली. थोडा वेळ गेला. गुरूनें डोळे उघडलेले पाहतांच प्रधानानें परत प्रणाम केला. हंसतच शारदानंद म्हणाले, 'वत्सा, तूं राजाला जाऊन सांग, माझी कन्या फार चतुर आहे. ती राजपुत्राला बरें करील. मात्र ती पडदानशील असल्याने आंतच राहून बोलेल.'

झाले! प्रधानानें निरोप सांगितल्यानंतर सर्व व्यवस्था करण्यांत आली. 'ससेमिरा' या नांवाचा जप करणाऱ्या विजयपालला तिच्यासमोर आणून बसविलें. पडद्याच्या आंतून आवाज आला—

सद्भावप्रतिपन्नां वंचने का विदग्धता।
अंकमारुह्य सुप्तानां हंतुः किं नाम पौरुषम् ॥

हे युवराजा, तुझ्यावर ज्यानें पूर्ण विश्वास ठेवला त्याचा विश्वासघात करण्यांत कोणतें चातुर्य आहे? आपल्या मांडीवर विश्वासानें मान ठेवलेल्याचा प्राण घेण्यांत कोणता पराक्रम आहे?'

हा श्लोक ऐकतांच राजपुत्र थोडा सांवरून बसला. त्यानें 'स' हे अक्षर सोडून दिले व तो 'सेमिरा' असें बडबडूं

लागला तेवढ्यांत आंतून परत आवाज आला—

सेतुं गत्वा समुद्रस्य गंगासागर संगमम् ।।
ब्रह्मघ्नोऽपि विमुच्येत मित्रद्रोही न मुच्यते ।।

सेतुबंध रामेश्वराला अथवा गंगा आणि सागर यांचा जेथें संगम झाला त्या तीर्थक्षेत्राला गेलं असतां ब्रह्महत्या करणारा-देखील त्या पापापासून मुक्त होतो. परंतु मित्रद्रोही मात्र मित्रद्रोहाच्या पापापासून कोठेंही मुक्त होऊं शकत नाहीं.

एवढें ऐकल्यावर राजपुत्र बराच शांत झाला. राजाही थोडा आनंदित दिसूं लागला. जमलेले लोक वाहवा! वाहवा!! म्हणूं लागले. राजपुत्र आतां 'मिरा' 'मिरा' एवढी दोन अक्षरेच म्हणूं लागला.

परत आंतून धीरगंभीर आवाज आला—

मित्रद्रोही कृतघ्नश्च तथा विश्वासघातकः ।
त्रयस्ते नरकं यांति यावच्चंद्र दिवाकरौ ।।

मित्राचा घात करणारा, उपकार न स्मरणारा, विश्वासघात करणारा, हे तिघे जोपर्यंत हे चंद्रसूर्य प्रकाशत आहेत तोपर्यंत नरकांत राहतात.

आतां विजयपाल फक्त 'रा' 'रा' असेच म्हणूं लागला. सारेजण पडद्याकडे उत्सुकतेनें बघत होते. सर्वांच्या नजरा आदरामिश्रित कौतुकानें भारल्या होत्या. राजाचे डोळ्यांत आनंदाश्रू उभे होते. तेवढ्यांत स्वर उमटले—

राद्धांतः सर्व शास्त्रणामयं न कलुषं परम् ।
विश्वासघातात्पुत्यं च न परोपकृतेः परम् ।।

सर्व शास्त्रांचा सिद्धांत आहे कीं, विश्वासघाताएवढें मोठें पातक नाहीं व परोपकाराएवढें दुसरें कोणतेंच पुण्य नाहीं.

हा श्लोक ऐकतांच राजपुत्राचे वेड एकदम नाहींसें झालें. त्यानें सर्वांना प्रणाम केला व रानांत घडलेली हकीकत सर्वांसमक्ष वडिलांना सांगितली. राजा मोठ्या आनंदानें पडद्याकडे वळून म्हणाला, 'हे मुली–तू तर गोषा सोडून कुठेही जात नाहींस; मग तुला हे सर्व कसें काय कळले ते मला सांग! माझी फार इच्छा आहे–मी तुझ्यावर एकदम खूष आहे.'

तेव्हां आंतून शारदानंद म्हणाले, 'हे राजा, ज्या अंतर्ज्ञानानें मला भानुमतीच्या मांडीवर काळा डाग आहे हें समजलें त्याच ज्ञानानें मला हें सर्व वृत्त समजले.'

हे वाक्य ऐकतांच नंद राजानें एकदम ओळखले–हें ज्ञान



शारदानंदाशिवाय दुसऱ्या कुणाचेही नाहीं. त्यानें स्वतःच्या हातानें पडदा दूर केला व शारदानंदाचे पायावर डोके टेकले. ' मी अपराधी आहे. काय वाटेल ती शिक्षा मला द्या. पण क्षमा करा, ' राजा म्हणाला.

त्याच्या मस्तकावर हात ठेवून शारदानंद म्हणाले, ' वत्सा, गुरु कधी शिष्यावर रागवत नाहीं. मी तुला क्षमा केव्हांच केली आहे. '

राजानें अत्यानंदानें ' उत्सव सुरू करा ' असा हुकूम सोडला आणि गुरूचा फार मोठ्या प्रमाणांत सत्कार केला.

ब्राह्मणानें कथा संपविली. मित्रद्रोह करणें किती भयंकर असते, केवढे मोठे पाप असते हें समजावून सांगितल्याबद्दल विक्रमराजा एकदम खुष झाला. त्यानें त्या ब्राह्मणाला कोटी सुवर्णमुद्रा दान म्हणून दिल्या.

हे भोजराजा, तुझे औदार्य जर एवढे मोठे असेल तरच या सिंहासनावर बस !

राजा कांहींच बोलला नाहीं. नमस्कार करून तो आपल्या महालाकडे निघून गेला.

## कथा तिसरी

रात्र झाली. राजा उत्सुकतेनें सिंहासनाजवळ आला. त्यानें तिसऱ्या पुतळीच्या पायाला स्पर्श केला. त्याबरोबर ती जयंती नावाची पुतळी म्हणाली—

विक्रमासारख्या धैर्यवान पुरुषास या सिंहासनावर बसायचा अधिकार आहे. वाटेल त्याचा नाहीं—

'मग एखादी कथा सांगा! ती तेजस्वी कहाणी ऐकायला मी अधीर झालो आहे.'

'बरं सांगते एक—'

विक्रम राजाचे हेरखातें फार कार्यक्षम होते. कुठेंहि कोणतीहि गोष्ट घडली तरी त्याचे सर्व वृत्त विक्रमाला ताबडतोब कळत असे.

चित्रकूट पर्वतावरच्या हेराकडून एक दिवस निरोप आला—'या पर्वतावर एका अवघड जागेंत एक देवीचें देऊळ आहे. देवळाजवळून एक नदी वाहते. पुण्यवान माणसानें त्यांत स्नान केलें तर पाणी जास्त स्वच्छ होतें. पापी माणसानें स्नान केलें तर तेथील पाणी लगेच गढूळ होते. हा चमत्कार मी स्वतः पाहिला आहे. म्हणून हें देवस्थान जागृत असावें असा माझा विश्वास आहे. या देवीसमोर एक ब्राह्मण खूप दिवस तपश्चर्या करीत बसलेला आहे. मोठे कडक नियम त्यानें घालून घेतलेले आहेत, पण तरीही देवी त्याला प्रसन्न होत नाहीं.'

हे वृत्त कळतांच राजा विक्रमाला त्या ब्राह्मणाची दया आली. त्या नदीचा खरेखोटेपणा पहावा ही सुप्त इच्छा होतीच. विक्रम एकटाच चित्रकूट पर्वतावर गेला. देऊळ शोधून काढल्या-वर त्यानें नदीत स्नान केलें. विक्रमानें स्नान करतांच तेथील पाणी जास्त स्वच्छ दिसूं लागले. म्हणजे बातमी खरी होती. आपण अपवित्र नाहीं अशी खात्री पटल्यामुळें खूप झालेला वीक्रम देवीच्या देवळांत गेला व त्यानें देवीला नमस्कार केला.

तो ब्राह्मण देवळांतच बसलेला होता. त्याच्याजवळ कंदमुळें पडलेली होती. तो जप करीत होता. विक्रम राजानें ब्राह्मणालाहि प्रणाम करून विचारलें, 'हे ब्राह्मणा, तूं येथें किती दिवस तपश्चर्या करतो आहेस ?'

'तीन वर्षें झालीं. मी कंदमुळें व पाणी यावर उदरनिर्वाह करून देवीची स्तुति करतो आहे, तप करतो आहे, पण देवीला अजूनही माझी दया येत नाहीं.'

विक्रमराजाला ब्राह्मणाची करुणा आली. तोही ब्राह्मणाजवळ बसून जप करूं लागला. दोन दिवस गेले, पण देवी प्रसन्न होईना. त्यावेळी राजाने विचार केला कीं, हे माझें शरीर कधींतरी नष्ट पावणारच आहे. मग या ब्राह्मणाचे कार्य सुकर होण्यासाठीं ते जर देवीला अर्पण केले तर काय हरकत आहे ? मनांत विचार येण्याचा अवकाश ! राजानें आपली दिग्विजय तलवार उपसली व तो आपल्या मानेवर घाव घालण्यास तयार झाला.

राजाचा तो निर्धार पाहून देवीचे आसन डळमळले व ती स्वतः आपल्या सुंदर रूपांत प्रकट झाली. तिनें विक्रम राजाचा हात वरच्यावर धरला.

राजा देवीला प्रणाम करून म्हणाला, 'हे देवी, मी फक्त दोन दिवस जप केला तर तूं मला प्रसन्न झालीस, पण हा ब्राह्मण इतके दिवस तपश्चर्या करीत होता त्याला कां प्रसन्न झाली नाहींस ?'

देवी भवानी हंसून म्हणाली, 'वेड्या, जसा भाव तसा देव ! या ब्राह्मणाची भक्ति तुझ्यासारखी शुद्ध नाहीं. आज

त्याला माझे दर्शन झाल ते तुझ्यामुळे तुझ्या धैर्यामुळें, त्यागामुळें—'

न काष्ठे विद्यते देवो न पाषाणे न मृण्मये ।
भावेहि विद्यते देवस्तस्माद्भावो हि कारणम् ।।

राजा काष्ठ, पाषाण, मृत्तिका याने बनवलेल्या मूर्तीत देव नसतो. भाव असेल तेथेच देव असतो. तुझ्यावर मी कृपा केली ती तुझी भक्ति आहे म्हणून ! तुला हवा तो वर माग !

नम्रपणें विक्रम म्हणाला, ' हे देवी भवानी, तूं जर मला प्रसन्न झाली आहेस तर या ब्राह्मणाची इच्छा पूर्ण कर. हाच मला वर दे.

शाबास ! विक्रमा शाबास ! तूं धन्य आहेस, तुझी इच्छा पुरी होईल. एवढे बोलून देवी गुप्त झाली. ब्राह्मणाला हवे होते ते मिळाले. त्यानें विक्रमाची खूप स्तुती केली.

संतुष्ट होऊन राजा अवंतीला परतला.

भोजराजा, विक्रमासारखे तुझे धैर्य असेल तरच या सिंहासनावर बस.

*

# कथा चौथी

भोजराजा आतां गोष्टी ऐकण्यांत फारच रंगून गेलेला होता. रात्र झाली. भोजराजा परत त्या महालांत आला. चौथ्या परीच्या नाजुक करांगुलीला स्पर्श करताच ती ' अपराजिता ' नांवाची सुवर्णपुतळी म्हणाली—

हे भोजराजा, विक्रमासारखा तुझा पराक्रम असेल तरच या सिंहासनावर बसायचा तुला अधिकार मिळेल––

आपण विक्रमराजाच्या पराक्रमाची गोष्ट सांगा तरी––

सांगते ऐक ! विक्रमराजा अवंतीनगरीत राज्य करीत होता. त्याचा पराक्रम एवढा मोठा होता की, प्रत्यक्ष इंद्रदेखील त्याला घाबरत असे. विक्रमराजाजवळ उद्योग, सतत काम, धैर्य, बल, बुद्धि आणि पराक्रम हे सहा गुण होते. त्यामुळें स्वर्गातील देवही त्याला घाबरत असत. त्याचा तिन्ही लोकांवर दरारा होता.

उद्यमं साहसं धैर्यं बैल बुद्धिः पराक्रमः ।
पडेते यंत्र तिष्ठति तत्रऽपि शंकते ॥

एक दिवस विक्रम राजाच्या मनांत आले आपण यज्ञ करावा. लक्ष्मी ही चंचल असल्यानें तिचा भरवंसा नाहीं. मानवजन्म घेतल्यासारखे कांहीं पुण्य जोडून ठेवावे. झाले ! हुकूम सुटले. यज्ञाची तयारी जोरात सुरू झाली. देशोदशींच्या राजांना आमंत्रणे गेली. मंडप घातले गेले कलावंतांची गर्दी झाली. स्वैपाकी खपू लागले. दासदासी रात्रंदिवस तयारी करू लागल्या.

तयारी झाल्यावर विक्रम राजाने एका ब्राह्मणाचे हातांत गंधाक्षतांनी भरलेली सुवर्णाची वाटी दिली व त्याला सांगितले, तूं समुद्राला आमंत्रण करून ये. ब्राह्मण निघाला. समुद्रांत गंधाक्षता टाकून तो म्हणाला, ‘ हे सागरा ! तुला विक्रम

राजानें यज्ञसमारंभाला बोलावलें आहे. कृपा करून तूं त्यावेळेस अवश्य उपस्थित रहा.'

ब्राह्मणाचे शब्द संपताच लाटांच्या तालावर नाचत प्रत्यक्ष समुद्र म्हणाला, 'हे ब्राह्मणा, विक्रमराजासारख्या श्रेष्ठ राजानें मला आमंत्रण पाठवलें त्यामुळें मला फार आनंद झाला आहे,



पण परमेश्वरानें मला मर्यादा आखून दिली आहे, त्याचे बाहेर मी येऊं शकत नाहीं. मात्र मी ही चार रत्नें देतों तीं विक्रम राजाला नेऊन दे. ह्या पहिल्या पिवळ्या रत्नाची पूजा केली असतां वाटेल तेवढं द्रव्य उत्पन्न होईल. ह्या दुसऱ्या हिरव्या रत्नाची पूजा केली असतां हवें असेल तेवढें अन्न मिळेल. ह्या तिसऱ्या लाल रत्नाची पूजा केली असतां वाटेल तेवढें सैन्य

उत्पन्न होऊं शकेल आणि हा चौथा नीलमणी याची पूजा केली असतां तो हवा असेल तो अलंकार देईल. ह्या चार रत्नांबरोबरच माझा आशीर्वादहि राजाला सांग.'

'होय सागरराज!' असें म्हणून नमस्कार करून ब्राह्मण परत फिरला. विक्रम राजाजवळ जाऊन त्यानें तो सर्व वृत्तांत सांगितला. ती चार रत्ने राजाच्या हातांत देऊन तो निघून जाऊं लागला.

विक्रम राजानें ब्राह्मणाला थांबवले व म्हटले, 'विप्रराज, आपण माझे फार मोठे काम केलें आहे. तेव्हां मी खूष होऊन यांतले एक रत्न आपल्याला देतो. आपल्याला या रत्नाचे गुण माहीतच आहेत. आपणांस हवे ते आपण घ्यावे.'

विक्रमाच्या औदार्यानें भारावलेला ब्राह्मण म्हणाला, 'महाराज, मी घरी जाऊन कुटुंबियांचा सल्ला घेऊन येतो,' असें म्हणून ब्राह्मण घरीं गेला. त्यानें सर्वांना ही रत्नांची हकीगत सांगितली. आणि कोणते रत्न घ्यावें? असा प्रत्येकाला प्रश्न केला. ब्राह्मणाची पत्नी म्हणाली, 'आपण हिरवा पाचू घेऊं या म्हणजे कोणतेही कष्ट न करता सर्वांना पोटभर अन्न मिळेल. ब्राह्मणाचा मुलगा महत्त्वाकांक्षी होता. तो म्हणाला, 'बाबा, तो लाल घ्या! म्हणजे वाटेल तेवढे सैन्य उत्पन्न करतां येईल. त्या जोरावर मी सेनापती बनेन.' तेवढ्यांत

कन्या म्हणाली, 'नको बाबा. तें पिवळे रत्नच द्या. द्रव्य मिळाले की वाटेल ती वस्तू घेतां येईल अगोदर पैसा हवा.' शेवटी सून म्हणाली, 'मी तुमच्या घरांत आल्यापासून लंकेची पार्वतीच आहे, तेव्हा तो नीलमण मागून द्या. म्हणजे मला हवा तो अलंकार मागतां येईल. मग माहेरी दिमाखानें जाईन.'

चौघांची चार मतें पडली व ते एकमेकांत चर्चा करू लागले. हळूहळू चर्चेला भांडणाचें स्वरूप आले. ते पाहून ब्राह्मण तेथून निघाला व विक्रमराजाकडे येऊन म्हणाला, 'सरकार, माझ्या घरांतील चौघांची चार तऱ्हेची मतें पडली. म्हणून मला एकही रत्न देऊं नका. त्या रत्नामुळें घरांत कलहच माजेल.'

ब्राह्मणाचे शब्द ऐकतांच विक्रमराजानें ब्राह्मणाला ती चारही रत्ने देऊन टाकली.

राजाच्या मनाचा मोठेपणा पाहून ब्राह्मण आनंदाश्रू गाळूं लागला. विक्रमराजा त्याला म्हणाला, 'तूं माझाच प्रजाजन, आहेस, मग रत्ने तुझ्याजवळ असली काय किंवा माझ्याजवळ असली काय ?. एकच ! तेव्हां तूं ही चारही रत्नें घेऊन खुशाल घरी जा.'

ब्राह्मण आनंदाने घरी निघून गेला हे भोजराजा, तुझे औदार्य एवढे मोठे आहे कां ? तसे असेल तरच या सिंहासनावर बस !

औदार्याची ही गोष्ट ऐकून भोजराजा मनांत फारच खजिल झाला. आपण स्वतःला फार मोठे समजतो, पण विक्रम राजा-

समोर आपण अगदीच क्षुद्र आहोंत हे त्याला पटले आणि पुढील गोष्ट ऐकण्याची त्याची उत्सुकता फारच वाढली.

●

## कथा पांचवी

रात्र पडतांच भोजराजा सिंहासनाजवळ गेला. पांचव्या परीच्या केसांना हळूंच हात लावतांच ती 'जयघोषा' नांवाची सुवर्ण पुतळी म्हणाली—

भोजराजा, विक्रमासारखा जो पुरुष उपकार स्मरणारा असेल त्यालाच या सिंहासनावर बसता येईल.

'राजा विक्रम कसा काय उपकार जाणत होता ते ऐकायची माझी इच्छा आहे.'

'मग ऐक तर'—जयघोषा पुतळा बोलूं लागली.

अवंतीनगरीत देवदत्त नांवाचा एक अग्निहोत्री ब्राह्मण राहात असे. एकदां समिधा आणण्यासाठीं म्हणून तो रानांत गेला होता. दैवयोगानें राजा विक्रमहि एका सिंहाच्या मागें लागून त्याच रानांत शिरला. दाट झाडीत तो सिंह दिसेनासा झाला आणि मग विक्रमहि वाट चुकला. तो इकडे तिकडे कुणी दिसते आहे कां ते बघूं लागला.

देवदत्तानें राजाला पाहिले. त्याने त्याला आपल्या पर्णकुटींत नेले व त्याना जेवढा शक्य होता तेवढा आदरसत्कार केला. राजाला गोड फळें व थंडगार पाणी आणून दिलें. राजा फा:

खूष झाला. थोडा वेळ विश्रांति घेऊन राजा जायला निघाला. पण ब्राह्मण त्याला वाट दाखविण्यासाठीं म्हणून नगरापर्यंत आला .नगरांत येतांच राजानें ब्राह्मणाला खूप द्रव्य दिले व सांगितले, 'मी तुमचा ऋणी आहे. तुम्ही केलेला उपकार माझ्या हातून कधींच फिटणार नाहीं.'

ब्राह्मण संतुष्ट होऊन घरी निघून गेला. त्या दिवसापासून तो ब्राह्मण दरबारांत अधूनमधून येत असे. विक्रमराजाचे अनेक गुण पाहून तो फार संतुष्ट झाला.

एक दिवस त्याला वाटले, राजानें आपला उपकार न फिटण्याचें जें भाषण केले ते खरे आहे का खोटे ते पाहूं या.

आतां ब्राह्मण सर्वांना परिचित झाला होता. एक दिवस राजाच्या चार वर्षांच्या मुलाला घेऊन कोणासहि न सांगता तो आपल्या पर्णकुटीत आला.

'राजपुत्र हरवला' हें कळतांच विक्रमराजा दुःखी झाला. सर्वत्र राजपुत्राचा तपास सुरूं झाला. रानेवने सैनिकांच्या बोलण्याचालण्यानें गजबजूं लागली. देवदत्त ब्राह्मणानें राजपुत्राचा एक दागिना आपल्याजवळ रहाणाऱ्या गुराख्याजवळ दिला व त्याला सांगितलें—'हा नगरींत जाऊन विकून ये.' गुराखी सरळ मोठ्या पेढीवर गेला. तेथील जवाहिऱ्यानें राजपुत्राचा दागिना ओळखला. त्यानें विचारले, 'हा दागिना तुला दिला कोणी ?'

'आमच्या देवदत्त बामनानें. देवमाणूस हाय तो.'

‘ असं ? कोण आहे तिकडे ? याला पकडून ठेवा, आणि देवदत्त ब्राह्मणाला पकडून दरबारांत घेऊन या. ’ जवाहिऱ्यानेच हुकूम सोडला आणि तो दागिना घेऊन दरबारांत गेला.

थोड्याच वेळांत देवदत्त ब्राह्मणाला मुसक्या बांधून दरबारांत हजर केलें. राजानें प्रथम त्याच्या मुसक्या सोडायचा हुकूम दिला. त्याला उत्तम आसन दिलें व नम्रपणें विचारले, ‘ विप्रराज, आपल्याला ही वस्तू कोठें सांपडली ? ’

‘ राजा, तुझा पुत्र मी दागिन्याच्या लोभानें ठार मारला. हा दागिना त्याचाच आहे व मीच त्या गुराख्याजवळ विकायला दिला होता.’

ब्राह्मणाचे हे शब्द ऐकतांच सर्व दरबार खवळला. या दुष्ट ब्राह्मणाला देहान्त प्रायश्चित्त द्या असें सर्वांनीं सांगितलें.

पण राजाने सर्वांना शांत केले व म्हटलें, ‘ हे देवदत्ता, तूं माझा पुत्र मारलास तेव्हां तूं दोषी आहेस ! पुत्रशोकानें मी व्याकूळ झालो आहे. तरीहि तूं माझेवर जो उपकार केला होतास तो मी विसरलेलो नाहीं. तेव्हां मी तुला सोडून देत आहे. प्रधानजी, ‘ ह्याला पुष्कळ द्रव्य बक्षीस द्या, म्हणजे परत तो कधीहि कुणा निष्पाप मुलाचा केवळ पैशासाठी वध करणार नाहीं.’

राजाचे हे शब्द ऐकतांच देवदत्त ब्राह्मणाचे डोळे अश्रूंनी भरून आले. तो म्हणाला, ‘राजा, तूं धन्य आहेस ! धन्य आहेस !’ खरे, मला वनांत राहाणाऱ्या ब्राह्मणाला द्रव्य हवें कशाला ? मी तुझी सत्त्वपरीक्षा पहाण्यासाठीं हे नाटक केलें. तुझा मुलगा अगदीं

सुखरूप आहे. मजेंत आहे.' तुझ्यासारख्या पुण्यवान माणसाची परीक्षा पाहिली त्याबद्दल मला फार पश्चात्ताप होतो आहे. एवढें 'बोलून देवदत्त ब्राह्मण निघून गेला. त्यानें राजाचा मुलगा राजवाड्यांत पाठवून दिला.

हे भोजराजा, तूं इतका श्रेष्ठ असलास तरच या सिंहासनावर बस. भोजराजा फक्त हंसला व आपल्या महालाकडे निघून गेला.

## कथा सहावी

भोजराजा रात्रीची वाटच पहात होता. रात्र होतांच तो उठला व सिंहासनाजवळ जाऊन उभा राहिला. सहाव्या पुतळीच्या हातांतील अंगठीला हात लावतांच ती 'लीलावती' नांवाची सुवर्णपुतळी म्हणाली, 'हे राजा, विक्रमराजासारख्या गुणज्ञ माणसाचीच या सिंहासनावर बसण्याची लायकी आहे.'

'विक्रमराजा खरा गुणज्ञ होता?'

होय! त्याचीच एक कथा तुला सांगते. ऐक हं—

एक दिवस काय झाले! विक्रमराजाचे दरबारांत एक जवाहिऱ्या आला. या माणसाजवळ एक इतकें सुंदर रत्न होते कीं ते पाहूनच बघणाराचे डोळे दिपून जात.

विक्रमाने आपल्या दरबारांतील जवाहिऱ्यांना बोलावले व त्यांना या रत्नाची किंमत करण्याचा हुकूम दिला. त्यांनी या रत्नाची किंमत एक कोटी सुवर्णमुद्रा केली. पण विक्रमालाच ही किंमत कमी वाटली म्हणून त्यानें त्या जवाहिऱ्याला दहा

कोटी मोहरा देण्याचा हुकूम दिला. शिवाय अशीच आणखी दहा रत्नें घेऊन एक महिन्याचे आंत दरबारांत परत यावे अशी आज्ञा केली.

राजाज्ञा मान्य करून तो जवाहिऱ्या आपल्या देशांत गेला. त्याला विक्रमराजाच्या मनाचा मोठेपणा फ़ार आवडला होता. त्याने आणखी दहा रत्नें घेतली व तो परत अवंतीला येण्यासाठीं वाट चालू लागला.

पावसाळ्याचे दिवस होते. जातां जातां त्याला एक नदी लागली. नदीला पूर आला असल्यानें त्याला नदीकांठच्या गांवी थांबणें भागच पडले. त्या गांवात रामदास नांवाचा एक सावकार होता. त्याच्याकडे हा जवाहिऱ्या उतरला. जवाहिऱ्याने गप्पा मारता मारता रामदासाला सारी हकीकत सांगितली. आतां जर मी येथें अडकून पडलो तर महिन्याचे आंत मी अवंतीला पोहोचूं शकणार नाहीं. राजाज्ञेचा भंग झाला तर राजा मला शासन करील, तरी आतां काय करावे ?

तो सावकार म्हणाला, 'हे बघ ! या दहांपैकीं पांच रत्नें जर मला देशील तर मी तुला अवंतीला पोहोंचवतो. आज्ञा मानणे हे राज्याचे फळ, ब्रह्मचर्य हे तपाचें फळ, अभ्यासाचे फळ विद्या. मनानें भोग आणि दान करणे. तेव्हां राजाज्ञा मोडायला नको असेल तर मला पांच रत्नें दे.'

आज्ञामात्रफलं राज्यं ब्रह्मचर्यफलं तपः ।
परीज्ञानफला विद्या दत्तभुक्तफलं धनम् ।।

राजाज्ञेला घाबरून जवाहिऱ्या कबूल झाला. त्याने रामदास

सावकाराला पांच रत्नें दिली व तो नावेंत बसून अवंतीला आला.

दरबारांत येतांचा विक्रमराजाला त्यानें सर्व हकीकत सांगितली. राजाज्ञा मोडूं नये म्हणून आपण ती पांच रत्नें रामदास सावकाराला दिल्याचें कबूल केलें. राजाचे दूताकडून ती बातमी आलीच होती.

विक्रमराजानें विचार केला, हा जवाहिऱ्या प्रामाणिक आणि साधाभोळा दिसतो आहे. राजाज्ञा मोडल्यास दोष लागतो हे खरेंच आहे.

आज्ञाभंगो नरेंद्राणा विप्राणां मानखंडनम् ।
पृथक शय्या च नारीणामशस्त्रवध उच्चते ।

राजाज्ञा मोडणें, ब्राह्मणाचा उपमर्द करणें, पत्नीला कारणावांचून वेगळ्या शय्येवर झोपायला लावणें म्हणजे त्याचा वध केल्यासारखेंच आहे.

जवाहिऱ्यानें आपली आज्ञा पाळली हा आपला सन्मानच आहे. तेव्हां याला कांहींतरी देणें उचित आहे.

मनांत येतांच विक्रमराजानें त्या जवाहिऱ्याला दहाहि रत्नांची पूर्ण किंमत देऊन टाकली. शिवाय ती पांच रत्नें बक्षीस म्हणून परत दिली.

भोजराजा, तुझ्यांत असें औदार्य आहे कां? इतके श्रेष्ठ गुण आहेत कां? नाहीं ना? मग तूं या सिंहासनाची उगाच आशा कां धरतोस? येथें रोज कां येतोस?

'मला आपल्या गोष्टी ऐकायला आवडतात, तेव्हां मी रोज येथें येणारच!' असें म्हणून भोजराजा आपल्या महालाकडे वळला.

# कथा सातवी

संध्याकाळ झाल्यावर राजाला गोष्ट ऐकण्याचे वेध लागले. रात्र पडताच तो सिंहासनाजवळ गेला. सातव्या पुतळीच्या कानाला हात लावतांच ती 'मंजुघोषा' नांवाची सातवी पुतळी म्हणाली—

'भोजराजा, दुसऱ्याची इच्छा तृप्त करणें हा गुण विक्रम-राजासारखा तुझ्यांत असेल तरच या सिंहासनावर बैस!'

'विक्रमराजांत? तो गुण होता हे कशावरून?'

'कशावरून? मग मी ही कथा सांगते ती ऐक—'

एकदां वसंतऋतूच्या आगमनाने सृष्टी सौंदर्यानें बहरली होती. याच वेळी राजा सहज चंपकवनांत गेला होता. तेथें एक सुंदर-स्वच्छ पाण्यानें भरलेलें तळें होते. तळ्यांत कमळें फुललेली होती. हंसपक्षी विहार करीत होते. तळ्यांभोवती लतावेलींची दाट जाळी होती. मोठे मोठे वृक्ष होते. अमृत वृक्षावर कोकिळा गात होत्या, मोर थयथय नाचत होते. जाईजुई, चमेली, मोगरा बहरून आलेली हाती. त्यांच्या सुगंधाने वातावरण सुगंधमय झाले होते.

राजा विक्रमाला ही शांत जागा फार आवडली. त्यानें तेथेंच एक सुंदर महाल बांधला. महालासमोर हौद तयार केले गेले. त्यांत कारंजी उडूं लागली. विक्रमराजा आपल्या आवडत्या स्त्रियांसह या ठिकाणी येऊन जलक्रीडा करीत असे.

याच वनांत एक साधू रहात होता. स्वर्गसुखाच्या इच्छेनें तो जपतप करीत असे. त्याने विक्रमराजाचे वैभव, त्याच्या सुंदर स्त्रिया, त्यांची जलक्रीडा हे पाहिले. त्याला वाटूं लागले, 'या पृथ्वीवरचे हे असें सुख सोडून स्वर्गसुखाची इच्छा करण्यांत काय अर्थ आहे पृथ्वीवर या जीवनांत अनेक कष्ट भोगायचे आणि मग परलोकांत सुख मिळेल अशी आशा करायची. त्यापेक्षां याच जीवनात विषयसुख भोगावें हें उत्तम!'

हा विचार मनांत येतांच तो साधू विक्रमाजवळ आला. विक्रमराजानें त्याचा योग्य तो आदरसत्कार केला व 'काय इच्छा आहे?' असें विचारलें

साधू म्हणाला, हे श्रेष्ठ राजा, मी बरेच दिवस तप करीत आहे. कालच मला देवीनें दृष्टांत दिला कीं, तूं आतां तप पुरे कर. मी प्रसन्न झाले आहे. आतां तूं विक्रमराजाजवळ जा व त्याला संसारसुखाच्या अनुभवाबद्दल विचार. त्याच्यासारखें संसारसुख भोगायची मला देवीची आज्ञा आहे, तेव्हां माझी ही इच्छा पूर्ण कर.'

साधूचे हे भाषण ऐकतांच विक्रमराजा मनांतच हंसला. मनांत म्हणाला—'देवीचा दृष्टांत असो या नसो, माझें हे संसारसुख, ही जलक्रीडा, या सुंदर स्त्रिया हे सारे पाहून या साधूला संसाराची इच्छा झाली आहे हे खरें! तेव्हां ती पूर्ण करणें आतां आपलें कर्तव्य आहे,' असें म्हणून तो पुढच्या तयारीला लागला.

राजानें साधूला तेथेंच चंपकवनाचा राजा नेमले. त्याला रत्नें, दागदागिने सर्व दिले. एक नगर वसवून दिले. सुंदर अशा सहा तरुणींशी त्याचा विवाह करून दिला. तो तपस्वी आतां सर्व प्रकारची संसारसुखे भोगू लागला. संतुष्ट झाला आणि मनांतल्या मनांत विक्रमराजाबद्दल त्यानें 'धन्य! धन्य नृपति!' असे उद्गार काढले.

तुझें मन विक्रमासारखे आहे का? असे असेल तरच या सिंहासनावर बस!

भोजराजा कांहींच बोलला नाहीं. विक्रमराजाला मनांतच प्रमाण करून तो तेथून निघून गेला.

## कथा आठवी

आतां हे चोवीस तास कसे काढावेत याची भोजराजाला काळजी पडली. तो आपल्या राणीबरोबर पट खेळत बसला. डाव रंगात आला होता, पण अंधार पडल्याचे लक्षांत येतांच भोजराजा उठला व सिंहासन ठेवलेल्या महालांत गेला.

आठव्या सुवर्ण पुतळीच्या डोळ्याला स्पर्श करतांच ती 'जयसेना' नांवाची पुतळी राजाला म्हणाली—

'हे भोजराजा, तूं विक्रामासारखा साहसी आहेस कां? तसा असशील तरच या सिंहासनावर बैस!'

'विक्रमराजा साहसी होता?'

'म्हणजे! यांत विचारण्यासारखे काय आहे? मी त्याची एक कथाच तुला सांगते. ऐक—'

अवंतीनगरांत धनशेटनामा नांवाचा एक फार श्रीमंत सावकार होता. एके दिवशीं धनशेटनामा फार आजारी पडला. शारीरिक दुःख सहन करीत असतांना त्याच्या मनांत आलें, अरेरे, व्यर्थ मी इतका पैसा मिळवण्यासाठीं धडपडलों. या मृत्यु-लोकांत आयुष्याची खात्री नसतांना धनाचा लोभ केला. आतां यापुढें शहाण्यासारखे वागावे. आपले धन सत्कार्यात वेचावें. दानधर्म करावा. धनाचा लोभ धरला कीं ऐहिक सुखही लाभत नाहीं. पारलौकिक सुखाचा लाभ तर मिळत नाहींच. तेव्हां यापुढें आपण आपले आयुष्य सत्संगतीत घालवावे.

कांहीं दिवसांनीं धनशेटनामा बरा झाला. त्यानें ब्राह्मणांना बोलावले व सर्व धनाचा दानधर्म केला. अनेक तीर्थयात्रा केल्या. एकदां एका तीर्थस्नानाहून परत येत असताना त्याला समुद्राचे कांठी असलेले एक देवालय दिसले. धनशेटनामा देवळांत गेला. त्यानें देवीचें दर्शन घेतले. पण सभोंवताली बघतांच त्याच्या हृदयांत एकदम धस्स झाले देवीच्या डाव्या उजव्या हाताला अनेक स्त्री-पुरुषांची धडे व मस्तके पडलेलीं होती. धनशेटनामानें सर्वांकडे बारकाईनें लक्षपूर्वक पाहिले. उजव्या बाजूला भिंतीवर कांहीं अक्षरें खोदलेली होती. धनशेटनामाने मोठ्या उत्सुकतेने तो मजकूर वाचला. ' जो पुरुष अचाट करणीचा असेल त्यानें आपल्या हातानें आपलें मस्तक देवीसमोर तोडावे म्हणजे हे स्त्री-पुरुष जिवंत होतील. '

या सर्व प्रकारचे धनशेटनामाला आश्चर्य फार वाटले. तीर्थयात्रा

संपवून तो अंवतीला परत आला. रिकाम्या हातानें राजा, देव, गुरु, ज्योतिषि, वैद्य आणि मित्र यांचे दर्शन घेऊं नये. शक्तीप्रमाणे फलादिक जे अनुकूल असेल ते पुढे ठेवून काय बोलणें असेल ते बोलावे.

रिक्तपाणिर्प पश्येत राजानं देवतां गुरुम् ।
दैवज्ञं भिषजं मित्रं फलेन फलमादिशेत् ॥

या सिद्धांताप्रमाणें देवीचा प्रसाद व कांहीं बहुमोल रत्नें घेऊन धनशेटनामा राजा विक्रमाचे दर्शनास गेला. राजासमोर आपली भेट ठेवली राजानें त्याला कुशल वृत्त विचारलें. प्रवासांत कुठें कांहीं चमत्कार पहावयास मिळाला कां ? असेंहि विचारलें.

तेव्हां शेटजीनें देवीचे देवळांत पाहिलेला प्रकार व भिंतीवर लिहिलेला मजकूर राजाला सांगितला. विक्रमराजाला फार आश्चर्य वाटले. तो लगेच धनशेटनामाबरोबर त्या देवीचे देवळांत जावयास निघाला.

देवीचे देऊळ आलें. तेथील दृश्य पाहिल्यावर विक्रमाला त्या मेलेल्या स्त्री–पुरुषांची करुणा आली. या अभागी लोकांसाठीं आपले शिरकमल अर्पण करायला तो तावडतोब तयार झाला.

मानेवर तो करणार तोंच देवीने प्रकट होऊन राजाचा हात वरचेवर धरला. देवी कोमल स्वरांत त्याला म्हणाली, ' विक्रमा ! तूं दुसऱ्यासाठीं आपला प्राण कां देतोस ? '

' देवी, जगदंबे माते, सर्वांनी सुखी असावे. या जगांत कुणालाही दुःख होऊं नये अशी माझी इच्छा आहे; पण ते माझ्या हातांत नाहीं. कांहीं लोकांचे दुःख जर माझ्या एका

प्राणाच्या बलिदानानें दूर होत असेल तर मी स्वतःच प्राणत्याग करायला केव्हांही तयार आहे.'

'शाबास! विक्रमा शाबास! तूं धन्य आहेस. तुझ्या पुण्याईनें हे स्त्री–पुरुष जिवंत होतील! एवढे बोलून देवी गुप्त झाली.

राजा भानावर आला. मेलेले स्त्री- पुरुष उठून बसले होते. धनशेटनामा 'आ! वासून सर्व बघत होता. विक्रमाचे धाडस पाहून तो थक्क झाला होता. विक्रमानें त्यांतील एकाला तेथील गादीवर बसविले. देवीचें देऊळ बांधण्यासाठीं खूप द्रव्य दिले. आणि आपण धनशेटनामाबरोबर अवंतीला परत आला.

भोजराजा, तुझें धैर्य एवढे मोठे आहे कां? तुझे मन एवढे विशाल आहे कां? तसे असेल तरच या सिंहासनावर बसायचा प्रयत्न कर.

राजा विक्रमाची गोष्ट ऐकून भारावलेला भोजराजा आपल्या महालाकडे वळला. मात्र स्वप्नातहि त्याला राजा विक्रमच दिसत होता.

## कथा नववी

भोजराजा सौधावर बसला होता. पट्टराणी कांहींतरी सांगत होती. सेवकानें सुवर्णाच्या ताटांत कांहीं फराळाचें पदार्थ आणून ठेवले होते, पण राजाचे तिकडे लक्षच नव्हते.

सूर्य पश्चिमेचा निरोप घेऊन हलकेच निघून गेला. भोजराजा

भानावर आला. फराळाचें ताट दूर सारून तो सिंहासनाजवळ आला. त्यानें नवव्या पुतळीच्या नुपुराला स्पर्श केला. त्याबरोबर ती 'मदनसेना' नांवाची पुतळी म्हणाली, 'राजा, विक्रमासारखा तूं धैर्यवान असशील तरच या सिंहासनाचा लोभ ठेव!'

'विक्रमराजाच्या धैर्याची एकादी गोष्ट सांगा म्हणजे मग माझे मत ठरवतो—'

'असं म्हणतोस. बरं! मग ऐक तर—'

गावाः पश्यंति गंधेन, वेदैः पश्यंति वाडवाः ।
चारैः पश्यंति राजानश्चक्षुर्म्यामितरे जनाः ॥

पशु वासानें एकादी गोष्ट ओळखतात, ब्राह्मण लोक वेदांच्या सहाय्यानें पहातात, दुतांच्या तर्फे राजे सर्व जाणतात आणि सामान्य लोक डोळ्यांनीच बघतात.

या सिद्धांताप्रमाणे हेरांचे जाळे पसरणाऱ्या विक्रमाला अवंतीला राहून सर्व देशोदेशींच्या बातम्या समजत असत.

एकदां काश्मीरला असणाऱ्या दूताकडून निरोप आला, 'या देशांत निर्जलपूर नांवाचे एक गांव आहे. या गांवात पाण्याची नेहमीच टंचाई भासत असे. एकदां येथें दुष्काळ पडला असतांना येथील हरिदास नांवाच्या सावकारानें लाखो रुपये खर्च करून एक तलाव बांधला. तलाव बांधल्यामुळें गांवकऱ्यांची तर सोय झालीच, पण त्या पाण्यांतून पाट काढून त्यावर शेतीहि छान पिकूं लागली. उदार सावकारानें ही शेते ब्राह्मणांना दान देऊन टाकली.

कांहीं दिवस गेले. सध्यां त्या तळ्यांत एक देवी येऊन राहिली आहे. देवीनें सर्व तळ्यांतले पाणी शोषून घेऊन तळें कोरडे केले आहे. त्या सावकाराला देवीनें दृष्टान्त देऊन असे सांगितले कीं, 'तूं एवढें मोठें तळे बांधलेस. पण बळी दिला नाहीस म्हणून मी कोपले आहे. आतां जर मला बत्तीस लक्षणांनी युक्त असलेल्या पुरुषाचा बळी दिलास तरच मी संतुष्ट होईन. मग मात्र या तळ्याला सदोदित पाणी राहील'

सावकाराने एक मोठा सोन्याचा पुतळा तयार करून त्या तळ्यांत ठेवला आहे. शेजारीच एका पाटीवर त्यानें लिहून ठेवलें आहे—'एखाद्या बत्तीस लक्षणी उदार पुरुषाने आपले शिर या तळ्यांतील देवीस अर्पण केले तर त्याच्या नातेवाई-कांस हा पुतळा बक्षीस म्हणून दिला जाईल.'

विक्रम राजाने हा सर्व वृत्तान्त ऐकला. लगेच कांहीतरी निश्चय करून राजा स्वतःच जासुदाबरोबर निघाला. दोघेजण निर्जलपूरला आले. विक्रम एका गरीब ब्राह्मणाकडे उतरला. त्या ब्राह्मणाला हरिदास सावकाराकडे जाऊन 'या तळ्याला पाणी आले तर सोन्याचे पुतळ्याशिवाय आणखी काय द्याल ते स्वतःचे हाताने लिहून द्या?' असें सांगायला सांगितलें.

विक्रमराजाच्या व्यक्तिमत्वानें भारावलेला तो ब्राह्मण सावकाराकडे गेला. हरिदास सावकाराने त्याला स्वतःच्या सहीने लिहून दिलें कीं, 'जर तळ्याला पाणी आलें तर मी पुतळ्याशिवाय आणखी पन्नास हजार रुपये रोख देईन.' ही चिठ्ठी घेऊन ब्राह्मण परत आला.

नंतर विक्रम राजानें एका चिठ्ठीवर लिहून ठेवलें- 'मी माझें शिर स्वखुषीनें देवीला अर्पण करतो आहे. तळ्याला पाणी आल्यानंतर या गरीब ब्राह्मणाला ठरल्याप्रमाणें तो पुतळा व पन्नास हजार रुपये मिळावेत.

झाले! अशी चिठ्ठी लिहून ठेवून राजा विक्रम एकटाच त्या तळ्याकडे गेला. देवीची स्तुती करून, नम्रपणें प्रणाम करून राजा म्हणाला, 'हे देवी, मी बत्तीस लक्षणी पुरुष तुला माझें शिर अर्पण करतो आहे. आतां संतुष्ट हो व या तळ्याला भरपूर पाणी लागूं दे.' असें म्हणून तलवार उपसून राजा विक्रम स्वतःवर वार करणार तोच देवी प्रकट झाली. हंसत हंसत ती राजाला म्हणाली, 'राजा मी तुझ्यावर प्रसन्न आहे, काय हवे ते माग!'

'देवी, हे तळे पाण्यानें सदोदित भरलेले राहावे एवढेच मला दे.'

'तथास्तु, देवी म्हणाली, आणि दुसऱ्याच क्षणी तळे पाण्यानें कांठोकांठ भरलें. राजा विक्रमानें सावकाराला सर्व हकीकत सांगून तो पुतळा व रोख पन्नास हजार रुपये त्या ब्राह्मणाला द्यावयास लावले. तो दरिद्री ब्राह्मण हे सारे ऐकून इतका आश्चर्यचकित झाला की, त्याचे तोंडून शब्दच बाहेर पडेना.

राजा अवंतीला परत जायला निघाला तेव्हां तो ब्राह्मण म्हणाला, 'हे राजा, लोककल्याणासाठी स्वतःच्या शरीराचीहि

तुला पर्वा नाहीं. तुझी कीर्ति हे चंद्रसूर्य प्रकाशत आहेत तोपर्यंत प्रकाशत राहील. माझा आशीर्वाद कधींहि खोटा होणार नाहीं.

विक्रमराजानें त्या ब्राह्मणाला प्रणाम केला व तो अवंतीला निघून आला.

हे राजा, तुझे औदार्य एवढे मोठे असेल तरच तूं या सिंहासनावर बैस. भोजराजा कांहींच बोलला नाहीं. पुढील कथेची उत्सुकता मनांत साठवून ठेवत तो आपल्या अंतःपुरात शिरला.

## कथा दहावी

विक्रमराजाच्या गोष्टी ऐकान्यात तो त्या व्यक्तीबद्दल आदर वाढत जातो आहे, हे भोजराजाचे लक्षात येऊं लागले. आपल्या वागण्यांत किती स्वार्थीपणा आहे याचीही त्याला जाणीव होऊं लागली. त्याला निराळी दृष्टी प्राप्त झाली आज दहावी पुतळी काय सांगते ते ऐकण्यासाठी तो आतुर झाला होता.

भोजराजाने दहाव्या सुवर्ण पुतळीच्या कंकणाला हात लावताच ती 'मदनमंजिरी' मंजुळ आवाजांत म्हणाली, 'तुझा पराक्रम राजा विक्रमासारखा असेल तर या सिंहासनावर बैस!'

'विक्रमराजाचा पराक्रम कसा होता ?

'तेच सांगते ऐक' मदनमंजिरी सांगू लागली. विक्रमराजाच्या एका उपाध्यायाचे नांव 'शंकरशर्मा' होतें. त्याच्या मुलाचें नांव होते कमलाकर. कमलाकर सोळा वर्षांचा झाला.

पण त्याचे विद्याभ्यासाकडे अजिबात लक्ष नव्हतें. बापाला कमलाकराबद्दल फार चिंता वाटे. तो मुलाला कळवळून सांगे, ‘बाळा, अरे विद्येशिवाय पुरुषाचे जिणें व्यर्थ आहे.’ म्हटलेंच आहे.

विद्यावित्तविहीनेन किं कुलीनेन देहिना ॥
अकुलीनोऽपि यो विद्वान दैवतैरपि पूज्यते ॥

ज्या पुरुषाजवळ विद्या व धन नाहीं तो कितीही मोठ्या कुळातला असला तरी त्याला कुणी विचारत नाहीं. पण नीच कुळांतही एखादा विद्वान जन्मला तर देवहि त्याची पूजा करतात.

वडिलांनी सांगितलेले कमलाकराला फार उशिरा पटले. पण आतां वय वाढले होते. विक्रमराजासारखा लोकोत्तर राजाहि विद्वानास पुष्कळ पैसे देतो. त्यांचा सन्मान करतो, पण मूर्ख, अशिक्षित लोकांशी तो भाषणहि करीत नाहीं. तेव्हां आपल्याला मोठेपणा हवा असेल तर विद्या मिळविलीच पाहिजे. मग आतां काय करावें ? शेवटी त्याने ठरवले, हा देश सोडून जावे व तेथें अभ्यास करावा.

मनांत येतांच तो काश्मीरला निघून गेला काश्मीरला विश्वंभरभट्ट उपाध्याय फार मोठा विद्वान माणूस होता. कमलाकर त्याचे घरी गेला. विश्वंभरभट्टाच्या पाया पडून कमलाकरानें त्यांना सर्व हकीकत सांगितली. नंतर तो तेथेंच राहिला. त्यानें उपाध्यायाची चांगली सेवा केली त्यामुळें तो प्रसन्न झाला व आपल्याजवळील सर्व विद्या त्यानें कमलाकराला शिकवली. म्हटलेंच आहे—

२८३६ ११।१० आ. पा.

गुरुशुश्रुषया विद्या विपुलेन धनेन वा ।
अथवा विद्यया विद्या चतुर्थं नोपलंभ्यते ॥

विद्याप्राप्तीचे फक्त तीन मार्ग आहेत. एक गुरूच्या सेवेनें पुष्कळ धनाने किंवा आपली विद्या सांगून दुसऱ्याजवळची विद्या घ्यावी. या तीन उपायावांचून विद्याप्राप्तीचा चौथा उपायच नाहीं.

आतां कमलाकर श्रेष्ठ विद्वान झाला. गुरूची आज्ञा घेऊन, आशीर्वाद घेऊन तो आपल्या गांवाला यायला निघाला. वाटेत तो कांतीपुराला थांबला होता. त्या नगरांत 'नर-मोहिनी' नांवाची एक नायकीण रहात होती. ती फारच सुंदर होती. कमलाकरानें त्या स्त्रीला पाहिलें. पहिल्याच भेटीत त्याचें तिच्यावर प्रेम बसले. त्यानें तसे बोलून दाखव-तांच शेजारच्या लोकांनी त्याला सांगितले, 'हिच्या घरीं जो पुरुष जातो त्याला कोणी तरी राक्षस ठार मारतो.'

हे ऐकताच कमलाकर खिन्न होऊन अवंतीनगरीला परत आला. नगरीत परत आल्यावर त्यानें राजाचें दर्शन घेतले. राजानें मोठ्या प्रेमाने त्याला सर्व हकीकत विचारली. त्याच-प्रमाणें कुठें कांहीं नवल विशेष पाहिलें कां ? असेहि विचारले.

कमलाकराने सर्व हकीकतीबरोबर 'नरमोहिनीची' हकीकत राजाला सांगितली. त्याच्या नुसत्या बोलण्यावरून विक्रमराजाने ओळखले. नरमोहिनीवर कमलाकराचे प्रेम बसले आहे.

वेधा द्वेधा भ्रम चक्र कांतसु कनकेषु च ।
तासु तेष्वप्यनासक्तः साक्षाद्भर्गो नराकृतिः ॥

या जगामध्ये प्राण्यांना मोहीत करणारे असे दोन पदार्थ ब्रह्मदेवानें उत्पन्न केलें आहेत. एक स्त्री व दुसरें धन. यास पाहून जो प्राणी भुलत नाहीं तो केवळ महादेव जाणावा.

मग विक्रमराजाने ठरवले, आपण कांतिपुरी जाऊन प्रत्यक्ष सर्व पाहून यावयाचे. त्याप्रमाणें तो कांतिपुरी गेला. प्रथम नरमोहिनीचे घरीं जाऊन त्यानें त्या राक्षसास ठार मारले.

नरमोहिनीची फार मोठी चिंता दूर झाली. नरमोहिनी ही बोलून चालून वेश्या होती. कलावंतीण होती. या बाईच्या नादी लागून कमलाकरासारखा विद्वान वाया जाऊं नये म्हणून विक्रमानें त्या स्त्रीची सर्व आभूषणें काढून घेतली. तिने केस मोकळे सोडले. मग अशा अवतारांत तिला कमलाकरासमोर उभें केलें. आतां तिचें सौन्दर्य फारच कमी दिसूं लागलें. कमलाकराच्या मनांतील तिच्याविषयींचें आकर्षण एकदम कमी झाले. याचाच फायदा घेऊन विक्रमराजा पुढें म्हणाला, ‘ हे कमलाकरा, तूं या स्त्रीवर काय म्हणून भाळलास ? अरे हें रत्न म्हणजे मांसाचे गोळे आहेत. हे तिचे तोंड म्हणजे थुंकी लाळ यांनी भरलेलें आहे. अशा स्त्रीचा अंगिकार करायचा तो फक्त संतति उत्पन्न करण्याकरितांच करावा. उगाच तिच्या आहारी जाऊं नये.

कमलाकराला हे विवेचन पटले. नंतर एका कुलीन सुंदर ब्राह्मण कन्येबरोबर विक्रमराजानें कमलाकराचा विवाह लावून दिला. त्याला खूप द्रव्य दान केलें. कमलाकराचा संसार फार सुखाचा झाला.

●

## कथा अकरावी

प्रजेच्या सुखासाठी झटणाऱ्या, सामान्य माणसासाठींहि आपला वेळ खर्च करणाऱ्या विक्रमराजाची पुढील कथा ऐकण्यासाठीं भोजराजा मंदिरांत दाखल झाला.

अकराव्या सुवर्णपुतळीच्या पैजणांना हळूच हात लावतांच ती 'शृंगारकलिका' नांवाची पुतळी म्हणाली,

'राजा, तूं विक्रमराजासारखा दयाळू असशील तरच या सिंहासनावर बैस! त्याच्या दयाळूपणाची एक कथा मी तुला सांगतो ऐक—

नर्मदेच्या काठावर एक योगी योगाभ्यास करीत होता. त्याची कीर्ति अवंतीनगरीपर्यंत पोहोचली होती. विक्रमराजानें या योगी पुरुषाला राजधानीत घेऊन येण्यासाठीं पालखी पाठवली. पण त्या योग्यानें राजाची पालखी परत पाठवून राजाला निरोप सांगितला—' हे राजा, मला ऐहिक गोष्टींचा अजिबात मोह नाहीं; मग मला राजाजवळ येण्याचें काय कारण आहे?'

आशाया ये दास्ताते दासास्ते: सर्वलोकस्य ।
आशा येषां दासी तेषां दासायते विश्वम् ।।

म्हणजे जे आशेच्या स्वाधीन असतात ते लोकांचे दास असतात. पण आशा ज्यांचे स्वाधीन असते त्याचे सर्व लोक दास होतात.

लोभमूलानि पापानि व्याधमो रसमूलकाः ।

स्नेहमूलानि दुःखानि त्रयं त्यक्त्वा सुखी भवेत् ॥

म्हणजे पापाचें मूळ लोभ, रोगाचें मूळ आवडेल ते खाणे, दुःखाचे मूळ स्नेह हें होय. आणि म्हणूनच ही तीन ज्यानें सोडली आहेत तोच खरा सुखी होय.

हा निरोप ऐकतांच विक्रमराजा स्वतः योग्याचे दर्शनास गेला. त्याचा खरा मोठेपणा पाहून राजानें स्वतः त्याची पुष्कळ दिवस सेवा केली.

त्या सेवेमुळें तो योगी प्रसन्न झाला. आपल्या योगबलानें एक फळ उत्पन्न करून त्यानें विक्रम राजास दिलें व सांगितलें, ' हें फळ तूं खाल्लेस तर मरण येईपर्यंत तुला कोणताहि रोग होणार नाहीं. '

तें फळ घेऊन विक्रम राजा अवंतीला येत होता. वाटेत त्याला एक कुष्ठरोगी हातपाय झडून गेलेला दिसला. त्याला पाहून विक्रमाचें हृदय कळवळलें.

त्याचें दुःख पाहून विक्रम राजाला एवढे वाईट वाटले कीं, त्यानें आपल्याजवळचे ते फळ त्या रोग्याला दिलें. रोगी तें फळ खाताच एकदम निरोगी बनला. त्याने विक्रमराजाचे पाय आनंदाश्रूंनी भिजवून टाकले. आनंदित झालेला विक्रम अवंतीला परत आला. राजा, तुझें मन एवढें मोठें आहे का? असेल तरच या सिंहासनावर बैस !

# कथा बारावी

राजा भोज पट्टराणीशी गप्पा मारीत बसला होता. आपण ऐकलेल्या गोष्टी म्हणजे एक महाकाव्य आहे असेंच त्याला वाटत होते. या सुंदर काव्याची पुढली हकीकत जाणून घेण्यासाठीं तो अधीर झाला होता. गप्पांतहि त्याचे फारसे लक्ष नव्हतें.

अंधार पडतांच तो लगबगीनें सिंहासनाजवळ आला. बाराव्या सुवर्णपुतळीच्या केशकलापांतील फुलाला स्पर्श करतांच ती 'नरमोहिनी' नांवाची पुतळी बोलू लागली.

'हे भोजराजा, विक्रमराजासारखे परोपकार तुझ्या हातून होतील तरच तूं या सिंहासनावर बसू शकशील.

'विक्रमानें कोणकोणते परोपकार केले?'

'सांगते. ऐक हं—' ती पुतळी म्हणाली.

विक्रमराजानें आपल्या राज्यकारभारांत कांहीं नियम ठरवले होते. सहा महिने तो स्वतः राज्यकारभार करी. प्रजेचें रक्षण करी. न्यायदान करी आणि उरलेले सहा महिने तो देशोदेशींचा प्रवास करीत हिंडत असे. गरीब दुबळ्यांस मदत करून संकटांतून सोडवत असे. या काळात त्याचा प्रधान राज्यकारभाराकडे लक्ष देत असे. या योजनेमुळें त्याचे सर्व प्रजाजन सुखी असत. राजाहि निश्चिंत असे. सुखांत असे.

मातासमं नास्ति शरीर पोषणं भार्यासमं
नास्ति शरीरतोषणम् ॥

विद्यासमं नास्ति शरीरभूषणम् चिंतासम
नास्ति शरीरशोषणम ॥

म्हणजे आईसारखे संरक्षण करणारे, पोषण करणारे दुसरे कोणीहि नाही. पत्नीसमवेत सुख देणारे आणखी दुसरे कोणीहि नाही. विद्येसारखे भूषण दुसरे कोणतेहि नाही आणि चिंतेसारखे शरीर क्षीण करणारे दुसरे कांहींहि नाहीं.

अर्थातुराणां न पिताः न बंधुःकामातुराणां
न भयं न लज्जा ॥
क्षुधातुराणां न बलं न तेजश्चिंतातुराणां
न सुखं न निद्रा ॥

म्हणजे जे द्रव्यलोभी आहेत त्यांना द्रव्यापुढें बाप-भाऊही दिसत नाहींत. कामातुर आहे त्याला लाज वाटत नाहीं भुकेनें व्याकुळ झालेल्याजवळ बल व तेज असत नाहीं. त्याप्रमाणे ज्यास चिंता आहे त्यास कोठेही सुख लागत नाहीं, झोप येत नाहीं.

वरील श्लोक व त्याचा अर्थ मनांत सांठवत राजा विक्रम प्रवास करत होता. एका ज्योतिर्लिंगाचें दर्शन घेण्यासाठीं राजा चालला होता वाटेतच रात्र झाली. राजा एका झाडाखालीं विश्रांतीसाठीं थांबला. भीति हा शब्दच विक्रमराजाचे कोषांत नव्हता. रात्रीं त्या झाडावर अनेक पक्षीही येऊन बसले होते. विक्रमराजाला पक्षाची भाषा येत असल्यानें तो त्यांचे बोलणें ऐकत होता.

एक पक्षी म्हणाला, ‘सेवाळ देशांत उमरबेट नांवाचें एक शहर आहे. मी तिकडे गेलो होतो. त्या शहरांतील पुष्कळ माणसें एका राक्षसानें ठार मारली होती. लोक अगदी घाबरून गेले होते. मी तेथें असतांना त्यांनीं राक्षसाची प्रार्थना केली व त्याला विनविले, ‘हे राक्षसा, तूं रोज अशी माणसें मारूं नकोस त्यापेक्षां आम्ही तुला रोज एक माणूस देत जाऊं. तूं जर असा संहार करीत राहिलास तर मानवजात नष्ट होऊन जाईल. तेव्हां तूं रोज एकच माणूस खा. त्यांत तुझेही कल्याण आहे व आमचेही कल्याण आहे.’

राक्षसानें ती विनंती मान्य केली. मग शहरांतील लोकांनीं प्रत्येक घरोघर पाळी लाविली. ज्याची पाळी असेल त्यानें आपल्या घरांतील एक माणूस राक्षसाला द्यायचा. ती पाळी उद्यां एका फकिरावर आली आहे आणि तो फकीर पक्षांवर फार प्रेम करतो. त्यांना खाऊंपिऊं घालतो आणि तो जर मेला तर आपल्यासारख्या अनेक पक्षांना दानापाणी मिळणार नाहीं. त्यांची उपासमार होईल. पण आपण काय करणार ?’

त्या पक्षाची हकीकत ऐकून सर्वच पक्षांना फार वाईट वाटले. दुःखोद्गार काढीत ते सर्वजण झोपेच्या आधीन झाले. विक्रमराजाला मात्र झोंप येईना. तो उठला व चालूं लागला. त्या पक्षाने सांगितलेलें नगर आलें. राजा तडक त्या फकीराकडे गेला व म्हणाला, हे फकिरा, तूं अनेक पक्षांचा अन्नदाता आहेस. श्रेष्ठ आहेस मी एक सामान्य माणूस आहे. माझ्याच्यानें

कांहीच पुण्यकर्म होत नाहीं. म्हणून आतां तुझ्याऐवजीं मी त्या राक्षसाकडे जातो. मला परवानगी दे.'

'बाबा, तूं कुणीही अस! तुझी इच्छा असली तरीही मी तुला राक्षसाकडे जाण्यासाठीं परवानगी देणार नाहीं.' फकीर म्हणाला.

पण विक्रमराजा कांहीं ऐकेना. तो धावत सुटला व बळी ज्या शिळेवर रोज बसत असे त्या शिळेवर जाऊन बसला. रोजच्याप्रमाणें आरडत ओरडत राक्षस आला. पण काय आश्चर्य! राजा विक्रमाला पहाताच त्याची दुष्ट बुद्धी नाहींशी झाली. राक्षसानें राजाला विचारलें,

'तूं कोण आहेस?'

'मी बळी आहे. तूं तुझें काम कर! मला उगाच प्रश्न कशाला विचारतोस?' राजा म्हणाला.

राक्षस म्हणाला, 'अरे, तुला पाहतांच माझी दुष्ट बुद्धी नाहींशी झाली. दुसऱ्यासाठीं प्राण देण्याचे तुझे असामान्य धैर्य पाहून मी खूष झालों आहे. तुला काय हवे ते माग!'

'मग आजपासून तूं मनुष्यप्राणी मारूं नकोस. खाऊं नकोस.'

राजाचे म्हणणे मान्य करून तो राक्षस दूर दूर निघून गेला.

राजाच्या पाठोपाठ आलेला फकीर हे सर्व बघत होता. गांवावरचे संकट दूर झाल्याचे पाहतांच त्याचे डोळे अश्रूंनी भरले. त्यानें विक्रमराजाला साष्टांग नमस्कार घातला.

नगरीतल्या लोकांनी राजाचा फार मोठा सत्कार केला.

तेथें प्रेमाचें नाते जोडून राजा अवंतीला परत आला.

भोजराजा, तुझा परोपकार एवढा मोठा असेल तरच या सिंहासनावर बैस !

भोजराजानें मानेनेंच नकार दिला व तो हळू हळू आपल्या महालाकडे वळला.

## कथा तेरावी

विक्रमराजापुढें आपण फार क्षुद्र आहोत हे भोजराजाला पटले होते. त्याची पुढील गोष्ट ऐकण्यासाठीं आतुर झालेला राजा सिंहासनापाशीं आला. तेराव्या सुवर्ण पुतळीच्या गळ्यांतील पुष्पमालेला स्पर्श करतांच ती 'भोगनिधी' नांवाची सुवर्णपुतळी म्हणाली--

'राजा, विक्रमराजाच्या धैर्याची एक कथा मी तुला सांगते ती ऐक. तुझे धैर्य जर तसें असेल तरच तूं सिंहासनावर बैस !'

'सांग' मी ऐकतो आहे--'

'ऐक तर--' पुतळी बोलू लागली.

एकदा अवंतीनगरीला भद्रसेन नामा नांवाचा सावकार मरण पावला, वडिलांचे मरण पाहून त्याच्या मुलाला--पुरंदर याला संसाराबद्दल एकदम विरक्ती उत्पन्न झाली. हें जग नाशिवंत आहे. आज वडील निघून गेले. उद्या मी जाणार ! परवां माझा पुत्र. मग या संपत्तीचा मोह करण्यांत काय अर्थ आहे ? असें म्हणून त्यानें ती सर्व संपत्ती ब्राह्मण, दीन-दुबळे, गरीब यांना दान करून टाकली.

उदारस्य तृणं वित्तं शूरस्य मरणं तृणं ।
विरक्तस्य तृणं भार्या निस्पृहस्य तुणं जगत ॥

म्हणजे उदार पुरुषास द्रव्य, शूराला मरण, विरक्त माणसास स्त्री व निस्पृह माणसास जग म्हणजे तृणाप्रमाणे तुच्छ वाटतें. याप्रमाणेंच तो सावकारपुत्र एकदम विरक्त झाला व संपत्तीचें दान करून तीर्थयात्रेस निघून गेला.

एके रात्री तो ' भद्रेश्वर ' देवाचें मंदिरांत मुक्कामास राहिला होता. रात्री जवळच्या रानांतून त्याला रडण्याचा आवाज ऐकू आला. त्यानें जवळपासच्या लोकांना त्याबद्दल विचारलें. ते लोक म्हणाले, ' आम्ही हा आवाज रोज ऐकतो. पण रानांत जाऊन शोध करण्याइतकें धैर्य आमच्या कुणाच्यांतहि नाहीं. कोणी फार धैर्यवान पुरुषच ते काम करूं शकेल. '

पुढें पुरंदर यात्रा करून अवंतीला परत आला. परत आल्यावर त्यानें ही कथा विक्रमराजास सांगितली. ती ऐकतांच राजा त्याला घेऊनच त्या देवळांत परत आला. नित्याप्रमाणें रात्री रडणें ऐकूं येऊं लागलें. त्याबरोबर राजा विक्रम उठला व त्या आवाजाचे मागोमाग रानांत जाऊं लागला. खूप दाट जंगलांत गेल्यावर त्याला एक धिप्पाड क्रूर राक्षस एका स्त्रीस मारीत आहे व ती स्त्री रडते आहे, असें दृश्य दिसलें. तें पहातांच राजा फार संतापला. तो ओरडून म्हणाला, ' अरे दुष्टा ! एका गरीब असहाय्य अबलेला तूं उगाच कां मारतोस ? सामर्थ्य असेल तर

माझ्याशीं युद्ध कर ! पाहूं दे तरी तुझा पराक्रम !

राजाचे हे शब्द ऐकतांच दांतओठ खात राक्षस विक्रमावर चालून आला. राजानें राक्षसाला खूप दमवले. अखेर राक्षस मरून पडला.

राक्षस मेल्यावर त्यानें त्या रडणाऱ्या स्त्रीस विचारले, 'बाई, तू कोण आहेस ? आणि हा राक्षस तुला कां छळत होता ?'

ती स्त्री म्हणाली, 'महाराज, मी एक ब्राह्मण स्त्री आहे. मी माझ्या पतीस फार छळत होते. शेवटी माझ्या त्रासाला कंटाळून त्याने आत्महत्या केली आणि आतां राक्षस होऊन तो मला रोज मारत होता.' 'हे पुरुषा, माझ्या पतीची खूप संपत्ती आहे. ती सर्व मी तुला खुषीनें देते. तिचा स्वीकार कर.'

आणि तिनें मोहराने भरलेले सात रांजण राजाला देऊन टाकले.

राजानें ते सर्व द्रव्य गोरगरिबांना वाटून टाकले. त्यानंतर तो रडण्याचा आवाज बंद झाला व लोक निर्धास्त झाले.

मग राजा अवंतीला परत आला.

'भोजराजा, तुझें धैर्य असे आहे का ? असेल तरच या सिंहासनावर बैस.'

भोजराजानें स्मितहास्य केले व तो आपल्या महालाकडे वळला.

# कथा चौदावी

रात्र होतांच राजा सिंहासनापाशीं गेला. चौदाव्या सुवर्ण-पुतळीच्या कमरपट्ट्याला हात लावतांच ती 'रतिप्रिया' नांवाची पुतळी बोलूं लागली.

'राजा, विक्रमराजासारखा तूं दाता असशील तरच या सिंहासनावर बैस!'

'असं?'

'होयं! मी त्याची एक कथा सांगते ऐक.' असे म्हणून ती पुतळी बोलूं लागली.

एकदां तीर्थयात्रा करीत असतां राजा विक्रम कृष्णातीरी आला. कृष्णेच्या कांठावर एक पुराणिक पुराण सांगत होता. अनेक लोक श्रवण करायला बसलेले होते. तरुण, बाल, वृद्ध, स्त्री-पुरुष सर्वच जण पुराण ऐकण्यांत तल्लीन झाले होते. पुराणिक बुवानीं एक श्लोक म्हटला. राजा विक्रमहि आतां त्या लोकांत सामील होऊन पुराण ऐकत होता.

परोपकाराय फलंति वृक्षः परोपकाराय वहंति नद्यः ॥
परोपकाराय दुहंति गावः परोपकारार्थमिदं शरीरम् ॥

परोपकार करण्यासाठीं वृक्ष फळांनीं बहरतात. परोपकार करण्यासाठींच नद्या वाहतात. परोपकार करण्यासाठींच गाई दूध देतात, तसेंच आपलें हें शरीर देवानें आपल्याला परोपकार करण्यासाठींच दिलें आहे.

पुराणिकबुवा श्लोकाचा अर्थ समजावून सांगत होते. इतक्यांत काय झालें? एक ब्राह्मण आपल्या स्त्रीचा हात धरून

पाण्यांतून येत होता. चुकून त्याचा पाय खोल पाण्यांत पडला व तो बुडूं लागला. मदतीसाठीं पुढें होऊन आरडाओरडा करायला सुरुवात केली, पण कुणीहि त्यांच्या मदतीसाठीं पुढें येईना.

विक्रमाला मात्र त्या ब्राह्मणाची दया आली. त्यानें नदीत उडी टाकली व त्या ब्राह्मणाला व त्या स्त्रीला सुखरूपपणे पाण्याबाहेर आणले. कांठावर आल्यानंतर तो ब्राह्मण म्हणाला, 'आपण कोणीहि असा! पण आज तुमच्यामुळेंच आम्ही दोघेजण जिवावरच्या संकटांतून वांचलो आहोत. माझ्याजवळ तुम्हांस द्यावयाला द्रव्य नाहीं, पण दोन वर्षें तपश्चर्या करून पुण्य संपादन केलें आहे तें तुम्हाला देतों त्याचा स्वीकार करा.' असें म्हणून ब्राह्मणानें त्या पुण्याचें उदक विक्रमराजाच्या हातावर सोडलें.

आतां विक्रमराजाहि अवंतीकडे येण्यासाठीं निघाला. येतां येतां एका जंगलांत त्याच्यासमोर एक अक्राळविक्राळ राक्षस येऊन उभा राहिला. तो ब्रह्मराक्षस राजाची वाट अडवून म्हणाला, 'हे महापुरुषा, मला या राक्षसयोनींत राहणें फार कठीण वाटते आहे. मला माझ्या स्थितीचा कंटाळा आला आहे. आतां तूं माझा उद्धार कर.'

विक्रमाला त्या राक्षसाचीहि दया आली. ब्राह्मणानें पुण्याचे उदक सोडलेला त्याचा शुभहस्त अजून ओलाच होता. त्याला त्या पुण्याची एकदम आठवण झाली. त्याने लगेच त्या पुण्याचें दान राक्षसाला देऊन टाकलें, त्याबरोबर त्या राक्षसाचे ऐवजीं एक दिव्य पुरुष विक्रमासमोर



उभा राहिला. तेवढ्यांत स्वर्गातून त्याला नेण्यासाठीं विमान आलें. विमानांत बसतां बसतां त्या पुरुषानें विक्रमाला अंतःकरण-पूर्वक आशीर्वाद दिला व तो स्वर्गलोकाला निघून गेला. राजा अवंतीला परत आला.

हे भोजराजा! राक्षस योनीतल्या दुष्टांवरदेखील कृपा करण्याचें, त्यालाहि पुण्यदान करण्याचें तुझें दातृत्व असेल तरच तूं या सिंहासनावर बैस!

राजा भोज कांहींच न बोलतां माघारी वळला.

★

# कथा पंधरावी

दिवसभर राजा भोजला तो ब्रह्मराक्षस व त्यालाहि पुण्यदान करणारा राजाविक्रमच आठवत होता. रात्रीची तो उत्सुकतेनें वाट पहात होता. अंधार पडला व तो सिंहासनाजवळ जाऊन उभा राहिला. पंधराव्या सुवर्णपुतळीच्या हनुवटीला स्पर्श करतांच ती 'सुमित्रा' नांवाची पुतळी गोड आवाजांत म्हणाली, राजा, विक्रमासारखी तुझी परमेश्वरावर श्रद्धा असेल तरच तूं या सिंहासनावर बैस.'

' विक्रमराजाचा परमेश्वरावर विश्वास होता ? '

' होय. ऐक तर ! त्याची गोष्ट मी तुला सांगते. ' एकदां यात्रा करतां करतां राजा विक्रम आंवढ्या जगन्नाथाला गेला. देवळांत एक साधू बसला होता. त्यानें विक्रमाला ओळखलें. राजाला ओळखून तो हंसत म्हणाला, ' हे राजा, तूं आपलें राज्य सोडून असा कां भटकतोस ? '

' आपल्यासारख्या योगी पुरुषाचें दर्शन घेण्यासाठीं ! '

' अरे, पण मग तूं नसतांना तुझ्या राज्यावर जर कुणी शत्रु चालून आला तर ? मग काय होईल ? राज्याचें रक्षण कोण करील ? प्रधान असला तरी तुझी सर त्याला येणे शक्यच नाहीं. '

' योगीराज, माझ्या राज्याची मी कशाला काळजी करूं ?' ज्यानें राज्य दिले आहे तोच त्या राज्याची काळजी करील— याविषयीं मला एक कथा माहीत आहे ती मी तुम्हांला सांगतो—

' फार पूर्वी जयखंड नगरांत जयशंकरनामा नांवाचा राजा

राज्य करीत होता. राजा सज्जन होता. त्याचा फायदा घेऊन त्याच्या नातेवाईकांनीं कपटानें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें व जयशंकरनामाल्या त्याच्या राणीसह नगरांतून बाहेर काढून हाकलून दिले.

हें दुर्दैवी जोडपें फिरत फिरत भद्रावती नगराजवळ आलें. नगराबाहेर एक विशाल वटवृक्ष होता. त्याखालीं ते झोपी गेले. त्या वटवृक्षावर पांच यक्ष रहात होते. ते एकमेकांत बोलत होते. भद्रावतीचा राजा नुकताच मरण पावला आहे. त्याला पुत्र नाहीं. तेव्हां हे राज्य आतां कोणाला द्यावें ?

एकजण म्हणाला, ' आतां या झाडाखाली झोपलेले दुर्दैवी राजा-राणी आहेत. त्यांनाच आपण भद्रावतीचें राज्य देऊं या.'

सर्वांना हा विचार पटला. सकाळ झाली. जयशंकरनामा पत्नीसह भद्रावतीनगरीत शिरला. दैवयोगाने सोंडेत माळ घेतलेली हत्तीण ज्याला ती माळ घालील त्याला राजा करावयाचे असा संकल्प सोडलेले राज्याचे अधिकारी जय-शंकरनामा सामोरे आले. हत्तिणीमागोमाग अनेक प्रजाजनहि चालले होते. कोण तो दैववान माणूस आहे हे पहायला सर्व लोक अधीर झाले होते. यक्षांनी आपल्या सामर्थ्यानें त्या हत्तिणीला जयशंकरनामाचे गळ्यांत ती माळ घालायला लावली. हत्तिणीनें गळ्यांत माळ घालतांच सर्वांनी नवीन राजाला मुजरे केले. लगेच राज्याभिषेक करण्यांत आला.

आतां जयशंकरनामा पत्नीसह मोठ्या सुखांत रहात होता. एकदां या राज्यावर शत्रुनें चाल केली. त्यावेळीं त्याची

पत्नी जयशंकरनामाला म्हणाली, 'महाराज! राज्याला शत्रुने वेढा घातला आहे. पण आपण अगदी शांत आहांत! आपण प्रतिकार करण्यासाठी बाहेर कां पडत नाहीं? युद्ध कां करीत नाहीं?'

'हे बघ! ज्यांनी मला हे राज्य दिले तेच या राज्याचें रक्षण करतील? मी कशाला त्याची काळजी करूं?' असे उत्तर देऊन जय-शंकरनामा अगदी स्वस्थ बसला. इकडे यक्षांना मात्र काळजी पडली. या माणसानें आपल्यावर इतका विश्वास टाकला आहे त्याअर्थी आपल्याला त्याचे रक्षण केलेच पाहिजे.

लगेच या पांच यक्षांनी आकाशांतून बाणांचा वर्षाव केला व शत्रुला पळवून लावले. हे अघटित दृश्य पहातांच राणी म्हणाली, 'हें काम देव यक्षांखेरीज कोणाचेहि नाहीं पण हे यक्ष आमचेवर उगाचच एवढे उपकार कां करतात? आम्ही तर त्यांचे कांहींच काम केलेलें नाहीं.'

राणीचे हे शब्द ऐकतांच ते पांचही यक्ष राणीसमोर येऊन प्रकट झाले व म्हणाले, 'तूं म्हणतेस ते खरें आहे. तुमच्या शत्रूचा नाश आम्हीच केला. या जन्मी नाहीं पण मागच्या जन्मी तुझ्या पतीनें आमच्यावर मोठा उपकार केलेला आहे.'

पूर्वजन्मी आम्ही शापामुळे मत्स्य योनीत वावरत होतो. एका लहानशा डबक्यांत रहात होतो. एकदां त्यातले पाणी आटले व आमचा जीव घाबरा होऊं लागला. तेव्हां तुझा पति एक कुंभार होता. त्याला आमची दया आली व त्यानें आम्हांला

एका मोठ्या सरोवरांत नेऊन सोडले. तो मागील उपकार स्मरून आम्ही त्याला हें राज्य दिलें व आतां शत्रूंपासून त्याचे संरक्षण केले.

एवढे बोलून ते यक्ष आपल्या स्थानी निघून गेले.

विक्रमराजाची ही गोष्ट ऐकल्यामुळें देवळांतील साधू फार संतुष्ट झाला. परोपकारावर राजाचा विश्वास इतका दृढ असल्याचे पाहून तो खूष झाला होता. साधूने चिंतामणी नांवाचें एक अमूल्य रत्न राजाला दिले. साधूला नमस्कार करून विक्रमराजा उज्जयिनीस जायला निघाला असतां रस्त्यांतच त्याला एक ब्राह्मण भेटला. ब्राह्मणानें दारिद्र्याची कहाणी विक्रमराजाला ऐकवली आणि पुढे असें म्हटले, ‘ माझें दारिद्र्य दूर करण्यास फक्त तूंच एकटा समर्थ आहेस.’

ब्राह्मणाचा हा आपल्यावरच विश्वास पाहून विक्रमानें खूष होऊन त्याला नुकताच मिळालेला ‘ चिंतामणी ’ देऊन टाकला.

हे भोजराजा ! तुझे मन असे मोठे आहे कां ? असेल तरच या सिंहासनावर बैस !

भोजराजानें सिंहासनाला नम्रपणे प्रणाम केला व तो माघारी वळून चालू लागला.

★

## कथा सोळावी

पौर्णिमेची रात्र होती. राजा प्रधानासह सौधावर बसलेला होता. गप्पा चालल्या होत्या. रात्र झालेली चटकन् लक्षांतच आली नाहीं; पण जेव्हां भोजराजाचे ते लक्षांत आले तेव्हां

महत्त्वाचा विषय अर्धाच सोडून तो लगबगीनें सिंहासनाजवळ आला.

सोळाव्या सुवर्ण परीच्या नाजुक बोटांना स्पर्श करतांच ती 'प्रेमावती' नांवाची पुतळी म्हणाली, 'विक्रमासारखा समर्थ राजाच या सिंहासनावर बसायला योग्य आहे. दुसरा कुणीही यावर बसू शकणार नाहीं. त्याचें सामर्थ्य कसें होते ते मी सांगते. ऐक—

भोजराजा लक्ष देऊन ऐकूं लागला. विक्रमाचा सुमतीनामा नांवाचा एक मित्र होता. काशीयात्रा करून अवंतीला परत येत असतांना वाटेंत एका देवळांत तो थांबला. देवळांत एका मोठ्या कढईत तेल ठेवलें होतें व खालीं जाळ लावलेला होता. तेलांतून धूर निघत होता. सुमतीनामानें लोकांना विचारलें, 'येथें कसला समारंभ आहे ? हे काय आहे ?'

तेव्हां त्याला एकानें सांगितलें, 'या देशाची मदनमंजिरी नांवाची जी लावण्यवती राजकन्या आहे तिचा असा पण आहे कीं, 'या उकळत्या तेलांत उडी मारून जो बाहेर येईल त्याच्याशीं मी लग्न करीन ?' या राज्याचा वारसही राजकन्याच असल्यानें कांही साहसी तरुणांनी हे धाडस केले. पण ते प्राणास मुकले. आज आणखी कांहीं तरुण प्रयत्न करून पाहणार आहेत.

त्याचे हे बोलणे संपताच त्याला एकदम सनईचा आवाज ऐकूं आला. राजकन्या मदनमंजिरी देवदर्शनाला आली होती. तिचें सौंदर्य बघून सुमतीनामाचे तिच्यावर प्रेम बसले. तो

स्वतःशीं पुटपुटला, 'अहाहा ! काय हें लावण्य ! ही स्वर्गांतील अप्सरा तर नाहीं ? अशी सुंदर स्त्री ज्याला लाभेल तो खरा भाग्यवान ! तो खरा पुण्यवान् ! व्यर्थ, आमच्यासारख्यांचा जन्म, अगदीं व्यर्थ.

सुमतीनामाला आतां तिच्या दर्शनाचेच वेड लागलें. तो पुष्कळ दिवस तेथें थांबला. तिच्या विचारानें त्याची झोप उडाली. प्रकृति खराब झाली. कांही दिवसांनी तो अवंतीला परत आला. विक्रमराजानें त्याच्याकडे पहातांच त्याला विचारलें, 'ए बाबा तूं वाळलास कां असा ? काय दुःख असेल ते मला सांग.' मित्राचें दुःख दूर करणे हें मित्राचें कर्तव्यच आहे तूं मोकळेपणाने बोल—तुझी व्यथा मला ऐकूं दें.'

राजाच्या शब्दांनीं सुमतीनामा भारावला. त्यानें मदनमंजिरीची सारी हकीकत राजाला सांगून टाकली.

राजा म्हणाला, 'एवढेंच ना ? मी तुला स्त्री मिळवून देतो.' एवढे वाईट कशाला वाटून घेतोस ? चल आपण आतांच निघू या—'

असे म्हणून ते दोघेजण परत त्या देवळात आले. नेहमीप्रमाणें मदनमंजिरी देवदर्शनास आली. लोकांत उठून दिसणाऱ्या विक्रमाकडे तिचे लक्ष गेलें. तिच्या मनांत आले, 'हा सुंदर, पराक्रमी पुरुष माझ्यासाठी येथें आला आहे. पण माझा हा अघोरी पण ऐकूनच हा आतां परत जाईल. छे, असें होता कामा नये.'

मनांत असा विचार येतांच ती सुंदरी विक्रमाजवळ आली व गोड आवाजांत म्हणाली, 'हे नरश्रेष्ठा, मनासारखा पति मिळावा

म्हणून मी हा असा पण केला होता. पण आतां आपल्यासारखा महापुरुष येथें आला आहे. मला आपण पसंत आहांत. मी माझा पण मागें घेतें. आपण माझा स्वीकार करावा.'

विक्रमराजा म्हणाला, 'देवी, असें करणें योग्य होणार नाहीं. तुझा पण न जिंकता जर मी तुझा पति झालो तर तें तुला व मलाही शोभणार नाहीं. आपली दोघांची अपकीर्ति होईल. लोक हंसतील.'

'मग आतां काय करावें ? आपल्यासारख्या महापुरुषाला मी डोळ्यांसमोर मरूं द्यावें ?'

'मी पण जिंकेन ? मला खात्री आहे. मी जिवंत बाहेर आलो तर मी सांगेन तसें तूं केलें पाहिजे. कबूल आहे ?'

'होय ? आहे कबूल !' मदनमंजिरी म्हणाली. वेताळाचें स्मरण करून राजानें कढईत उडी टाकली. दुसऱ्या क्षणी तो बाहेर आला. राजाची कांती पहिल्यापेक्षां जास्त तेजस्वी झाली होती. मदनमंजिरी आनंदित होऊन म्हणाली, 'महाराज, आपला जयजयकार असो. म्हटलेंच आहे.

ये दीनेषुदयालवःस्पृशति यानल्पोऽपिन श्रीमदो ।
व्यग्रा ये च परोपकारकरणे हृष्यंति ये याचित ः ।।
स्वस्थाः संचि च यौवनोन्मदमहाव्याधिप्रकोपेति ये ।
तैस्तंभौरिव सुस्थिरैः किल भरक्रान्ता धरा धार्यते ।।

दीन लोकांच्यावर दया करणारे, संपत्तीचा गर्व नसलेले, परोपकार करण्यांत जे सर्वांच्यापुढें, कोणी कांहीं मागितलें असतां हर्षित होणारे, तारुण्याच्या उन्मादांतही चित्त चंचल

होऊं न देणारे असे जे पुरुष असतात तेच पृथ्वीचे आधार-स्तंभ होत !

विक्रमराजाने मदनमंजिरीला म्हटले, देवी. तुझा पण मी जिंकला. आतां मी सांगेन तसे करण्याचें तूं वचन दिलें आहेस, ते पुरे करावे.'

'आज्ञा करावी.'

'मग तूं या माझ्या मित्राशी, सुमतीनामाशीं विवाह कर.'

'छे! छे!'

'वचनभंग करणे कुलीनाचें ब्रीद नव्हे. तूं वचन दिलें आहेस. विसरूं नकोस.'

शेवटी निरुपायानें मदनमंजिरीने विवाहाला संमति दिली. सुमतीनामाला तेथील राज्यावर बसवून मित्राला सुखी झाल्याचें पाहून हर्षित झालेला विक्रमराजा अवंतीला परत आला.

राजा, तुझे मित्रप्रेम या तोडीचें आहे काय? तसे असेल तरच तूं या सिंहासनावर बैस!

भोजराजा 'धन्य धन्य विक्रमराजा' असे म्हणत त्या महालांतून बाहेर पडला व आपल्या महालाकडे निघाला.

●

## कथा सतरावी

कथा ऐकायला मिळाल्या, त्याला सोळा दिवस झाले होते. विक्रमराजाचे औदार्याने, स्नेहाने, धैर्याने, शौर्याने तें सिंहासन जास्तच चमचम करीत आहे असें भोजराजाला वाटत होते.


आतां सतरावी कथा ऐकण्यासाठीं तो आतुर झाला होता.

रात्र होतांच तो सिंहासनाजवळ गेला. सतराव्या सुवर्ण-पुतळीच्या मखलेला हळूंच हात लावतांच ती 'सुलभा' नांवाची सुवर्णपुतळी म्हणाली, 'राजा, विक्रमासारखे दान तुझ्या हातून होईल तरच तूं सिंहासनावर बैस !'

'कोणते दान केलें त्यानें ?'

'सांगते, ऐक हें–'तो उत्सुकतेनें ऐकूं लागला. 'सुलभा' सुवर्णपुतळी स्वर्गीय आवाजांत बोलूं लागली.

एकदां शिकार करतां करतां राजा खूप दाट जंगलांत शिरला. समोर पळणारा वाघ एका गुहेंत शिरतांच राजा विक्रमहि त्या गुहेंत शिरला. पाताळाला जाण्याचा मार्ग त्या



गुहेंतून होता. राजाहि त्या मार्गानें चालूं लागला. अखेर तो त्या रस्त्यानें थेट पाताळांत आला. दाराशीच त्याला शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेले भगवान् श्रीविष्णु दिसले. भगवान् बळीचे दारावर पहारा करीत उभे होते. श्रीविष्णूला पहातांच राजा विक्रमानें साष्टांग नमस्कार केला. राजा विक्रमाला घेऊन भगवान् बळीराजाकडे गेले.

बळीराजानें विक्रमाचें उचित असे स्वागत केले. नंतर विचारले, ' तूं येथें कशासाठीं आला आहेस ? '

' आपले व श्रीकृष्णाचें दर्शन व्हावे अशी इच्छा होती म्हणून मी येथें आलों होतो. आतां माझी इच्छा पूर्ण झाली.' नंतर त्यांनीं बराच वेळ गप्पा मारल्या. बळीराजा म्हणाला, ' विक्रमा, माझ्या राज्यांतील तुला पाहिजे ती वस्तू माग ! मी प्रसन्न आहे. '

' आपले व श्रीविष्णूचे दर्शन झाल्यानें माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या. आतां मला कांहींहि नको. '

' हे मित्रा, तूं संकोच कां करतोस ? तुझ्या व माझ्या मैत्रीची आठवण चिरंतन रहावी असे मला मनापासून वाटते. तुला पाहिजे ते माग मी देईन.' अरे असे म्हटलेच आहे—

ददाति पतिगृह्यति गुह्यमाख्याति पृच्छति ॥
भुंक्ते भोजयते चेव षड्विधं प्रीतिलक्षणम् ॥

आपली वस्तू मित्राला देतो. मित्राची वस्तू घेतो, गुजगोष्टी विचारतो व सांगतो, मित्राचे घरीं जेवायला जातो, त्याला

आपले घरीं जेवायला बोलावतो. असे मित्रप्रीतीचे सहा प्रकार आहेत. तेव्हां संकोच न धरता काय हवे ते माग.'

पण तरीहि विक्रमराजा कांहींच बोलला नाही. शेवटी बळीने सर्पाच्या मस्तकावरील एक अमूल्य मणी राजा विक्रमास दिला. अवंतीस परत येत असतां एका ब्राह्मणाने त्याला विनंती केली, 'हे श्रेष्ठ पुरुषा, मला कांहीं मदत कर.'

त्यानें अशी याचना करतांच विक्रमाने तो दिव्य मणी ब्राह्मणाला देऊन टाकला. संतुष्ट होऊन ब्राह्मण निघून गेला. तूं एवढा वीरपुरुष आहेस का? एवढा निर्लोभी आहेस का? तसा असशील तर या सिंहासनावर बैस!

भोजराजा न बोलता हंसत तृप्त मनानें आपल्या महालाकडे वळला.

●

## कथा अठरावी

रात्र झाली, चंद्राचे किरण सिंहासनावर पडले होते. सिंहासनावरची हिरेमाणके झगमग करत होती. भोजराजाला वाटले; यांतील प्रत्येक हिरा आपल्याला कांहींतरी सांगू इच्छित आहे. प्रत्येकांच्या मनांत विक्रमाची स्मृती भरलेली आहे, विचारांत गढून राजा टक लावून सिंहासनाकडे पहात बसला असतांना त्याचा हात अठराव्या सुवर्णपुतळीला लागला. त्याबरोबर सजीव होऊन ती कुरंगनयना नांवाची सुवर्णपुतळी बोलूं लागली—

'राजा, तुझा परोपकार विक्रमाचे तोडीचा आहे काय? त्याची कथा मी सांगते ती ऐक व मग तूंच ठरव या सिंहासनावर बसावें का न बसावें!' ती सुवर्णपुतळी सांगू लागली.

चंद्रसेन नांवाच्या एका राजाजवळ एका ब्राह्मणानें विक्रमाचे गुणवर्णन केले. 'त्याच्यासारखा महापुरुष मला अजून तरी पृथ्वीतलावर भेटलेला नाहीं.' असेंहि सांगितले. हें ऐकतांच चंद्रसेन राजाला फार राग आला. विक्रमराजाचा तो द्वेष करूं लागला. विक्रमापेक्षांहि आपली कीर्ति जास्त व्हावी असा त्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यानें तपश्चर्येला सुरुवात केली. त्याच्या उग्र तपाने देवी प्रसन्न झाली. देवीनें सांगितले, 'तूं जितके वेळां अग्नीत उडी टाकून स्वतःला जाळून घेशील तितके वेळा मी तुझ्या भारंभार सोने देत जाईन.' देवीने असें म्हणतांच चंद्रसेन राजाने अग्नीत उडी टाकली. देवीने त्याला जिवंत केले. त्यानें परत अग्नींत उडी टाकली. असे खूप वेळां केल्यानंतर सोन्याचा फार मोठा ढीग पडला. विक्रमापेक्षां मोठे होण्याचे ईर्षेने त्याने ते सर्व सुवर्ण याचक व ब्राह्मण यांना दान करून टाकले. दूतांनी ही बातमी विक्रमाला कळविली. विक्रमाला चंद्रसेन राजा आपल्यापेक्षा जास्त कीर्ति मिळ-वण्याच्या इच्छेने हे क्लेश भोगतो आहे हे कळतांच फार वाईट वाटले. त्याचे दुःख दूर करावे असे ठरवून तो देवीचे देवळांत

गेला व म्हणाला, 'हे जगदंबे माते, तूं सर्वांचे दुःख दूर करणारी आहेस! आतां या देहाची एकदांची आहुति घे व चंद्रसेन राजाला अक्षय लक्ष्मी दे. त्याला वारंवार अग्नींत उडी टाकायचे श्रम करायला लावू नकोस.' एवढें बोलून राजा विक्रमाने अग्नींत उडी टाकली, त्याबरोबर देवी प्रसन्न झाली व राजाला म्हणाली, 'तुझ्यासारखा परोपकारी माणूस दुसरा कुणी होणार नाहीं. दुसऱ्याचे दुःख दूर करण्यासाठीं प्राणावर उदार होणें कठीण आहे. राजा चंद्रसेन तुझा द्वेष करीत असतांनासुद्धां तूं त्याचें दुःख दूर करण्यासाठीं स्वतःचा प्राण देण्यास तयार झालास! तेव्हां तुझी बरोबरी करण्यास कोण समर्थ आहे? राजा, तुझी प्रार्थना मी मान्य करते.'

एवढे बोलून देवी गुप्त झाली. विक्रमराजा अवंतीला परत आला. चंद्रसेन राजाला अक्षय लक्ष्मी मिळाली. मात्र ती मिळण्याचे कारण त्याला समजतांच तो विक्रमराजाला शरण गेला. त्याचा भक्त बनला.

राजा, तूं शत्रूवरसुद्धां इतके प्रेम करूं शकत असशील तरच या सिंहासनावर बैस!

'छे! राजा विक्रम तो विक्रम' असे उद्गार काढीत भोजराजा तेथून बाहेर पडला.

# कथा एकोणिसावी

सिंहासनावरील नक्षीकामावरून हळुवार हात फिरवत असतांनाच राजाचा हात एकोणिसाव्या सुवर्णपुतळीला लागला. त्याबरोबर ती सुवर्णपुतळी ' चंद्रज्योति ' मधुर स्वरांत म्हणाली,

विक्रमासारखे दुर्घट काम तुझ्यानें होईल तरच या सिंहासनावर बैस ! ' देवी त्यानें कोणते दुर्घट काम केले ? '

' सांगते हं—ऐक ! ' चंद्रज्योती नांवाची ती सुवर्णपुतळी गंभीर स्वरांत सांगूं लागली—

एकदां विंध्य पर्वतावरून एक ब्राह्मण राजा विक्रमाला भेटण्यासाठीं आला. विक्रमानें त्याचा आदरसत्कार केला व त्याला नम्रपणें विचारलें, ' आपल्या दृष्टीस कोठें कांहीं चमत्कार पडला असेल तर तो मला सांगावा. '


ब्राह्मण म्हणाला, ' महाराज, मी एक चमत्कार पाहिला, पण आपल्याला तो खाटो वाटेल म्हणून सांगायचे धाडस माझ्याकडून होत नाहीं. '

' विप्रराज, मला मुळींच शंका येणार नाहीं. माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे. तेव्हां आतां निःसंकोच मनानें आपण राजा म्हणाला सर्व सांगावें. '

विक्रमराजाकडून असे आश्वासन मिळतांच तो ब्राह्मण

म्हणाला, 'पृथ्वीप्रदक्षणा करतां करतां मी विंध्य पर्वतावर आलो. विंध्य पर्वतावर एक तळे आहे. त्या तळ्यांत एक खांब असून वर रत्नजडित सिंहासन आहे. सूर्य उगवला म्हणजे तो खांब दिसूं लागतो. सूर्य जसाजसा वर चढेल तसातसा तो खांबहि वर वर येत रहातो. माध्यान्ह समयीं तो खांब इतका उंच होतो कीं, या सिंहासनावर बसून प्रत्यक्ष सूर्य अमृत प्राशन करीत आहे असे वाटतें. नंतर जसजसा पश्चिमेकडे कलूं लागतो तसतसा तो खांबहि लहान लहान होतो. सूर्य मावळला कीं, तो खांब अदृश्य होतो. त्या तळ्यांतील पाण्यांत सर्व पापें नष्ट करण्याचा गुणाहि आहे. त्यामुळें तेथें स्नान करणाऱ्यांची फार गर्दी असते.'

ही हकीकत ऐकून राजाला फारच आश्चर्य वाटले. आपल्या योगपादुका पायांत घालून राजा विक्रम त्या तळ्याकडे गेला. दिवस उगवतांच तळ्यांत एक खांब दिसूं लागला. विक्रम पोहोत पोहोत त्या खांबाजवळ गेला व वर चढून बसला. दिवस वर चढूं लागतांच विक्रमाच्या अंगाचा दाह होऊं लागला. राजा सूर्यमंत्राचा जप करीत होता. दोन प्रहर दिवस येतांक्षणी राजाचे प्राण कासावीस होऊन राजा बेशुद्ध पडला. दोन प्रहरीं सूर्य सिंहासनावर बसून अमृत प्राशन



करीत असतां अमृताचे कांही थेंब विक्रमाचे अंगावर पडले. विक्रम सावध झाला व त्यानें सूर्यस्तुति करायला सुरुवात केली. सूर्यमहाराज प्रसन्न झाला व त्यानें वर माग असें राजाला सांगितलें. मोठ्या नम्रतेनें राजा विक्रम म्हणाला, 'हे सूर्यदेवा, तुझे दर्शन होणे देवादिकांनाहि दुर्लभ, तें मला झालें. याहून मी जास्त काय मागू!'

हें ऐकतांच सूर्यदेवानें खूष होऊन आपल्या कानांतील कुंडलें विक्रमास दिली व सांगितलें, 'या कुंडलापासून रोज तुला एक तोळा सोने मिळत राहील.' असें म्हणून सूर्यदेव

सि. ब. ६...

आकाशांत निघून गेले. नंतर तो खांबहि हळू हळू खालीं आला. विक्रम पोहत पोहत तळ्याच्या कांठावर आला. अवंतीस परत जात असतांना त्याला एका ब्राह्मणाच्या घरीं मुक्काम करायची वेळ आली. ब्राह्मन विद्वात होता. गरिबीतहि त्यानें विक्रमाचें आदरातिथ्य फार चांगलें केलें. त्याची कच्चीबच्ची बरीच होती. ब्राह्मण दरिद्री असला तरी गुणसपन्न आहे याबद्दल विक्रमाची खात्री पटली. विक्रमाला त्या ब्राह्मणाची द्या आली. त्यानें ती अमोल कुंडले ब्राह्मणाला देऊन टाकली व तो अवंतीला परत आला.

तुझे औदार्य असे असेल तरच या सिंहासनावर बसण्याचा प्रयत्न कर !

भोजराजानें कथा ऐकली. प्रत्यक्ष सूर्यदेव विक्रमाला भेटला म्हणजे तो राजा किती मोठा होता, किती थोर होता, याची मनांतच कल्पना करीत भोजराजा आपल्या महालाकडे जाण्यास वळला.

★

## कथा विसावी

सिंहासन ठेवलेला महाल भोजराजानें सजवून घेतला होता, सुवर्णाचे दिवे भोवताली जळत होते. अत्तराचा सुगंध दरवळत आहे असे वाटून त्यानें विसाव्या सुवर्णपुतळीच्या पायाला स्पर्श केला. त्याबरोबर ती ' चंद्रकांती ' नांवाची सुवर्ण पुतळी मनुष्यवाणीनें बोलूं लागली, ' हे राजा,

विक्रमराजासारखें साहस तुझ्याच्यानें होईल तरच या सिंहासनावर बसे.'

'विक्रमराजाच्या साहसाची एकादी कथा ऐकण्याची इच्छा आहे.'

'असें ? मग सांगते ऐक—'

माधव नांवाचा एक गवई होता. हा जातीनें ब्राह्मण होता. हुशार होता. देवानें त्याला मदनासारखें रूपहि दिले होते. त्यामुळें तो ज्या ज्या राजाकडे नोकरी मागायला जाई तो तो राजा त्याला नोकरी द्यायला घाबरत असे. हा मदनासारखा सुंदर, चतुर कलावंत पुरुष पाहिला की आपल्या राण्यादेखील याच्यावर मोहित होतील असें त्यांना वाटत असे. त्यामुळें कलावंत असूनहि त्याला कुठें काम मिळत नव्हते. चिंताक्रान्त झालेला माधव फिरत फिरत देवनगरीला आला. तेथें कामसेन-राजाचे घरीं कामकंदला नांवाची कलावंतीण नृत्य करीत होती. गात होती. माधव ते नृत्य बघत तेथें उभा राहिला व दोन-तीन वेळा 'गायन करणारी फार चतुर आहे, पण ऐकणारे महामूर्ख आहेत' असें म्हणाला. सेवकानें हें वृत्त आंत जाऊन राजाला सांगितलें. तेव्हां राजाने त्याला आंत बोलावले व विचारले, 'तूं सर्वांना मूर्ख कां म्हणालास ?'

माधव म्हणाला, येथें जो मृदंग वाजवतो आहे त्यास अंगठा नाहीं, त्यामुळें त्याची थाप नीट उठत नाही. गाण्यात हे उणे असून कुणाच्याहि ते लक्षांत येत नाहीं म्हणून मी ऐकणाऱ्यांना मूर्ख म्हटले.

राजानें चौकशी केली. खरोखरच मृदंग वाजवणाऱ्या माणसाला अंगठा नव्हता. राजाला माधवचें फार कौतुक वाटले. त्यानें माधवला वस्त्रभूषणें दिली व दरबारांत आणून बसविले. नंतर राजा कामकंदलेला म्हणाला, ' हा ब्राह्मण फार हुशार आहे. गुणी आहे. आतां तुझ्याजवळ जी कला असेल ती याला दाखव. '

कामकंदलेनें आज्ञा मान्य केली व तिनें उत्कृष्ट नृत्य व गायन केले. तें तिचें नृत्य व गायन पाहून माधव फार प्रसन्न झाला आणि ' वाहवा ! ' म्हणून राजानें दिलेले सर्व द्रव्य त्यानें तिला देऊन टाकले.

पण राजाला हे पाहून फार राग आला. सेवकांना बोलावून त्यानें माधवला राजधानीबाहेर नेऊन सोडण्याची आज्ञा दिली. नंतर झाडाखालीं बसून माधव विचार करूं लागला—

माता यदि विषं दद्याद्विक्रीणाति पिता सुतम् ।
राजा हरति सर्वस्वं तत्र का परिदेवना ।।

आईच जर विष देईल, अथवा बापच जर मुलाला विकून टाकील, किंवा राजा सर्वस्व हरण करील तर तेथें कोणाचा उपाय चालणार ?

इकडे कामकंदला घरीं गेली. घरीं जातांच तिनें चाकरांना सांगितलें. ' दरबारांतून घालवून दिलेल्या त्या ब्राह्मणाचा शोध करून त्याला घेऊन या. ' सेवकांनीं माधवाचा शोध केला व त्याला घेऊन ते कामकंदलेच्या घरी आले. कामकंदला

दुःखी स्वरांत त्याला म्हणाली, ' माधव, माझ्याकारितां तुझा अपमान झाला. अर्थात् मी राजाविरुद्ध कांहींच करूं शकत नाहीं. पण आतां आपण दोघं जेवढा वेळ मिळेल तेवढा आनंदांत घालवूं, मग राजानें माझा प्राण घेतला तरी मला त्याची पर्वा नाहीं.

मग कामकंदलेनें कांहीं गाणी म्हटली. तिच्यानंतर माधवानें गाणीं म्हटली. गायन ऐकल्यानंतर कामकंदलेचा गर्व पार नाहींसा झाला. तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. डोळ्यांतून आनंदाश्रूचा पूर लोटला. तिला वाटलें, हा मानव नसून कोणी गंधर्व तर नाहीं ? गायनाचे रंगांत पहांट केव्हां झाली तेंच त्यांना समजलें नाहीं. पूर्व दिशा उजळली आणि माधव कामकंदलेला म्हणाला, ' मी आतां जातो, नाहीं तर माझ्यामुळें तुलाहि राजा त्रास देईल. ' तेव्हां ती बोलली, ' माधवा, तुझ्यासारखा गायनाचा हिरा सोडून यापुढें मी त्या मूर्ख राजाजवळ राहाणार नाहीं. तेव्हां मीहि तुझ्याबरोबर येते. मला घेऊन चल. माधव म्हणाला, ' कामकंदले, सध्या ती गोष्ट अवघड आहे. आतां मी निघून जातो. ईश्वरानें कृपा केली तर मी तुला निश्चित घेऊन जाईन !

माधवचे शब्द ऐकून कामकंदा दुःखी झाली. माधवलाहि अश्रू आवरेनात पण तो तसाच उठला व गांवाबाहेर गेला. कामकंदलेचा विरह त्याला जाणवूं लागला. देशोदेशीं हिंडता हिंडता तो अवंतीनगरीत आला. तेथें एका देवळांत त्यानें

मुक्काम केला. आतां त्याला कामकंदलेची इतकी आठवण येऊं लागली की, तो विलाप करूं लागला. दैवयोगानें विक्रम-राजा त्यावेळी देवळापाशी आला होता. हा विलाप ऐकून तो आंत शिरला व माधवला म्हणाला, 'हे ब्राह्मणा, तुझे दुःख मला सांग.' माधवने त्याला सर्व हकीकत सांगितली. तेव्हां विक्रमराजा म्हणाला, 'ब्राह्मणा, वेश्येची प्रीति खरी मानणे म्हणजे मूर्खपणा आहे. तिचे प्रेम पुरुषावर नसते तर धनावर असते.'

राजाचे बोलणे ऐकून माधव म्हणाला, 'राजा तूं म्हणतोस ते खरे आहे, पण माझी कामकंदला तशी नाहीं. ती माझ्या गुणावर प्रेम करते. राजा, तिच्याशिवाय मी फार दिवस जगूं शकणार नाहीं.' माधवची समजूत घालून राजानें माधवला आपल्या राजवाड्यांत आणले. नंतर आपल्या पदरी असलेल्या गायन-नृत्य-कलेत निपुण असलेल्या अनेक तरुणी त्यानें त्याच्यासमोर आणून उभ्या केल्या व म्हटले, 'तुला या मुलीमधली आवडेल ती घे.'

माधवनें तोंड फिरवले व म्हटले, 'राजा, मला काम-कंदलाच हवी! तिच्याशिवाय मी जिवंत राहणार नाहीं.'

ब्राह्मणाचा निश्चय पाहून राजा विक्रम सर्व सैन्य घेऊन देवनगरीला गेला. त्यान कामसेन राजाकडे दूत पाठवून निरोप पाठविला कीं, 'मी विक्रमराजा तुझ्या पदरी असलेल्या कामकंदलेसाठी आलो आहे. तिला माझ्या स्वाधीन कर

नाहींतर युद्धाला तयार हो.' दुतानें विक्रमराजाचा निरोप दरबारांत सांगताच कामसेनालाहि राग आला. त्यानें जबाब दिला कीं, 'मी कामकंदलेला पाठवीत नाहीं. मी युद्धास तयार आहे.'

विक्रमाने मनाशी विचार केला. आपण आधी त्या वेश्येची परीक्षा पाहूं व मगच तिच्यासाठीं युद्ध करूं! रात्र झाली. विक्रम एकटाच तिच्या घराजवळ गेला. मी एक वैद्य आहे व मला कामकंदलेला भेटायचं आहे असे विक्रमानें दासींना सांगताच तिच्या दासी त्याला माडीवर घेऊन गेल्या. कामकंदलाच आजारीच होती. राजानें तिच्याकडे पाहून सांगितले, 'तुला विरहाची बाधा झालेली आहे काय?'

'होय! पण त्यावर तुझ्याकडे कांहीं उपाय नाहीं ना? मग उगाच कां श्रम घेतोस बाबा?' कामकंदला म्हणाली.

तेहि खरेंच! थोडक्यांत चुकामूक झाली, नाहीं तर तुला जो पुरुष हवा आहे तो मी आणून दिला असता. पण बिचारा माधव थोडेच दिवसापूर्वींच तुझें नांव घेत घेत मरण पावला.

राजाचे हे शब्द ऐकतांच, 'माधव मीहि तुझ्या पाठोपाठ आले.' असे म्हणून त्या वेश्येनें प्राण सोडला. हे पाहून तिच्या दासदासी, नातेवाईक सर्वजण रडूं लागले. राजानें त्यांना सांगितले, रडूं नका. हिला फक्त मूर्च्छा आली आहे. मी औषध आणून तिला सावध करतो. घाबरू नका.

एवढे बोलून राजा माधवजवळ आला व त्याला त्याने ही

हकीकत सांगितली. त्याबरोबर माधवहि प्रियसखीच्या नांवाचा जप करीत मरण पावला.

आतां विक्रमाला पश्चात्ताप झाला. परीक्षा पहातांना आपल्या हातून या दोन प्रेमी जिवांची उगाचच हत्या झाली. हे पाप आपण फेडूं शकणार नाहीं, असें म्हणून तो शोक करूं लागला.

प्राणत्याग करायचें ठरवून राजानें चिता पेटवली. राजा आंत उडी टाकणार तोंच वेताळ प्रकट होऊन म्हणाला, ' राजा ' प्राणत्याग करूं नकोस. मी जी वस्तु देतो ती त्या दोघांच्या मुखांत घाल. म्हणजे दोघेहि जिवंत होतील. ' असे म्हणून वेताळानें त्याला अमृत संजीवनी औषधी दिली. ती घेऊन विक्रमानें दोघांनाहि जिवंत केलें. नंतर त्यानें कामसेना-बरोबर युद्ध केलें. विक्रमाचा जय झाला. विक्रमानें माधव व कामकंदलेचा विवाह लावून दिला. कामसेनाचे जागेवर त्यानें माधवला गादीवर बसवले. थोडे दिवस तेथें राहून राजा विक्रम आपल्या नगरीला परत आला. राजा तुझें मन एवढे मोठे असेल तरच या सिंहासनावर बैस!' राजा न बोलतां महालाकडे वळला.

[O]

## कथा एकविसावी

कामकंदला व माधव यांच्या प्रीतीची गोष्ट भोजराजानें आपल्या राणीला सांगितली. राणीलाही ती फार

आवडली. तेवढ्यांत रात्र झाली. राणीचा आग्रह दूर सारून राजा सिंहासनाजवळ आला. एकविसाव्या सुवर्णपुतळीच्या साडीला हात लावतांच ती 'सौभाग्यमंजिरी' नांवाची पुतळी मोहक हावभाव करीत भोजराजाला म्हणाली,

'राजा, विक्रमासारखा खऱ्याखोट्याचा निवाडा तुझ्याकडून होईल तरच तूं या सिंहासनावर बैस! त्याचीच एक कथा मी तुला सांगते ऐक—

ती सुवर्णपुतळी बोलूं लागली. भोजराजा तल्लीन होऊन ऐकूं लागला.

'एके दिवशीं विक्रमराजानें आपल्या प्रधानाला विचारलें, 'मनुष्यास जी बुद्धि असते ती त्याला त्याच्या पूर्वकर्मानें मिळते, का माता, पिता, गुरू यांच्या शिकवण्यामुळें प्राप्त होते?'

प्रधान म्हणाला, 'महाराज, बुद्धि ही उपजतच असते. केवळ शिकवण्यानें जर बुद्धी येत असती तर जगांत एकहि मूर्ख माणूस दिसला नसता. सर्वांनाच असे वाटते. आपण विद्वान व्हावे पण ते कोणाच्या स्वाधीन नाही आणि म्हणूनच कांहींजण शहाणे तर कांहींजण मूर्ख असतात.'

विक्रमराजा म्हणाला, 'हें जर खरं आहे तर आई-बाप-गुरू मुलांना शिकवण्यासाठी उगाच श्रम कां घेतात!'

'महाराज, ते आई-वडिलांचे एक कर्तव्यच आहे. दुसरी गोष्ट म्हणजे माणसाला अनुभवांतून ज्ञान मिळत असते. पूर्वकर्माचे दुसरे नांव दैव. ते उद्योगद्वारा माणसास शिक्षण

देत असते. म्हणून स्वस्थ न बसतां उद्योग करीत रहावा. म्हटलेच आहे—

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीर्दैव ।
प्रधानामिति कापुरुषा वदति ।
दैव विहायकुरुपौरुषमात्मशत्या यत्ने कृते यदि न
सिद्ध्यति कोऽत्र दोषः ॥

उद्योग करणाऱ्या पुरुषास लक्ष्मी प्राप्त होते. बुद्धिवान नसणारे लोक दैवालाच श्रेष्ठ म्हणतात. दैवावर भार न टाकतां यत्न करीत रहावे, उद्योग करूनहि कार्यसिद्धि झाली नाहीं तर दोष आपल्याकडे नाहीं.'

प्रधानानें सांगितलेल्या या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्या-करितां विक्रमानें अरण्यांत एक महाल बांधला. त्यांत बारा वर्षें पुरेल एवढे सर्व साहित्य ठेवून तेथें आपला, प्रधानाचा, कोतवालाचा व ब्राह्मणाचा असे चार वर्षे वयाचे चार मुलगे ठेवले.

त्यांची सेवा करण्यासाठी मुक्या स्त्रिया नेमल्या. घरा-भोवतीहि मुके परंतु सशक्त असे रक्षक ठेवले. त्या मुलांना चुकूनसुद्धां माणसाचा शब्द ऐकूं येणार नाहीं अशी व्यवस्था केली. दोनचार वर्षे गेली. एके दिवशीं त्या महालांत एक तेजस्वी पुरुष प्रगट झाला. रक्षण करणाऱ्या सेवकांवर मोहिनी घालून त्यानें या चारी मुलांना बोलायला शिकविले व आपण अदृश्य झाला.

बारा वर्षे संपली. या चारी मुलांना राजानें आपल्याकडे आणले. प्रथम आपल्या पुत्रास त्याने विचारलें. 'हे पुत्रा तूं सुखी आहेस ना ?'

'आपल्या पुण्याईने सुखी आहे. राजपुत्र म्हणाला. नंतर प्रधानाच्या मुलाला तोच प्रश्न विचारला. तेव्हां तो हात जोडून म्हणाला,

'आपल्या कृपेने कुशल आहे.' मग ब्राह्मणाच्या मुलाला विचारलें, तो राजाला आशीर्वाद देऊन म्हणाला, 'ईश्वराशिवाय कोणी सुखी नाहीं. प्रत्येक मनुष्यमात्रास कोणतीतरी एखादी चिंता ही असतेच !

शेवटीं कोतवालाचे मुलाला हाच प्रश्न विचारला असतां तो म्हणाला, 'महाराज ! जे लोक चोरी, चहाडी, लबाडी करतात त्यांना शिक्षा कशी होईल या काळजींत मी बुडालेलो आहे.'

चौघांची ही चार उत्तरें ऐकून राजा विक्रम फार आश्चर्य-चकित झाला. त्याने विचारले, 'तुम्हास कुणी बोलायला शिकवले ?'

मुले म्हणाली. 'कोणी एक तेजस्वी पुरुष आला होता. त्याने आम्हांस बोलायला शिकविलें. 'मी दैव' असें सांगून तो गुप्त झाला.

तेव्हां विक्रम प्रधानाला म्हणाला, पाहिलेस ! सर्वांत दैव हेंच मुख्य कारण आहे. शिक्षण, उद्योग इत्यादि सर्व निमित्त-मात्र आहेत.'

प्रधानालाहि हें चांगले पटले. आपल्या दैवांत जसें असेल तसें भोगावेंच लागतें.

भोजराजालाहि ही गोष्ट पटली मोठ्या आनंदानें तो आपल्या महालाकडे गेला.

●

## कथा बाविसावी

रत्नांचा सुंदर हार बनावा. प्रत्येक रत्न अमोलिक असावें तसा हा गोष्टींचा हार भोजराजाच्या मनांत गुंफला जात होता. बत्तीस रत्नांचा हार तयार होणार होता. आज बाविसावे रत्न हारांत गुंफण्यासाठीं—गोष्ट ऐकण्यासाठीं तो सिंहासनाजवळ आला. बाविसाव्या पुतळीला सहज स्पर्श करताच ती 'लावण्यवती' बोलूं लागली—

'राजा, तूं विक्रमासारखा पुण्यवान असशील तरच या सिंहासनावर बैस! त्याच्या पुण्याईची कथा मी तुला सांगते ऐक—'

शंखचूड नांवाच्या दुष्ट राजास मारून विक्रमानें त्याचें राज्य आपल्या राज्यास जोडले. पहिले कारभारी काढून टाकून त्यानें नवीन लोक नेमले. थोडे दिवस तेथें राहून तो कारभार बघत होता.

एके दिवशीं घरीं बसलेला शंखचूडाचा प्रधान नदीत स्नान करीत होता. नदीच्या प्रवाहांतून वहात आलेले एक सुंदर

अलौकिक फूल घेऊन तो घरीं आला. फुलाकडे पाहून त्याला वाटले, 'हें फूल इंद्राच्या बागेतीलच असावे, कारण याचा सुगंध आणि रूप यांना या लोकीं उपमाच नाहीं. आतां ही वस्तू आपण राजा विक्रमास द्यावी, म्हणजे तो आपल्यावर प्रसन्न होईल. आपल्याला एखादी अधिकाराची जागा देईल.'

असा विचार मनांत येतांच प्रधानानें तें फूल विक्रमराजाला नेऊन दिले.

ते फूल पाहतांच विक्रमाला पूर्वजन्माची आठवण झाली आणि तो प्रधानास म्हणाला, 'जर या फुलाचे झाड तूं मला आणून देशील तर मी तुला हवें ते देईन, आणि जर आणले नाहीस तर तुझी मालमत्ता जप्त करून तुला या गांवाबाहेर हाकलून देईन.'

राजाचा हुकूम ऐकतांच प्रधान फार चिंतेंत पडला. ईश्वरानें आपल्यावर मोठे संकट आणलें आहे! बरं वृक्ष शोधायला गेलो नाहीं तर सर्वस्व जाईल. तेव्हां प्रयत्न करून तर बघावा असे ठरवून प्रधान नावेत बसला व नदीच्या पात्रातून उगमाकडे नाव चालवू लागला. खूप दूर गेल्यावर फार मोठे अरण्य लागले. नदीच्या दोन्ही कांठावर सिंह, वाघ वगैरे क्रूर पशु मजेत पाणी पीत उभे होते. हे दृश्य पहाताच प्रधानाचे अंगावर भीतीनें शहारे आले. अकस्मात त्या प्रवाहांत वरून तसेच आणखी एक फूल वहात येतांना प्रधानाला दिसले. ते पहातांच त्याला धीर आला. तो आपली नाव पुढे चालवूं लागला.

बरेंच पुढें गेल्यावर त्याला नदकांठी एक झाड दिसले. त्या झाडावर एक मांसाचा पिंड होता त्यातून रक्ताचा एक एक थेंब खाली पाण्यांत पडत होता व त्या थेंबाचें पाण्यांत पडतांच फूल बनत होतें. प्रधानाने हे पाहिले.

नाव किनाऱ्याला लावून तो त्या झाडाकडे निरखून पाहूं लागला. त्या झाडाचे वरचे बाजूस दुसरा तसाच मांसाचा गोळा दिसत होता. पण त्यातून रक्तांचे थेंब पडत नव्हते.

प्रधानाने हे सर्व नीट पाहून घेतले आणि तो नावेत



बसून आपल्या गांवाला परत आला. त्यानें विक्रमराजाला ही सर्व हकीकत सांगितली.

राजा विक्रम म्हणाला, ' पहा ! ज्या पिंडापासून फुलें उत्पन्न होतात तो माझा देह आहे आणि दुसरा पिंड होता,

ते माझ्याबरोबर राज्यकारभार करतात त्यांचे देह आहेत. पूर्वी मी उग्र तप केले होते म्हणून मला हे राज्य प्राप्त झालें. माझ्या बरोबरीच्या लोकांनीहि तप केले होते म्हणून ते आज सुखांत वैभवांत आहेत.

जो प्राणी जसे कर्म करतो तसे त्यास फळ मिळते. आतां तुला हे पटले असेलच ? यापुढें तूं चांगला वागशील असा मला पूर्ण विश्वास आहे.'

असें म्हणून राजानें त्या माणसालाच परत प्रधान नेमले व आपण अवंतीला परत आला.

भोजराजा गोष्ट ऐकून महालाकडे निघून गेला.

## कथा तेविसावी

रत्नाला पैलू पाडले कीं, रत्नाचे तेज वाढतें, त्याप्रमाणें विक्रमराजाच्या चरित्रांतील गोष्टी ऐकून 'त्याचे चरित्र सुवर्णाक्षरांत लिहिलें आहे' असें वाटत होते.

भोजराजा तेविसाव्या पुतळीजवळ गेला व म्हणाला, 'बाई, आतां तूं बोल–एकादी कथा सांग ?'

भोजराजाचा स्पर्श होतांच ती 'कणीवती नांवाची पुतळी सांगू लागली.

विक्रमराजाचा दरबार भरला होता. त्याच्या राज्यातील सुतारानें एक उत्तम लाकडाचा घोडा तयार करून आणला होता राजाला प्रणाम करून तो म्हणाला,

' महाराज, मी हा घोडा आणला आहे.'

' यात कोणता खास गुण आहे ?'

महाराज, यावर बसून एक कळ दाबली की, माणसाला चटकन् दूर जाता येते.'

' तर मग मला घोडा फिरवून दाखव !'

राजाज्ञा होतांच सुतार घोड्यावर बसला. त्यानें घोड्याच्या अनेक प्रकारच्या चाली राजास करून दाखवल्या. नंतर जेव्हा घोडा पळू लागला तेव्हां त्याच्यावर दृष्टीहि ठरेना.

घोडा राजाला फार आवडला. त्यानें घोडा ठेवून घेतला व सुताराला लाख मोहरा दिल्या.

सुतार खूष झाला. घोडा ठेवून घरीं परत जातांना तो राजाला म्हणाला, ' महाराज, ह्यो घोडा पळत असेल त्यावेळेस याला टांच लावूं नये. तशी जर टांच लावली तर मात्र हा कोणासहि आवरता येणार नाहीं. ही गोष्ट घोड्यावर बसणाऱ्या स्वारानें पक्की ध्यानांत ठेवावी.'

सेवकांनी घोडा उचलून राजाच्या खास पागेंत ठेवून दिला. कांहीं दिवस गेले. एक दिवस राजा सरदारांसह नवीन घोडे पहाण्यासाठी अश्वशाळत गेला असतांना त्याला या लांकडी घोड्याची आठवण झाली. लांकडी घोड्याजवळ जाऊन तो सरदारांना म्हणाला,

' यावर कुणाला बसतां येईल ?'

'महाराज, या घोड्यावर बसणे सामान्य माणसाचे काम नव्हे. हा भलताच चपळ आहे' एक सरदार म्हणाला.

'बरें, मग मी बसतो' असे म्हणून राजा घोड्यावर बसला. घोडा फिरूं लागला. विक्रमराजाला फार गंमत वाटली. त्या आनंदात तो 'टांच लावू नये' हे सुताराचे शब्द विसरून गेला. विक्रमानें घोड्याला टांच लावली त्याबरोबर तो घोडा उंच उडाला व आकाशमार्गानें जाऊं लागला. ते पाहतांच सर्वत्र हाहाकार माजला.

बऱ्याच वेळानें तो घोडा दाट अरण्यांतील एका झाडावर उतरला. त्याबरोबर विक्रम खालीं उतरून वाट शोधूं लागला. तेथें फिरतां फिरतां एका झाडाजवळ दोन विहिरी व एक छोटेसे घर त्याच्या दृष्टीस पडलें. विक्रमराजा घरांत शिरला. घरांत सर्व सामान होते. तेथील पलंगावर एक वानरी बसली होती. विक्रमाला वाटले येथे कोणीतरी लपून रहात असावे.

येथें कोण रहाते याचा शोध घेण्यासाठीं राजा एका उंच झाडावर चढून बसला. थोड्या वेळांत तेथें एक यति आला. त्यानें डाव्या हाताच्या विहिरीचें पाणी काढले व ते त्या वानरीच्या अंगावर शिंपडले. तेव्हा तेथें एक सुंदर स्त्री दिसूं लागली. त्या सुंदर स्त्रीबरोबर यतीनें रात्रभर विलास केला. उजाडल्यावर जातेसमयीं यतीनें उजव्या हाताचे विहिरीतील

पाणी काढून तिच्या अंगावर शिंपडलें. ती स्त्री परत वानरी झाली. यति तेथून निघून गेला.

यति निघून गेल्यावर राजा खालीं उतरला. त्यानें डाव्या हाताच्या विहिरीतले पाणी काढून त्या वानरीवर शिंपडलें. त्याबरोबर ती स्त्री झाली व म्हणाली, 'हे उदार पुरुषा, मला या दुःखापासून सोडव. मी लहानपणी न कळतां आई-वडिलांची कांहीं अमर्यादा केली म्हणून त्यांनी मला या यतीचे स्वाधीन केले. हा दुष्ट माझे फार हाल करतो.'

ही हकीकत ऐकतांच विक्रमाचे मनांत तिच्याविषयीं दया उत्पन्न झाली. त्यानें मनांत वेताळाचे स्मरण केले. त्याबरोबर तीन वीर तेथें उभे राहिले. विक्रमराजानें एकाच्या खांद्यावर स्त्रीला बसविले, दुसऱ्याचे खांद्यावर तो लाकडी घोडा दिला व तिसऱ्याचे खांद्यावर आपण स्वतः बसला व सर्वजण अवंतीला आले.

त्या दुःखी स्त्रीला विक्रमानें आपली बहीण मानले. तिला मोठा वाडा बांधून दिला. ती स्त्री ईशचिंतनांत समाधानानें दिवस घालवू लागली.

भोजराजा, तुझे मन इतके मोठे आहे का? इतके दयाळू आहे का? असेल तरच या सिंहासनावर बैस!

भोजराजानें न बोलतां सिंहासनाला प्रणाम केला व तो महालांत शिरला.

*

# कथा चोवीसावी

भोजराजाच्या मनांत आज तो घोडा व त्यावर बसणारा विक्रम सारखा घोळत होता. पुढील गोष्ट ऐकण्यासाठीं अधीर होऊन तो सिंहासनाजवळ आला. चोविसाव्या सुवर्ण पुतळीच्या डोळ्याला स्पर्श करतांच, आपले सुंदर डोळे उघडत ती 'हंसगमना' नांवाची सुवर्ण पुतळी म्हणाली—

'राजा, तूं विक्रमराजासारखा दक्ष राजा असशील तरच या सिंहासनावर बैस!'

'विक्रमराजा कशी दक्षता घेत असे?'

'सांगते! ऐक—' एवढें बोलून ती सुवर्णपुतळी बोलू लागली—

एकदां विक्रम अवंतीनगरीत फिरत असतां एका स्त्रीनें एका सावकारपुत्रास 'आज रात्रीं माझ्या घरीं ये' अशा अर्थाची खूण केलेली त्याला दिसली. ते पहातांच विक्रम मनांत म्हणाला, 'हर हर! माझें राज्य मी आदर्श समजतो! त्या राज्यातहि अधर्म चालावा ना!' आता या गोष्टीचे निवारण तरी कसें करावें? बरें, स्वस्थ बसावें तर 'राज्यांत अधर्म होतो आहे हे समजूनहि जो राजा त्याचें निवारण करीत नाहीं तो पातकाचा भागीदार होतो असें शास्त्रवचन आहे.'

शेवटी मनाशीं निश्चय करून राजा त्या स्त्रीच्या घराजवळ गेला आणि खिडकीतून बारीक खडे मारूं लागला. त्या स्त्रीस वाटलें, ज्या सावकारपुत्रास मी रात्री ये म्हणून खूण केली

तोच पुरुष आला असावा. त्यांचा कांहीं संकेत ठरलेला होता. सावकारपुत्रबरोबर देशांतरी जाऊन खूप सुख भोगावें अशा इच्छेनें आपली दागिन्यांची पेटी खिडकीतून राजाजवळ देत ती स्त्री म्हणाली, ' सख्या ! चल आपण दोघं अवंतीनगरीपासून खूप दूर दूर निघून जाऊं व सुखांत राहूं. '

राजा बरं म्हणाला आणि तिला घेऊन नदी उतरून एका रानांत शिरला. रानांत एका झाडाखालीं बसल्यावर राजानं आपला चेहरा तिला दाखवला. हा दुसराच पुरुष आहे असे दिसतांच ती स्त्री फार घाबरली व रडूं लागली. राजा म्हणाला, ' बाई, आज तूं फार वाईट कर्म केले आहेस. व्यभिचारानें या लोकी तर सुख लागत नाहीच, पण परलोकांतहि सौख्य मिळत नाहीं. व्यभिचार करणाऱ्या लोकांत सभ्य लोक नसतात. ते लबाड, ठक, घातकी किंवा गरजू असेच पुरुष असतात. अशा दुष्टांच्या संगतीत सुख लाभेल असा विचार करणें मूर्खपणाचें आहे. व्यभिचार करणारास राजाचें भय असते, जातीचे भय असते, हें अतिशय निंद्य कृत्य आहे हें लक्षांत ठेव. आताचीच गोष्ट घे. या रानांत मी तुला ठार मारून हें द्रव्य घेऊन पळून गेलो तर काय होईल ? '

राजाचें बोलणे ऐकतांच त्या तरुण स्त्रीस पश्चात्ताप झाला. राजाचे पाय धरून ती म्हणाली, ' महाराज, मी नरकांत पडत होते त्यांतून तुम्ही मला वांचवलेंत. आपण फार श्रेष्ठ आहांत. आतां मला माझ्या घरीं नेऊन पोचोंचवा. इतःपर मी अशी वागणार नाहीं. पतीशीं एकनिष्ठ राहीन. '

त्या स्त्रीला खरा पश्चात्ताप झाला आहे, असे पहातांच राजानें त्या स्त्रीला तिच्या घरीं परत आणून सोडले. तिचे सर्व दागिने तिला परत दिले. यानंतर ती फार सुखांत राहूं लागली.

प्रजेबद्दल तूं एवढी काळजी घेतोस का ? घेत असलास तरच या सिंहासनावर बैस !

भोजराजा मनांत म्हणाला, ' कुठें राजा विक्रम, कुठें मी ? ' आणि तो आपल्या महालाकडे गेला.

★

## कथा पंचविसावी

आज भोजराजानें स्वतः रत्नजडीत समया पेटवल्या. उदबत्तीचा सुगंध दरवळूं लागला. राजानें मोठ्या आदरानें पंचविसाव्या पुतळीला स्पर्श केला. त्याबरोबर ती ' रूपकांता ' नांवाची सुवर्णपुतळी बोलूं लागली—

' हे राजा, तुझी देवावर विक्रमासारखी श्रद्धा असेल तरच या सिंहासनावर बैस. त्याची एक गोष्ट सांगते. ऐक—'

' सांग ! मी ऐक्याला उत्सुक आहे. '

एक दिवस काय झालें ! रंगमहालांत नाचगाणें चाललें होतें. राजा विक्रम त्यात अगदीं रंगून गेला होता. नाच-गाण्याच्या गर्दीत राजाची शिवपूजेची वेळ टळून गेली. तेव्हां पश्चात्ताप वाटून राजा म्हणाला—' हर-हर माझा धिःकार असो. विलासांत गुंग होऊन मी माझे इतक्या वर्षांचें व्रत मोडलें. ह्या अपराधाकरितां मला शिक्षा होणें जरूर आहे.

शंकराची कृपा पुन्हां संपादन करण्यासाठीं तपश्चर्या एवढाच एक मार्ग आहे.

तेव्हां तपश्चर्या करावयाची असें ठरवून राजा विक्रम नर्मदा तीरावरच्या एका घोर अरण्यांत गेला. तेथें अनेक तपस्वी तप करीत होते. त्यांतील कोणी पंचाग्निसाधक, कोणी धुम्रपानी, कोणी उर्ध्ववायु, कोणी वायुभक्षक ध्यानी, पूजन, वेदान्त-विचार, चांद्रायणादि व्रतकर्मे, योगाभ्यास करणारे, कोणी स्वतःच्या शरीराचा होम करणारे असे अनेक तऱ्हेचे तपस्वी होते.

या ठिकाणीं विक्रमानें तीन वर्षें तप केलें. तेव्हां महादेव प्रसन्न होऊन 'वर माग' असें म्हणाले. शिवाला साष्टांग नमस्कार करून राजा विक्रम म्हणाला, 'हे देवा! मला आपल्या चरणाजवळ राहूं द्यावे आणि तुझ्या दर्शनाच्या इच्छेनें येथें जे मरण पावले आहेत त्यांना कृपा करून जिवंत करावें.'

विक्रमाचें भाषण ऐकून शिवाने आपल्या गणास आज्ञा केली कीं, 'जे तपस्वी मरण पावले आहेत, त्यांना जिवंत करा.' गणांनीं सर्व मेलेल्या तपस्व्यांवर अमृत शिंपडलें. सर्वजण 'हर हर महादेव' करीत आनंदानें नाचूं लागले. मग त्या सर्वांना महादेवाने दर्शन दिले आणि विक्रमास एक कमळाचें फूल देऊन सांगितलें कीं, 'हे फूल जेव्हां कोमेजेल तेव्हां तूं समज कीं, तुझे आयुष्य फक्त सहा महिने राहिले आहे. मग तूं माझ्याजवळ ये. आतां शहरात जाऊन आपले

राज्य कर.' एवढे बोलून शंकर गुप्त झाले. शंकराची आज्ञा शिरसावंद्य मानून विक्रम परत अवंतीला आला व राज्य करूं लागला.

हे भोजराजा, देवावर तुझी इतकी श्रद्धा आहे का? असेल तरच तूं या सिंहासनावर बैस!

'छे! मी एक क्षुद्र प्राणी आहे.' असें म्हणत राजा भोज आपल्या महालाकडे परत फिरला.

★

## कथा सव्विसावी

प्रत्यक्ष शंकराने ज्याला 'राज्य कर' अशी आज्ञा दिली. त्या विक्रमाचें मनांत चिंतन करीत राजा भोज सिंहासनाजवळ गेला. सिंहासनावरची सव्विसावी पुतळी तेजस्वी दिसत होती. राजानें तिच्या कंकणाला हात लावतांच ती 'देवानंदा' नावाची सुवर्णपुतळी म्हणाली—

'तूं विक्रमासारखा ज्ञानी आहेस का? असलास तरच या सिंहासनावर बैस!'

'विक्रमराजाच्या ज्ञानीपणाची गोष्ट ऐकण्याची फार इच्छा आहे—'

'होय ना? मग मी सांगते एक—'

एके दिवशी प्रधानाशी बोलतां बोलतां राजा विक्रम म्हणाला, 'ज्ञानावाचून वैराग्य दाखवूं नये, मित्रांस दुखवूं

नये, अपराधावांचून कोणास रागें भरूं नये. कोणास वाईट बोलू नये, दुर्जनांची संगत करूं नये. मोठ्या अन्यायाशिवाय स्वस्त्रीस टाकूं नये. स्त्रियांवर विश्वास ठेवून त्यास गुप्त गोष्ट सांगू नये, कोणी भविष्य सांगेल त्याची काळजी वाहूं नये, लक्ष्मी स्थिर राहील असा भरंवसा धरूं नये. चोरास ओळख देऊं नये, वावगे भाषण करूं नये. ईश्वराचे भजन निरंतर करावे, आईबापांचा उपदेश ऐकावा, नीचांची संगत धरूं नये, खोटी साक्ष देऊं नये, मोठ्या लाभाकरताहि पापकर्म करूं नये, देश, काळ वर्तमान जाणून योग्य असें वागावें. कोणाचे लाभात आड येऊ नये. थट्टा करूं नये. सर्वांशीं मिळून असावे, बहुतांचे मनास येईल असें कर्म करावे. अडलेल्यांना मदत करावी, दुसऱ्याचा द्वेष न करावा, यौवन, धन आणि आयुष्य ही चंचल जाणावी. एकट्यानें देशांतरास जाऊ नये. आपल्या सामर्थ्यांप्रमाणें दानधर्म करावा. पुत्राचे फार लाड करूं नयेत. ज्याला देण्याचें कबूल केलें असेल त्याला ते सत्वर देऊन टाकावें. कायावाचा मनानें परोपकार करावा. कोणाचे वर्म काढूं नये, कोणाचे गुप्त उघडे करूं नये. सत्कर्मांत खर्च झालेले द्रव्य फुकट गेले असे मानूं नये. नास्तिकपणा करूं नये. आपल्या योग्यतेप्रमाणें इच्छा ठेवावी. प्रशंसेस भुलूं नये. अंतःकरण स्वच्छ ठेवावे. द्यूतकर्म करूं नये. विपत्ति निष्फळ मानू नये. दुसऱ्याचे धनाचा लोभ ठेवूं नये. परस्त्रीची इच्छा करूं नये. प्राप्तीपेक्षा खर्च कमी करावा. ऋण काढून सण

करूं नये. आपल्या पराक्रमाने पोट भरावें. विद्येविषयी तृप्त होऊं नये. आशा मानावी. काम जिंकावा. क्रोध आवरावा. मत्सर सोडावा. मद जिंकावा. मोह खंडावा. मृत्यूची आठवण नित्य ठेवावी. मनांत ईश्वराचें भय बाळगावे. प्राणीमात्रावर दया करावी. श्रीमंतीत पूर्वस्थिति विसरूं नये. विपत्तीत धैर्य सोडूं नये. चुकी पदरी घ्यावी. दुसऱ्याचा गुण घ्यावा. चारचौघांच्या कल्याणाचे कामांत पुढें सरावें. इंद्रियास आवडते म्हणून ज्यात आपला नाश आहे असे कर्म करूं नये. देह सोडल्यावर कीर्ति मागें राहील असें कांहीतरी काम करावें. नम्र आणि मधुर भाषण करावे. दुसऱ्यास नेहमी चांगला मार्ग दाखवावा.

विक्रमासारख्या ज्ञानी पुरुषाने ही नीति सांगितली आहे. भोजराजा पुतळीचें संभाषण मन लावून ऐकत होता.

विक्रमराजाविषयीचा आदर या नीतिनियमांची यादी ऐकून फार वाढला. अतिशय आनंदित होऊन तो आपल्या महालाकडे वळला.

## कथा सत्ताविसावी

विक्रमराजाने केलेला उपदेश प्रत्येक मानवप्राण्याने लक्षांत ठेवण्यासारखा आहे. भोजराजा स्वतःशीच म्हणाला, आता सत्ताविसावी पुतळी आणखी काय सांगते याकडे त्याचे चित्त लागलें होते.

रात्र पडतांच तो सिंहासनाजवळ आला व सत्ताविसाव्या पुतळीच्या खांद्याला स्पर्श करून म्हणाला, 'हे देवी, तू पुढील कथा सांगणार आहेस ना? मग सांग तर! मी अधीर झालो आहे.'

भोजराजानें असे म्हणतांच ती 'देवांगना' नांवाची सुवर्णपुतळी म्हणाली—

एकदा विक्रमराजाचे दरबारांत एक सिद्धी पुरुष आला व विक्रमाला म्हणाला, 'महाराज, मी भूत, भविष्य सर्व कांहीं उत्तम प्रकारे जाणतो.'

असं? ज्योतिषीमहाराज मग मला हे सांगा! या वर्षी पाऊस पाणी कसे काय आहे?

पंचाग पाहून आंकडेमोड करून तो ज्योतिषी म्हणाला, 'महाराज, यंदा रविमध्यें योग आहे. तेव्हां पाऊस पडणार नाहीं—

बुधशुक्रौ समीपस्थौ कुरुतः सजलां महीम्
तयारंतर्गतो भानुः समुद्रपमि शोषयत् ॥

म्हणजे बुध आणि शुक्र दोघे जवळ असतील तर खूप पाऊस पडतो. पण त्यांच्यामध्ये जर सूर्य आला तर मुळींच पाऊस पडत नाही.'

ज्योतिषाचे भविष्य ऐकून राजा फार काळजीत पडला. त्यानें विद्वान ब्राह्मणांची सभा घेतली व विचारले, 'आतां पाऊस पाडण्यासाठीं काय करावे?'

'महाराज, आपण वाजपेय यज्ञ करावा म्हणजे दुष्काळाचा त्रास होणार नाहीं.' ब्राह्मणांनी सल्ला दिला.

झालें? विक्रमानें ताबडतोब यज्ञाची सिद्धता करण्याचा हुकूम सोडला. यज्ञ सुरू झाला. त्या यज्ञसमारंभांत येणाऱ्या प्रत्येक अतिथीचा उत्तम सत्कार करण्यांत आला. त्यांना इच्छादान दिले गेले.

यज्ञसमाप्तीचे वेळेस इंद्रादिक देव प्रत्यक्ष येऊन विक्रमास म्हणाले, 'राजा, आम्ही प्रसन्न झालों आहोत! वर माग.'

विक्रमराजा म्हणाला, 'माझ्या देशांत कधींहि दुष्काळ पडूं नये. 'तथास्तु, असे म्हणून देव स्वस्थानी निघून गेले. प्रत्यक्ष देवांचा आशीर्वाद मिळाल्यानें विक्रम खूष झाला. त्यानें कोट्यवधी लोकांना मिष्टान्न भोजन दिले. दक्षणा देऊन तृप्त केले. त्या दिवसापासून 'माळवा' प्रदेशांत कधींही दुष्काळ पडलेला नाहीं. राजा प्रजेच्या सुखासाठीं तूं इतका झटत असशील तरच या सिंहासनावर बैस?

भोजराजा कांहींच बोलला नाहीं. त्यानें गवाक्षांतून बाहेर नजर टाकली. विस्तीर्ण पसरलेला सुपीक प्रदेश समोर दिसत होता. हा प्रदेश असा व्हायला राजा विक्रमाचें यश व त्याला देवांनी दिलेला आशीर्वाद आहे हे आतां या सुवर्णपुतळीकडून समजल्यामुळें विक्रमराजाविषयींचा आदर झपाटीनें वाढला होता.

●

# कथा अठ्ठाविसावी

नश्वर देह नष्ट झाला तरी कीर्तिरुपानें राजा विक्रम अजूनही चोहोकडे वावरतो आहे असें भोजराजाला वाटूं लागले.

पुढील कथा ऐकण्यासाठीं तो सिंहासनाजवळ आला. अठ्ठाविसाव्या पुतळीच्या गालाला हळुवार हात लावताच ती 'चित्रिणी' नांवाची सुवर्णपुतळी बोलूं लागली.

'राजा' आज तुला विक्रमाची एक गोष्ट सांगते. एकदां राजा अरण्यांत शिकारीसाठीं गेला होता. यम व अरुण या दोन देवांना वाटलें, आपण विक्रमराजाचें सत्त्व बघावें. मनांत येतांच यमाने वाघाचे रूप घेतलें व वरुणानें रोडक्या गाईचे रूप घेतले. गायरुपी वरुण अतिशय घाबरलेल्या अवस्थेंत राजाजवळ आला व म्हणाला, ' हे राजा मी तुला शरण आले आहे. आतां या वाघापासून माझे रक्षण कर. राजाला गाईची दया आली. तो तलवार घेऊन त्या गायीभोवती फिरू लागला वाघ गायीवर झडप घालण्यासाठीं फिरूं लागला. अशा परिस्थितीत खूप मोठा पाऊस आला व सर्वत्र चिखल झाला. त्यांत ती गाय धपकन खाली बसली. वाघ शेपटी जमिनीवर आपटून मोठी गर्जना करीत गाईवर धांवून येण्यास बघत होता. राजाने पावसांत सतत उभे राहून गाईचे संरक्षण केले. पहाट होतांच यम व वरुण दोघेही आपल्या खऱ्या स्वरूपांत प्रकट झाले व म्हणाले, 'हें राजा, आम्ही तुझे सत्त्व बघायला

हें नाटक केले होते. तूं आमच्या परीक्षेत उतरलास! आतां तुला काय हवें तें मागून घे.'

राजा म्हणाला, 'तुमच्या कृपेने मला कांहींही कमी नाहीं. आपली कृपा असावी एवढेच मागणें मागतो.'

राजाचा निःस्वार्थीपणा पाहून त्यानीं स्वतःहून राजाला कामधेनु दिली.

कामधेनूला घेऊन राजा उज्जयिनीस परत येत असतां वाटेत एका दरिद्री ब्राह्मणानें राजाजवळ कामधेनूची मागणी केली. राजाने लगेच ती गाय ब्राह्मणाला दान करून टाकली.

भोजराजा, तुझे मन इतके मोठे असेल तरच तू या सिंहासनावर बैस!

भोजराजाने न बोलता सिंहासनाला नमस्कार केला व तो आपल्या महालाकडे चालू लागला.

●

## कथा एकोणतिसावी

आता थोड्याच गोष्टी ऐकायला मिळणार होत्या. प्रत्येक गोष्ट राजा पुन्हा पुन्हा आठवत होता. याच नादांत रात्र पडली. राजा लगबगीनें सिंहासनाजवळ आला व त्यानें एकोणतिसाव्या पुतळीच्या पदराला स्पर्श केला. त्याबरोबर

ती 'सुलोचना' नांवाची सुवर्ण पुतळी हंसत म्हणाली—

'राजा, मीही तुला विक्रमराजांची एक गोष्ट सांगणार आहे.

'सांग! त्यासाठीच तर मी रोज येथें येतो आहे.'

ऐक हं-वेष पालटून नगरीत हिंडायचे व प्रजेंची सुखदुःखे जाणून घ्यावयाची असा विक्रमराजाचा नियम होता. एकदा असाच वेष पालटून नगरांत हिंडतां हिंडतां राजा एका दरिद्री ब्राह्मणाचे घरापाशीं आला. तो ब्राह्मण व त्याची स्त्री दोघंही बोलत होती. बाहेर उभ्या राहिलेल्या विक्रमाला त्यांचें बोलणे ऐकूं येत होते. ती स्त्री पतीला म्हणाली, 'नाथ, आपण या दारिद्र्यानें इतकें गांजलो आहोंत—मग तुम्ही राजाजवळ जाऊन याचना कां करीत नाहीं? तो दयाळू राजा आपल्याला नक्कीच द्रव्य देईल! आपली चिंता दूर करील.'

'अग, सध्या आपणास काळ प्रतिकूल आहे. अनिष्ट आहे तोपर्यंत माझी विपत्ति राजाही दूर करूं शकणार नाहीं' ब्राह्मण म्हणाला. एवढें बोलणे ऐकून राजा विक्रम निघून गेला. दुसरे दिवशी सकाळी राजानें त्या ब्राह्मणास बोलावणे पाठविले. एक कोहळा पोखरून त्यांत पांच रत्नें ठेवली व तो कोहळा राजानें ब्राह्मणास दिला.

एवढा मोठा कोहळा घरीं नेऊन काय करायचा? असें वाटून ब्राह्मणानें तो कोहळा एका सराफास विकला व आलेले पैसे घेऊन तो घरीं आला.

पुनः रात्रीं राजा ब्राह्मणाचे घराजवळ आला. ब्राह्मण आपल्या स्त्रीस म्हणत होता, 'पाहिलास ना चमत्कार! राजा याचकास हजारो रुपये देतो. परंतु मला मात्र मुद्दाम भेटीस बोलावून फक्त एक कोहळा दिला. तो कोहळा विकून मिळालेले पैसे मी आणले आहेत. अग, हा दोष राजाचा नाहीं. माझ्या प्रारब्धाचाच आहे.'

ब्राह्मणाचे बोलणे ऐकून राजा खिन्न होऊन मनांत म्हणाला 'याच्या नशिबांत सध्यां द्रव्य नाहीं हेंच खरें! तेव्हां यास नुसते द्रव्य देऊन उपयोग काय? आतां काय केल्यानें हा ब्राह्मण सुखी होईल?'

राजा स्वतःशीच असा विचार करीत आहे तो तेथें एक पुरुष आला व त्या ब्राह्मणाचे घरांत शिरूं लागला. विक्रमानें त्या पुरुषास विचारले, 'तूं, कोण आहेस? एवढ्या रात्री त्या ब्राह्मणाचें घरी तुझे काय काम आहे!'

मी 'काळ' आहे. मी ब्राह्मणाला छळायला जातो आहे,'

'देवा! माझी एक प्रार्थना आहे. त्या ब्राह्मणाऐवजी माझा छळ करा आणि त्याला सुखांत राहूं द्या!'

'असं? मग पुढील वर्षभर मी तुला त्रास देईन' असे म्हणून काळ निघून गेला. ब्राह्मण आपल्या स्त्रीसह झोपी गेला. राजाही राजवाड्यात परत आला.

दुसरें दिवशीं सकाळीं ज्या सराफानें तो कोहळा विकत घेतला होता त्यानें तो चिरला तर आंत पांच अमूल्य रत्नें

निघाली. सराफ मनांत उमजला. राजानें ब्राह्मणाला हें गुप्त दान केलें आहे. हें दान घेण्याचा अधिकार आपल्याला नाहीं.

लगेच तो उठला व ब्राह्मणाकडे आला. ब्राह्मणाला नमस्कार करून सराफ म्हणाला, ‘ भटजीबुवा, राजानें आपल्याला या कोहळ्यांतून गुप्तदान केलें होतें. हे घ्या. ब्राह्मणानें तीं रत्नें घेतलीं. त्याला फार आनंद झाला. विक्रमाचे गुण गात गात तो हर्षानें नाचूं लागला. त्यांतील एक रत्न विकून त्याला अलोट पैसा मिळाला व तो स्त्रीसह सुखांत राहूं लागला.

ब्राह्मणाची विपत्ति राजानें स्वीकारल्यामुळें त्याच रात्री राजाच्या जामदारखान्यांत चोरी झाली. राजा तिची चौकशी करीत आहे तोंच कोठी, महाल, पागा व राजवाडा यांना अचानक आग लागली व सर्व जळून गेलें. तेव्हां विक्रमराजानें प्रधानांस सर्व हकीकत सांगितली व तो सेतुबंध रामेश्वरला निघून गेला.

तेथें देवळांत जप करीत राजा बसला होता. एके दिवशी चंद्रावरचा राजा देवाचे यात्रेस आला. विक्रमाचें सुंदर रूप पाहून राजा त्याला म्हणाला, ‘ हे महापुरुषा! तुला पाहून मला फार समाधान वाटलें. तूं नेहमी माझ्याजवळ रहावेंस अशी माझी इच्छा आहे. ’

राजाज्ञा मोडणें विक्रमाला शक्य नव्हतें. तेव्हां त्यानें ते कबूल केलें. मग तो राजा विक्रमासह आपल्या नगरीला आला.

आपल्या पतीबरोबर गप्पा मारीत होती. विक्रमही तेथें होता. कांहीं काम निघाले म्हणून राजा निघून गेला. विक्रमाला राणीनें मुद्दाम बसवून घेतले. थोडा वेळ गेला. राणीच्या आंघोळीची वेळ झाली म्हणून एक दासी तिला बोलवायला आली. राणीनें आपल्या गळ्यांतील नवरत्नांचा हार खुंटीवर काढून ठेवला व ती अंतःपुरांत निघून गेली. त्या खुंटीजवळ एक हंसाचे चित्र टांगलेले होते. राजा त्या हाराकडे बघत असतांना चमत्कार झाला. चित्रांतील निर्जीव हंसाचे देहांत काळ शिरला व त्या हंसाने सजीव होऊन नवरत्नांचा हार गिळून टाकला.

हें अघटित कर्म कसे घडले असावे असा विक्रम स्वतःच्या मनाशी विचार करतो आहे तोच राणी तेथे आली व तिनें विचारले, ' येथील हार कुठें गेला ?'

' हंसानें हार गिळला असें सांगितलें तर लोकांना खरे वाटणार नाहीं हे माहीत असूनही ' असत्य बोलायचे नाही ' या स्वतःच्या ब्रीदाला जागून विक्रमराजाने राणीला खरी हकीकत सांगितली. अर्थातच राणीला ते पटले नाहीं. तिनें ते राजाला सांगितले. '

राजानें विक्रमाजवळ चौकशी करतांच विक्रमाने परत तेच उत्तर दिले. तेव्हां राजाची खात्री झाली. ' हाच चोर आहे ! यानेच हार लपवून ठेवला आहे. ' रागाचे भरात विक्रमाचे हातपाय तोडण्याचा हुकूम राजानें दिला. बिचारा विक्रम

हातपाय तोडल्यामुळें दीन होऊन, दुःखानें व्याकुळ होऊन, रस्त्यांत पडला होता.

तेवढ्यांत तेथें एक तेली आला. त्याला या पातपाय नसलेल्या गोळ्याची दया आली. त्याने त्याला उचलून आपले घरीं नेले. औषधपाणी केले. कांहीं दिवसांनीं राजाच्या जखमा बऱ्या झाल्या. तेली त्याला म्हणाला, 'थोट्या, आतां तूं घाण्यावर बसून बैल हाकलत जा.'

विक्रम त्याला म्हणाला, 'तेलीबाबा, तुमचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. यापुढे तुम्हांला घाण्यावर बसून तेल काढण्याची गरजच पडणार नाहीं. मी माझ्या मंत्रसामर्थ्यानें तुमच्याजवळच्या सर्व घागरी तेलाने भरून ठेवतो. तुम्हीं त्यांतून कितीही तेल विका-तेल संपणार नाहीं.'

आतां तेल्याकडे हजारो मोहरांची विक्री होऊं लागली. तेली श्रीमंत बनला. त्यानें राजकन्येच्या महालाशेजारी तसाच सुंदर महाल बांधला. राजा विक्रमाला त्याने त्या महालांत ठेवलें.

एके दिवशीं राजा गात होता. गात असतां तो दीपक राग गाऊं लागला. दीपक राग संपताच राजकन्येच्या महालां-तील सर्व दिवे आपोआप लागले. तेव्हां तिनें मनाशीं निश्चय केला—'जो कुणी पुरुष दीपराग आळवतो आहे त्यालाच मी मनाने वरले आहे, तोच माझा पति आहे.'

शोध घेतां घेतां तिला समजलें कीं, तेल्याचा थोटा मानस-पुत्र विक्रम हा राग गातो आहे. आज्ञेप्रमाणे राजकन्येने राजा

विक्रमाशीच विवाह केला, राजाराणीला हें आवडलें नव्हते. राजकन्या मात्र मनोभावे पतीची सेवा करीत होती.

कांहीं दिवस गेले. एके दिवशीं चंद्रीचंदावरच्या राजाकडे विलासपुरीचे राजाने सोन्याच्या तीन मूर्ति पाठवून दिल्या. तिन्ही मूर्ति अगदी सारख्या होत्या. त्याचे वजन, आकार, रूप यांत कसलाही फरक नव्हता. विलासपूरच्या राजानें मूर्तीसोबत एक पत्र पाठवले होते कीं,—'या तीन मूर्तींची परीक्षा करावी. यांतील उत्तम, मध्यम व कनिष्ठ कोणती ते आम्हास कळवावे.'

चंद्रीचंदावरच्या राजाने आपल्या दरबारांतील विद्वान चतुर पुरुषांना बोलावून पुतळ्यांची परीक्षा केली. परंतु कोणासही त्यांत कांहींच फरक सांपडेना. राजा चिंतेत पडला. ह्या चिंतेत तो असतांनाच त्याच्यासमोर लक्ष्मी, बुद्धि, धर्म व काळ ही चौघेजण आली व 'आम्हांत श्रेष्ठ कोण आहे ते सांग'-असं म्हणूं लागली. राजानें खूप विचार केला. पण त्याला त्याचेही उत्तर सुचेना. त्याची चिंता आणखीच वाढली. राजकन्येनें आपल्या वडिलांची हकीकत व त्यांच्या चिंतेचें कारण विक्रमास सांगितलें.

विक्रम म्हणाला, 'हे तीन दिवस मला वाईट आहेत. तेवढे गेले की मग मी या प्रश्नाचें उत्तर देईन.'

चौथ्या दिवशीं राजकन्येनें आपला पति तुमच्या प्रश्नांची उत्तरें देणार आहे असें वडिलांस सांगितलें. राजानें विक्रमास बोलावणे पाठविले. विक्रम म्हणाला—

'जेथें राणीचा हार हंसाने गिळला असें मी सांगितलें तेथेच मला घेऊन चला. मी तेथेंच या प्रश्नांची उत्तरें सांगेन.

थोड्या विक्रमाला त्या खोलीतच आणून बसवले. प्रधान व इतर अधिकारीही त्या ठिकाणीं हजर झाले होते. नंतर विक्रमाने बराच वेळ त्या तीन मूर्तींकडे पाहिले. त्यांत कांहीं कमीजास्ती दिसेना, पण एकदम त्याचे मनांत एक कल्पना आली. त्याने एक लवचिक तार मागून घेतली व आपल्या पत्नीला--राजकन्येला--सांगितलें कीं, ती तार एका पुतळ्याचे कानांतून घाल. राजकन्येनें तसें केलें. त्याबरोबर ती तार तोंडांतून बाहेर पडली. दुसऱ्या मूर्तीच्या कानांत घातली असतां ती दुसऱ्या कानांतून बाहेर निघाली आणि तिसरीची पोटांत गेली. ही परीक्षा केल्यावर विक्रमानें सांगितलें, जिच्या तोंडातून तार बाहेर पडली ती पुतळी कनिष्ठ होय. कारण ती कानानें जे जे ऐकेल ते ते बडबडेल ! कशाचाही विचार करणार नाही. जिच्या दुसऱ्या कानांतून तार बाहेर पडली ती पुतळी मध्यम होय; कारण ती कुणाच्याहि गुप्त गोष्टी ऐकायला आल्या तरी बडबडणारी नाहीं. विसरून जाईल. ज्या मूर्तीच्या पोटांत तार गेली ती मूर्ति सर्वश्रेष्ठ होय कारण तिच्याजवळ कोणीहि आपले गुपित सांगितले तरी ते ती उघड करणार नाहीं. मनांत जपून ठेवील.

विक्रमाचें हें चातुर्य पाहून सर्वांना अतिशय आनंद झाला. नंतर राजानें स्वतःपुढें पडलेला प्रश्न विक्रमाला सांगितला. तें

चौघेजण तेथें हजर झालेच. त्यांतील लक्ष्मी पुढें होऊन म्हणाली–

विक्रमा, विचार काय करतोस ? मीच सर्वांत श्रेष्ठ आहे.'

देवी, असें आहे तर विक्रमराजाला प्रतिकूल काल आला असतां तुझें कांहींच का चाललें नाहीं ? हा प्रश्न विचारतांच लक्ष्मी निरुत्तर झाली.

' मग बुद्धि म्हणाली, ' मी सर्वश्रेष्ठ आहे.'

बुद्धिदेवी, मग विक्रमराजासारख्या बुद्धिवानाचा काळ फिरल्यावर तुझा त्याला कां बरें उपयोग झाला नाहीं ? या प्रश्नानें बुद्धीहि निरुत्तर होऊन राहिली.

नंतर धर्म पुढें झाला व म्हणाला, ' मी सर्वश्रेष्ठ आहे.'

महाराज, आपण जर सर्वश्रेष्ठ आहांत तर राजा विक्रमासारख्या धर्मानें वागणाऱ्या राजावर काळानें अवकृपा कां बरें करावी ?' ह्या प्रश्नाने निरुत्तर होऊन धर्म मागे सरला.

मग काळ विक्रमापुढें येऊन उभा राहिला. त्याला पहातांच विक्रमानें लोटांगण घातलें, कारण नमस्कार करायला हात नव्हतेच. त्याचवेळीं शेजारचे चित्रांतल्या हंसाने हळूं हळूं आपल्या पोटांतून नवरत्नाचा हार काढला व खुंटीवर ठेवला. सर्व लोक अतिशय आश्चर्यचकित झाले. विक्रम काळाला म्हणाला, ' हे काळा, तूं जर प्रतिकूल असलास तर कोणाचेही कांहीं चालत नाहीं, म्हणून तूंच सर्वांत श्रेष्ठ आहेस. तूं अनुकूल असलास तरच बुद्धि, लक्ष्मी, धर्म हे सुख देऊं शकतात. तुझ्यावांचून त्यांचे सामर्थ्य फुकट आहे.'



हे भाषण ऐकतांच काळ फार संतुष्ट झाला. त्यानें विक्रमाचे अंगावरून प्रेमाने हात फिरवला. त्याबरोबर विक्रमाला हातपाय आले. शरीरकांति जास्तच सुंदर झाली.

हा चमत्कार पाहून राजा–राणी व सर्व लोक आश्चर्यचकित झाले होते. राजा विक्रमाने त्यांना आपण कोण आहोंत व आपल्याला हा त्रास कां भोगावा लागला हे सर्व कांहीं सांगितलें.

राजा विक्रमासारख्या थोर पुरुषाचा आपल्या हातून छळ झाला हें समजल्यावर राजानें त्याची क्षमा मागितली.

विक्रमराजा म्हणाला, 'तुमचा यांत कांहींच दोष नाहीं. माझा काळ फिरला होता म्हणून असें झालें.'

विक्रमासारखा पति मिळाला म्हणून राजकन्या खूष होती. राजकन्या एकुलती एक असल्याने चंद्रीचंदावरच्या राजाने

आपले राज्य विक्रमाला देऊन टाकले व तो वनांत निघून गेला. विक्रमाने आपल्यावर उपकार करणाऱ्या तेल्याला त्या राज्यावर बसवले व सर्वांचा निरोप घेऊन विक्रमराजा स्त्रीसह अवंतीला परत आला.

भोजराजा, लोकांसाठीं तूं इतके कष्ट काढू शकणार असशील तरच या सिंहासनावर बैस !

'विक्रमाची सर मला कशी येणार ? मी एक क्षुद्र राजा आहे.' असे म्हणत भोजराजा स्वतःचे महालाकडे वळला.

●

## कथा तिसावी

'आपल्याला आज काळच अनुकूल असावा म्हणून हें सिंहासन सापडले व त्याच्या योगाने इतक्या सुंदर कथा ऐकायला मिळाल्या.' भोजराजा स्वतःशींच पुटपुटत होता. रात्र झाली. तिसावी पुतळी काय सांगते ते ऐकण्यासाठीं राजा सिंहासनाजवळ गेला. तिसाव्या सुवर्णपुतळीच्या केसांवर हात फिरवतांच ती 'प्रभावती' नांवाची पुतळी म्हणाली—

राजा, आज मीही तुला एक सुंदर गोष्ट सांगणार आहे. ऐक—

विक्रम राजा राज्य करीत असतांना कपिलाषष्ठीचे पर्व आले. म्हणून राजा गंगास्नानासाठीं गेला होता येथें विद्वान ब्राह्मण, तपस्वी हेही आले होते. त्याचप्रमाणें गरीब, दुबळे, अशक्त असेही लोक जमा झालेले होते. राजानें मनांत विचार केला—

'असा शुभयोग वारंवार येणार नाहीं. आपल्या आयुष्याची तरी कुणी खात्री दिली आहे ? तेव्हां आतांच दानधर्म करावा.

अस्थिरं जीवितं लोके अस्थिरे धनयौवने ॥
अस्थिरा पुत्रदाराश्च धर्मः कीर्तिद्वयं स्थिरम् ॥

म्हणजे मृत्युलोकी आयुष्य अस्थिर आहे, अशाश्वत आहे. धन आणि तारुण्य नेहमी राहाणारी नाहींत. पुत्र आणि पत्नी हीदेखील क्षणाची सोबती आहेत. फक्त धर्म आणि कीर्ति ही दोनच शाश्वत आहेत.'

विक्रमानें तेथें खूप दानधर्म केला. येणाऱ्या प्रत्येक याचकाला संतुष्ट केले. अन्नदान झाल्यावर विक्रमानें भोजन केले व तांबूल खात आरामांत बसला.

तेवढ्यांत एक गारुडी तेथें आला व म्हणाला, 'महाराज, मी आपल्याला माझा उत्कृष्ट खेळ दाखवतो त्याकडे लक्ष द्यावें. असें म्हणून तो आपले सामान आणण्यासाठी गेला. तेवढ्यांत एक घोडेस्वार जोरजोरांत दौडत राजाजवळ आला व रामराम करून उभा राहिला. प्रधानाने त्याला विचारले, 'तूं कोण ? कुठून आलास ?' तो म्हणाला, 'मी इंद्राचा दूत आहे. कांहीं कारणानें इंद्राने मला शाप दिला म्हणून मला मृत्युलोकांत यावे लागले. माझी विनंती आहे. कृपा करून मान्य करावी. आज देव-राक्षस यांच्या युद्ध होणार असून इंद्रानें मला स्वर्गात बोलावले आहे. ही माझी स्त्री सुकुमार व फार लहान आहे. त्यामुळें तिला युद्धांत नेतां येत

नाही. भलत्याच्या स्वाधीन हिला करणें मला पटत नाहीं. विक्रमराजा परस्त्रीस कन्येप्रमाणें मानतो अशी त्याची कीर्ति ऐकून मी येथें आलो आहे. तेव्हां मी या स्त्रीस तुमचेजवळ ठेवून युद्ध करायला जातो. तोपर्यंत तुम्ही हिचा संभाळ करावा.' विक्रमराजाला स्वाराचें सर्व बोलणे खरे वाटले व त्याने होकार दिला. आपल्या स्त्रीस राजा विक्रमाजवळ ठेवून तो शिपाई उड्डाण करून निघून गेला.

थोडा वेळ गेला तोच आकाशांतून एक हात भूमीवर येऊन पडला, तो पाहून ती स्त्री म्हणाली, 'महाराज ! माझे पती युद्धांत मरण पावलें म्हणूनच हात येथें आला. आतां या हाताबरोबर मी सती जाणार !' त्या स्त्रीचें हे बोलणे ऐकून राजास पंचाईत पडली. राजाने सांगितले, 'तुला पाहिजे ते देतो, परंतु तूं सहगमन करूं नको.'

पण ती स्त्री म्हणाली, 'मला स्वर्गात येण्याचे आमंत्रण देण्यासाठीं पतीनें आपला हात येथें पाठवला. आतां मी जिवंत कशी राहूं ? आपणच माझे आईबाप आहांत. आपणच माझी पाठवणी करावी.' तिचे शब्द ऐकतांच विक्रमाचा नाईलाज झाला. त्याने सहगमनाची तयारी केली. खूप मोठा दानधर्म करून ती स्त्री पतीच्या हाताबरोबर सती गेली.

इतक्यांत तो स्वार आकाशांतून वेगाने खाली उतरला आणि राजास नमस्कार करून म्हणाला, 'महाराज ! आमचा

जय झाला असून इंद्रानें मला सहकुटुंब स्वर्गात बोलावलें आहे. तेव्हां माझी स्त्री मला परत द्यावी.'

राजा विक्रम म्हणाला, 'तिने आत्ताच सहगमन केलें.'

हे ऐकतांच तो चिडून म्हणाला, 'मी जिवंत असता ती कोणाबरोबर सती गेली ? आणि तुम्ही तिला कसें जाऊं दिलेत ?'

त्या स्वाराचे हे शब्द ऐकतांच विक्रम राजाचे तोंड लज्जेने काळवंडले. तो खाली पाहूं लागला.

इतक्यांत तो शिपाई गारुडी होऊन विक्रमासमोर उभा राहिला व त्याने राजाला प्रणाम करून म्हटले, 'महाराज, मी आपल्याला एक खेळ दाखवला. आतां दुसरा पहावा' असें म्हणून त्यानें स्त्रीस हांक मारली. त्याबरोबर समोरील चितेतून ती स्त्री बाहेर आली व विक्रमासमोर हात जोडून उभी राहिली.

हा खेळ पाहून राजा विक्रम व सर्व लोक आश्चर्यचकित झाले. राजाने खूष होऊन गारुड्याला पांच लाख मोहरा व पांच गांव इनाम दिले.

'राजा, तूं कोणत्याही कलावंताचा असा सत्कार करतोस का ? करीत असशील तरच या सिंहासनावर बैस !'

'छे ! छे माझी ती योग्यता नाहीं' असे म्हणून भोजराजा आपल्या महालाकडे निघून गेला.

# कथा एकतिसावी

आतां दोनच सुवर्णपुतळ्या अबोल राहिल्या होत्या. त्यांतील एक आज आणखी एक कथा सांगणार होती. रात्र पडताच भोजराजा सिंहासनाजवळ गेला. एकतिसाव्या परीच्या डोळ्याला हात लावतांच ती ' गुणप्रिया ' नांवाची सुवर्णपुतळी बोलूं लागली..

' राजा, मीही आतां तुला एक गोष्ट सांगते. ऐक '—पूर्वी महादेवानें विक्रमराजाला जे कमळाचे फूल दिले होते ते सुकले. ते पाहिल्यावर विक्रमराजा समजले आपला मृत्यु सहा महिन्यावर आलेला आहे. त्यानें राज्याची उत्तम व्यवस्था केली. सर्व राज्य प्रधानाच्या स्वाधीन केले व आपण वाईक्षेत्री जाऊन राहिला.

सर्व राज्यांत त्यानें अशी दवंडी पिटविली कीं, ' ज्यास माझ्यापाशीं कांहीं मागावयाचे असेल त्यानें वाईक्षेत्रीं येऊन मागावें. ते ऐकून नाना देशीचे याचक, भट, पंडित, भिकारी, फकीर वाईस गेले. राजाने सर्वांना हवे ते देऊन संतुष्ट केले.

हे वर्तमान कळतांच देवही त्याची परीक्षा पहाण्यासाठीं वाईला आले. त्यांनीं अनेक कठीण, त्रास होणाऱ्या गोष्टी राजाजवळ मागितल्या. पण विक्रमराजानें सर्व त्रास सहन करून त्या त्यांना दिल्या. त्यामुळें देव प्रसन्न होऊन म्हणाले, ' राजा, तुझ्यासारखा पुरुष या कलीयुगात दुसरा कोणीहि होणार नाहीं. मागे सत्ययुगांत राजा हरिश्चन्द्र झाला. त्रेता-

युगांत बळी महादाता झाला व द्वापारयुगांत धर्मराजा प्रतापी झाला ते त्यांचे तिन्ही गुण तुझ्यांत आहेत. त्याकरितां तूं त्यांचेहूनही श्रेष्ठ आहेस ! असें बोलून देव स्वस्थानी निघून गेले.

एके दिवशीं विक्रमराजा कृष्णातीरी बसला असतांना सुवर्णासारखी कांति असलेले एक हरीण तेथे आले व राजाला मनुष्यवाणीने म्हणाले, ' राजा, पूर्वजन्मी मी ब्राह्मण होतो. एक दिवस भुकेने व्याकुळ झालो असतांना मला एक सिद्ध भेटला. त्याच्याजवळ मी ' मरण ' मागितले. त्यानें मला हरीण केले व म्हटले, ' हे ब्राह्मणा, आजपासून तुला भुकेचा त्रास होणार नाहीं. पुढें राजा विक्रमादित्य येईल. त्याचेजवळ तूं तुझ्या हरीण जन्माचे वर्तमान मण्यनुवाणीनें सांगशील. म्हणजे तूं हरीण जन्मांतून मुक्त होशील. नंतर तो राजा तुला आपल्या पुण्याईनें स्वर्गात पोहोचवील ' एवढे बोलून हरणानें प्राण सोडला.

नंतर विक्रमानें हरणाचे प्रेत शास्त्रोक्त पद्धतीनें दहन केले. त्या ब्राह्मणास स्वर्गप्राप्ति व्हावी म्हणून यज्ञ केला. दानधर्म केला त्यामुळें त्या हरणाचे एक दिव्य पुरुषांत रुपांतर झाले व तो विक्रमाचे उपकार मानून स्वर्गात निघून गेला.

राजा, कोणत्याही प्राण्यासाठी स्वतःचे पुण्य खर्च करण्याचे तुझे विक्रमासारखे सामर्थ्य असेल तरच या सिंहासनावर बैस !

'नाहीं! नाहीं! हे सिंहासन पवित्र आहे. यावर बसायची माझी लायकी नाहीं,' असें म्हणत राजा भोज माघारी फिरून महालाकडे गेला.

●

## कथा बत्तिसावी

आज शेवटची कथा ऐकायची होती. भोजराजाने शुचिर्भूत होऊन सिंहासनाची पूजा केली आणि मग बत्तिसाव्या पुतळीच्या पायावर डोके ठेवून तो म्हणाला, 'देवी. आज आपण मला शेवटची कथा सांगणार आहांत! त्या पुण्यपुरुषाच्या कथा ऐकून मी धांवत आलों आहे.'

'होय, राजा! मी आतां शेवटची कथा सांगणार आहे. ऐक—' ती चित्रकला नांवाची बत्तिसावी पुतळी राजाला म्हणाली. भोजराजा ऐकूं लागला.

ज्यावेळेस विक्रमाचा अंतसमय जवळ आला त्यावेळी विक्रमाला आणण्यासाठीं इंद्राने आपले स्वतःचे विमान पाठवले. त्यांत बसून विक्रम स्वर्गांत गेला. तो स्वर्गांत गेल्याचे कळतांच अवंतीनगरींत हाहाःकार माजला. कारभारी, भट, भिक्षुक, फकीर, याचक, गरीब, दुबळे सर्वच शोकसागरांत बुडून गेले. सर्वजण म्हणूं लागले, 'आज धर्म बुडाला. परोपकार, दया, दान इत्यादि गुण लोप पावले.' विक्रमाबरोबर त्याच्या कित्येक स्त्रिया सती गेल्या. दासदासी, सेवक, शिपाई, सरदार व दरबारी म्हणू लागले-'आमचा जन्म व्यर्थ! आमच्यांत असा

कोणीही नाहीं, जो राजास स्वर्गाचे वाटेवरून परत फिरवील!'

कांहीं दिवस गेल्यानंतर प्रधानानें जैत्रपाल नांवाच्या राजपुत्रास गादीवर बसवून त्याच्या नांवाचा शिक्का तयार करून सर्व राज्यभर दवंडी पिटवली. जैत्रपाल विक्रम राजाचे सिंहासनावर बसूं लागतांच त्याला एकदम मूर्च्छा आली.

शुद्धीवर आल्यावर प्रधानाने जैत्रपाल राजाला म्हटलें, रात्री विक्रम महाराजांची प्रार्थना करून जमिनीवर झोपावें. मग ते दृष्टान्त देऊन जशी आज्ञा देतील तसे वागावे.'

जैत्रपालला प्रधानाचे बोलणे पटलें. तो विक्रमाचे स्मरण करून भूमीवर निजला. त्यास राजाने दृष्टान्त दिला—'तूं उज्जयिनी व राधानगरी ही दोन्ही राज्ये सोडून अवंतीस राहा. हें आणि सिंहासन जमिनीत खोल पुरून ठेव.'

सकाळीं उठतांच जैत्रपाल राजानें हा दृष्टान्त प्रधान व सरदार यांना सांगितला. नंतर त्यांनीं मजूर बोलावून खूप खोल खड्डा करून हे सिंहासन जमिनींत पुरून ठेवले आणि स्वतः अवंतीसच येऊन राज्य करूं लागला. त्यानेही आपल्या प्रजेला खूप सुखी ठेवले.

'धन्य तो विक्रमराजा!' राजा भोजचे तोंडून सहज उद्गार बाहेर पडले. आतां त्या सुवर्णपुतळ्या बत्तीस लावण्यवती स्त्रिया बनून त्याच्यासमोर उभ्या होत्या. राजानें विचारले, 'आपण कोण आहांत? आपण कोणत्या कारणानें सुवर्णाच्या

पुतळ्या बनल्या होतात ? आतां तुम्हाला परत पहिले रूप कसें मिळालें ? हें सर्व जाणून घेण्याची माझी फार इच्छा आहे.'

राजाचे शब्द ऐकतांच चित्रकला म्हणाली—'राजा, आम्ही सर्व देवी पार्वतीच्या मैत्रिणी आहोंत. आम्ही सर्वजणी एकदां खेळत असतांना शंकर तेथें आले. शंकराचे वृद्ध, रुंडमाळांनीं वेष्टीत गजचर्म पांघरलेले, नागांनीं गळ्यांत विळखा घातलेलें, चिताभस्म फांसलेले असें रूप पहातांच आम्हांला एकदम हंसू



आले. त्याबरोबर महादेव कोपले व त्यांनीं आम्हांला शाप दिला कीं—तुम्ही निर्जीव पुतळ्या होऊन मृत्युलोकांत रहाल.'

पार्वतीमाईने आमच्यासाठीं रदबदली केली व उःशाप मागितला. मग महादेव जरा शांत होऊन म्हणाले, 'कलीयुगांत

राजा विक्रम नांवाचा फार मोठा राजा होईल. त्याच्या सिंहासनाभोवती तुम्ही पहारा कराल.'

ज्यावेळी त्या श्रेष्ठ विक्रमराजाचें चरित्र तुम्ही भोजराजाला सांगाल त्यावेळीं तुम्हांला तुमचे पूर्वीचे रूप प्राप्त होईल. तुझ्या कृपेमुळें आजचा दिवस उगवला आहे. तुझे आमच्यावर फार उपकार झाले आहेत. आम्ही प्रसन्न आहोत. हवा तो वर माग!'

ते ऐकून राजा भोज म्हणाला, 'तुम्ही प्रसन्न झाला आहांत तर मला हा वर द्या कीं, ही विक्रमराजाची कथा जो लिहील, वाचील किंवा श्रवण करील त्यास दारिद्र्य व दुःख यांची बाधा कधींच होऊं नये.'

'तथास्तु' असें म्हणून त्या बत्तीस लावण्यवती स्त्रिया विमानांत बसून कैलास पर्वतावर निघून गेल्या. नंतर भोजराजाने मोठा दरबार भरवून या बत्तीस कहाण्या सर्व लोकांना सांगितल्या.

नंतर भोजराजानें ते सिंहासन जेथे होतें तेथेच पुरून ठेवलें.

वृद्धावस्था येतांच आपले सर्व राज्य राजपुत्राचे स्वाधीन करून भोजराजा तपश्चर्या करण्यासाठीं वनांत निघून गेला.

समाप्त

२८३६
BVBK-0402836
भा.वा.